# शब्द रुची

ऑक्टोबर २०२३ । मूल्य १० रु. । पृष्ठे ४४

**परंपरेचा सात्त्विक स्पर्श**



विदुषी मालिनी राजूरकर



विदुषी माणिक भिडे

## कुसुमाग्रजांचं असंग्रहित साहित्य ग्रंथरूपात!


‘क’ आणि ‘ख’ या पुस्तकांचे राज ठाकरे यांच्या हस्ते प्रकाशन



‘क’ आणि ‘ख’ या पुस्तकांच्या प्रकाशनसमयी अभिजित पेडणेकर, नितीन सरदेसाई, बाळा नांदगावकर, अरुण म्हात्रे, प्रकाशक अभिजित पानसे, राज ठाकरे, डॉ. नागेश कांबळे, अशोक बागवे, अभय गाडगीळ आणि सुदेश हिंगलासपूरकर

Government of Maharashtra | MAGNETIC MAHARASHTRA #MadeForBusiness | MAKE IN INDIA | Azadi Ka Amrit Mahotsav

# मॅग्नेटिक महाराष्ट्र



## प्रमुख औद्योगिक समूह

- **मुंबई-ठाणे-रायगड । १५००० एकर**
  अभियांत्रिकी । अन्न प्रक्रिया । वाहन उद्योग व सुटे भाग । रसायने । औषधनिर्माण
- **पुणे-चाकण-तळेगाव-सातारा । ८००० एकर**
  डाटा सेंटर । रत्ने व आभूषणे । अभियांत्रिकी । अन्न प्रक्रिया । वाहन व सुटे भाग । इएसडीएम लॉजिस्टिक्स
- **नाशिक-मालेगाव-अहमदनगर । ५००० एकर**
  अन्न प्रक्रिया । वैद्यकीय उपकरण । इएसडीएम । अभियांत्रिकी
- **औरंगाबाद (AURIC, DMIC) - जालना । ८००० एकर**
  अन्न प्रक्रिया । वाहन व सुटे भाग । इएसडीएम । वस्त्रोद्योग
- **नागपूर- अमरावती । ४००० एकर**
  अंतराळ आणि संरक्षण । अभियांत्रिकी । वस्त्रोद्योग । अन्न प्रक्रिया
- **रत्नागिरी - सिंधुदुर्ग । ५,१५० एकर**
  अभियांत्रिकी । रसायने । तेल आणि नैसर्गिक वायू । शेती व अन्न प्रक्रिया । सागरी उत्पादने

## महाराष्ट्र : देशाचे आर्थिक शक्तीकेंद्र

- **भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था**
  महाराष्ट्राचे एकूण देशांतर्गत उत्पादन मूल्य ४२० अब्ज डॉलर्स; भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनामध्ये १४.२% योगदान
- **थेट परदेशी गुंतवणूकीमध्ये सर्वाधिक वाटा**
  एप्रिल २००० ते मार्च २०२३ या कालावधीत १८९ बिलियन डॉलर्स थेट परदेशी गुंतवणुकीस आकर्षित केले. भारताच्या एकूण वाट्यात ३०% योगदान.
- **उत्पादनात अग्रेसर**
  भारताच्या एकूण औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचे १३.८% योगदान
- **IPRS मध्ये सर्वोत्तम औद्योगिक क्षेत्रे**
  केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत (DPIIT) इंडस्ट्रियल पार्क रेटिंग सिस्टीम (IPRS) अहवालानुसार महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक सर्वोत्तम औद्योगिक क्षेत्रे
- **उत्तम कायदा व सुव्यवस्था**
  महाराष्ट्र राज्य हे प्रगतिक प्रशासन व धोरण सातत्यासाठी ओळखले जाते.
- **निर्यातीत अग्रस्थानी**
  महाराष्ट्राचे निर्यात मूल्य सर्वाधिक आहे. भारताच्या एकूण निर्यातीत १७.३% योगदान.
- **सर्वोत्तम गुणवत्तेचे मनुष्यबळ**
  भारतातील सर्वाधिक म्हणजे ७०% रोजगार क्षमता गुणवत्ता महाराष्ट्रात आहे.
- **समृद्ध पायाभूत सुविधा**
  ४ आंतरराष्ट्रीय आणि १३ देशांतर्गत विमानतळ, २ प्रमुख व ४८ लहान बंदरे आणि सर्वाधिक ऊर्जा क्षमता.

**एकूण गुंतवणूकीस चालना - रु ९,४६,७२६ कोटी**

**सामंजस्य करार - रु. ४,१९,२१२ कोटी**
(जून २०२० - जुलै २०२३)

**थेट परदेशी गुंतवणूक - रु. ४,०७,३२८ कोटी**
(ऑक्टोबर २०१९ - मार्च २०२३)

**नियमित गुंतवणूक - रु १,२०,१८६ कोटी**
(डिसेंबर २०२० पासून)

**वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२३ - प्रमुख कॉरिडॉर भागीदारांबरोबर धोरणात्मक गुंतवणूक सहकार्य करार:**

- स्वीस इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स इंडिया
- बर्कले विद्यापीठ
- सेंटर फॉर न्यू इकॉनॉमी अँड सोसायटी
- द वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम्स प्लॅटफॉर्म फॉर शेपिंग द फ्युचर ऑफ अर्बन ट्रान्सफॉर्मेशन

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION
।। उद्यमात् सकल समृध्दिः ।।
MIDC

मुख्य कार्यालय:
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
उद्योग सारथी, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००९३
**वेबसाईट:** www.midcindia.org

प्रमुख कार्यालय:
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
४ (ए), १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर कॉम्प्लेक्स १, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००५.
**वेबसाईट:** www.midcindia.org

## प्रमुख सुधारणा

१. **प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा**
एमएसएमईसाठी राखीव असलेल्या क्षेत्रातून २५% क्षेत्र (तब्बल १११२.५ एकर) प्लग अँड प्ले डेव्हलपमेंटसाठी आरक्षित केले जाईल.
महाराष्ट्र प्लग अँड प्ले इन्फ्रास्ट्रक्चर आणि कॅप्टिव्ह विक्रेत्यांसाठी परवडणाऱ्या भाड्याने शेड, सोयी - सुविधा, एक्स-पॅट हाऊसिंग आणि मॉड्युलर स्पेस १००% अनुकूल इकोसिस्टमसह वापरण्यास तयार असलेल्या पायाभूत सुविधांचा वापर करण्यासाठी गुंतवणूकदारांना थेट वाटप ऑफर करतो.

४. **गुंतवणूकदार प्रथम योजना- १५४ करार भागीदारांसाठी नेमणूक १० गुंतवणूक सहकारी**
संपूर्ण देखरेख आणि गुंतवणूकदारांना अविरतपणे आवश्यक सहाय्य पुरविण्याच्या उद्देशाने रिलेशनशिप मॅनेजर (आरएम) आणि रिलेशनशिप एक्झिक्युटिव्ह (आरइ) नियुक्त करण्यात आले आहेत.

## गुंतवणूक करारांवर स्वाक्षरी

उद्योग विभागाने एमआयडीसीसोबत जून २०२० ते जुलै २०२३ या कालावधीत रु. ४,१९,२१२ कोटी रुपयांचे १५४ सामंजस्य करार केले आणि ५,७४,८७६ ची संभाव्य रोजगारांची निर्मिती केली.

- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जून व जुलै २०२० - रु १७,६८६ कोटी । १४,०२५ रोजगार**
  सामंजस्य करार- १५ । आधारभूत क्षेत्रे - रसायने, वाहन, इएसडीएम, तेल आणि वायू । प्रमुख राष्ट्रे - युएसए, जपान, सिंगापूर, दक्षिण कोरिया
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२० - रु ३४,८२९ कोटी । २३,१८२ रोजगार**
  सामंजस्य करार- १५ । आधारभूत क्षेत्रे - डाटा सेंटर, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे - स्पेन, युनायटेड किंगडम, जपान, सिंगापूर, भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२० - रु ६१,०४२ कोटी । २,५५,३८० रोजगार**
  सामंजस्य करार- २५ । आधारभूत क्षेत्रे - डाटा सेंटर, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे - भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जुलै २०२१ - रु १६,५०० कोटी । ५,००० रोजगार**
  सामंजस्य करार- २ । आधारभूत क्षेत्रे - तेल आणि नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे - ऑस्ट्रेलिया, भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, सप्टेंबर २०२१ - रु ३५,५०० कोटी । १०,००० रोजगार**
  सामंजस्य करार-२ । आधारभूत क्षेत्रे - अक्षय ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे - भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, ऑक्टोबर २०२१ - रु २,८२३ कोटी । १,२५० रोजगार**
  सामंजस्य करार- १ । आधारभूत क्षेत्रे - विद्युत वाहने । प्रमुख राष्ट्रे - युके.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२१ - दुबई एक्स्पो २०२० - रु १५,६१७ कोटी । ११,३८५ रोजगार**
  सामंजस्य करार-२५ । आधारभूत क्षेत्रे - लॉजिस्टिक, ऑटो कॉम्पोनंट्स, ऑक्सिजन मॅन्युफॅक्चरिंग, डेटा सेंटर्स, जैवइंधन । प्रमुख राष्ट्रे - जपान, सिंगापूर, स्वीडन, कोरिया, जर्मनी, इटली व भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२१ व जानेवारी २०२२ रु ५,५१२ कोटी । ९,९८० रोजगार**
  सामंजस्य करार- १३ । आधारभूत क्षेत्रे - जैव-इंधन, IT/ITES, तांत्रिक वस्त्र, रसायने, ऑटो, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे - फ्रान्स आणि भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, मे २०२२ रु ८०,४७९.७८ कोटी । ९६,७०५ रोजगार**
  सामंजस्य करार- २५ । आधारभूत क्षेत्रे - आयटी पार्क, आयटी - आयटीइएस आणि डेटा केंद्रे, वस्त्रोद्योग, अन्न प्रक्रिया, पेपर आणि पल्प, अभियांत्रिकी आणि पोलाद, अक्षय ऊर्जा, लॉजिस्टिक, तेल व वायू । प्रमुख देश - सिंगापूर, इंडोनेशिया, यूएसए, दक्षिण कोरिया आणि जपान.
- **जेएसडब्ल्यू एनर्जी, सप्टेंबर २०२२ रु. ४,२०० कोटी । ३,२०० रोजगार**
  सामंजस्य करार - १ आधारभूत क्षेत्र - ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे - भारत
- **जागतिक आर्थिक मंच २०२३, जानेवारी २०२३ रु. १,३७,६६६ कोटी (१७ अब्ज अमेरिकन डॉलर्स) । १,०१,३८९ रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या-१९ । प्रमुख क्षेत्रे- ऊर्जा, उच्च तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा उद्योग, पोलाद उत्पादन, कृषी आणि अन्न प्रक्रिया, आयटी/फिनटेक/डेटा सेंटर । प्रमुख राष्ट्रे भारत, पोर्तुगाल, जपान, यूएसए, मॉरिशस, नेदरलँड, फिनलँड, सिंगापूर, कॅनडा, तैवान, लक्झेंबर्ग, इस्रायल, कोरिया, जर्मनी.
- **आयएफसीसीआय, इन्व्हेस्ट इन महाराष्ट्र, एप्रिल २०२३ रु. ९६७ कोटी । १,१८० रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या- ५ । प्रमुख क्षेत्रे - इलेक्ट्रिक वाहने, ऑटोमोबाईल, वैद्यकीय उपकरणे, आरोग्य, अन्न प्रक्रिया.
- **बजाज फिनसर्व्ह लिमिटेड, जून २०२३ रु. ५,००० कोटी । ४०,००० रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या - १ । क्षेत्र - आर्थिक सेवा । देश - भारत
- **पीएम - मित्रा पार्कचा शुभारंभ, अमरावती, जुलै २०२३ रु. १,३७० कोटी । २,२०० रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या - ५ । क्षेत्र - वस्त्रोद्योग

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची ४८

**ऑक्टोबर २०२३, वर्ष दहावे**
**अंक सहावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

BHIM UPI
SCAN & PAY
1000210529000008.9821032830@idbi

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**कल्याणी पांडे-साळुंके / ५**
परंपरेचा सात्त्विक स्पर्श

**डॉ. लतिका भानुशाली / ९**
सहृदयी कर्तृत्ववान!

**संजीवनी खेर / १२**
कॅनडाची शब्दप्रभू - ॲलीस मन्रो

**शरद काळे / १५**
बदलते जागतिक हवामान

**राजीव श्रीखंडे / २१**
सिद्धार्थ - हर्मन हेस

**सदानंद पुंडपाळ / २५**
एकनाथ आव्हाड - बालसाहित्यातील एक आनंदाचे पान

**किरण येले / २८**
अमराठी प्रदेशातील मराठी साहित्यिक - डॉक्टर संदीप भुयेकर

**प्रभाकर भिडे / ३१**
एका लेखकाची गोष्ट

**वृत्तांत / ३४**

ग्रंथपरिचय - **डॉ. निर्मोही फडके / ३८**

ग्रंथपाने - **चांगदेव काळे / ३९**

# संपादकीय...

नुकतंच ‘क’ आणि ‘ख’ या शीर्षकांच्या दोन पुस्तकांचं प्रकाशन झालं. वि.वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या बऱ्याच कथा, कविता वेगवेगळ्या नियतकालिकांत प्रसिद्ध झाल्या होत्या, परंतु त्या संग्रहित झाल्या नव्हत्या, ग्रंथरूपात आल्या नव्हत्या. अशा साहित्याचं प्रकाशन म्हणजे ही दोन पुस्तकं. डॉ. नागेश कांबळे यांनी अनेक वर्षं कुसुमाग्रजांच्या या साहित्याचं संकलन केलं. हे साहित्य संग्रहित व्हावं अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्याकडील या ठेव्याबद्दल दोन लेख प्रसिद्ध झाले, मात्र कोणी दखल घेत नाही हे त्यांचं शल्य पत्ररूपात ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये प्रसिद्ध झालं. ते अभिजित पानसे यांच्या वाचनात आलं आणि त्यांनी थेट नाशिक गाठलं. कांबळेसरांची भेट घेतली आणि हे सर्व साहित्य मला प्रसिद्ध करायला आवडेल, असं सांगितलं. ‘रावण पब्लिशिंग हाऊस’ या नावानं प्रकाशन संस्था काढून तिचा आरंभ ‘क’ आणि ‘ख’ या कुसुमाग्रजांच्या त्या निवडक साहित्याला ग्रंथरूप देऊन केला. अभिजित पानसे यांची दृष्टी आणि अभिजित पेडणेकर यांची साथ यातून हे ग्रंथ सिद्ध झाले. ‘ग्रंथाली’चा त्याच्या घडणीत सहभाग आहे. मराठी साहित्य-भाषाविषयक कोणीही, कुठेही सांस्कृतिक-मूल्यात्मक आणि ज्ञानवर्धक काम होत असेल त्यास ‘ग्रंथाली’ नेहमीच सहकार्य करत आली आहे, ते याही प्रकाशनास असणं स्वाभाविक आहे, अशा शब्दांत सुदेश हिंगलासपूरकर यांनी यातील ‘ग्रंथाली’च्या सहभागाबद्दल स्पष्ट करत, नवीन प्रकाशन संस्थेस शुभेच्छा दिल्या. त्या कार्यक्रमाचा वृत्तांत अंकात आहे.

भारतीय रागदारी संगीतातील दोन विदुषी मालिनीताई राजूरकर आणि माणिकताई भिडे यांचं निधन झालं. निष्ठेनं संगीतसेवा करून गुरू-शिष्य परंपरेचं महत्त्व सांगत त्यांनी श्रोत्यांना आपल्या स्वरांतून आनंद दिला. या दोघींवर कल्याणी पांडे-साळुंके यांनी लिहिलं आहे. तशाच डॉ. लतिका भानुशाली यांनी लेखिका विनता कुलकर्णी यांच्या आठवणी जागवत त्यांचं व्यक्तित्व उलगडलं आहे.

डॉ. शरद काळे संपादित ‘विज्ञानधारा’चा दिवाळी अंक ऑक्टोबर-नोव्हेंबर असा जोड अंक असणार आहे. ‘शब्द रुची’च्या अंकात ‘आपलं निसर्गऋण’ ते लिहीत असतात. पर्यावरणाचं भान देणारा लेख याही अंकात आहे. राजीव श्रीखंडे यांनी हर्मन हेस आणि संजीवनी खेर यांनी ॲलीस मॅन्रो या साहित्यिकांवर लिहिलेले लेख नेहमीप्रमाणे वाचनीय आणि माहितीपूर्ण आहेत. प्रभाकर भिडे यांनी महादेवशास्त्री जोशी यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल लिहिलं आहे. एकनाथ आव्हाड यांच्या ‘छंद देई आनंद’ या बालकवितासंग्रहाला २०२३चा बालसाहित्यासाठीचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. या पुरस्कारानिमित्त सदानंद पुंडपाळ यांनी एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा प्रवास उलगडला आहे. किरण येले, चांगदेव काळे यांचं लेखन आहे.

बदल ही एक बाब आहे जी नित्य घडत असते. मात्र गेल्या तीन दशकांत जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत त्यापूर्वी कधी झाले नाहीत इतक्या गतीनं बदल घडले आहेत. त्यानं माणसाचं जगणंच ढवळून निघालं आहे. नवसंस्कृती रुजत आहे. या बदलांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न ‘शब्द रुची’च्या दिवाळी अंकात केला आहे. नोव्हेंबर-डिसेंबर असा पुढचा जोड अंक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होईल.

**– अरुण जोशी**



कल्याणी पांडे-साळुंके

# परंपरेचा सात्त्विक स्पर्श

**आदरणीय** विदुषी मालिनीताई राजूरकर. दमदार आवाज, आवाजातला तंतू नि तंतू शास्त्रशुद्ध रियाजाने मोकळा झालेला. त्यामुळे अत्यंत प्रवाही आवाज. त्यांच्या काळात ध्वनिमुद्रणाचे तंत्र असे कितपत विकसित असेल? परंतु आवाजमध्येच इतका अप्रतिम घुमारा, की आताचे साउंड इंजिनीयर्स प्रयत्न करूनही स्टेजवर लावू शकणार नाहीत असा आवाज! नुसता आवाज जरी ऐकला की कान भरून टाकायची या दमदार आवाजातली ताकद! गायकीची विचारांमधली क्लॅरिटी, विचार येताक्षणी वळण्याची गळ्याची हुकमत, गायकीत नेटकेपणा, अत्यंत सहज भाव, अत्यंत सुरेल जलद, तरीही दाणेदार ताना.. रागमांडणीबद्दल काय सांगावे! माझ्या निरीक्षणाप्रमाणे मालिनीताई या अशा गायिका आहेत, ज्यांनी सर्वाधिक राग गाऊन श्रोत्यांसाठी ते उपलब्ध केले आहेत. आपल्याला येणारा प्रत्येक राग त्यांनी सर्वांसाठी उदार मनाने उपलब्ध करून पुढच्या अनेक पिढ्यांना उपकृत करून ठेवले आहे. प्रत्येक राग नीट सोडवलेला, त्या रागाबद्दलचा चौफेर विचार, रागसादरीकरणामधला बांधेसूद सहजपणा! नवीन गायकी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांनी गायलेले राग ऐकून ऐकून नुसते बसवले, तरी त्यांना ते राग अगदी नीट समजतील, इतके त्या मांडणीमधले शिस्तबद्ध सौंदर्य.

मालिनीताई ग्वाल्हेर घराण्याच्या गायिका होत्या. ग्वाल्हेर घराण्याची गायकी नेमकी आणि मुद्देसूद. फार फापटपसारा न करता विषय मांडणे. 'आवाज' हे रागाच्या सादरीकरणाच्या प्रक्रियेमधले केवळ एक माध्यम आहे, त्यामुळे सुरुवातीचे धडे गिरवतानाच आवाज कमावणे आणि नंतर मात्र संपूर्ण लक्ष रागमांडणीकडेच पुरवणे, हा या घराण्याच्या गायकीचा उद्देश आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही आणि हेच या गायकीचे गमक आहे, असे मला वाटते. विस्तृत सांगायचे झाले, तर जयपूर गायकीत आवाजाच्या लगावाला विशेष महत्त्व दिले जाते. आग्रा घराण्यात त्या विशिष्ट गायकीला, बोल-बनावाला जास्त महत्त्व दिले जाते; तर किराणा घराण्याच्या गायकीमध्ये गळ्यावर चढलेले मोजकेच राग घेऊन सादर करताना स्वरलगावांवर विशेषत्वाने लक्ष दिले जाते. ग्वाल्हेर गायकीत त्या मानाने खूप जास्त लक्ष रागमांडणीकडेच असते. राग उभा करणे, रागाचे गारुड करणे. त्यामुळे 'कहन'वर फोकस राहतो. या घराण्याच्या गायकीची लय ही अतिशय सहजसोपी, मध्यम लयीची असते. उद्देश अगदीच सरळ आहे, की एखादी 'गोष्ट' सांगायची पद्धत कशी असावी? तर लयबद्ध पकड घेणारी



मालिनीताई राजूरकर

असावी, अती संथ असू नये, रटाळ वाटू नये! तसा काहीसा विचार या गायकीत बऱ्याच अंशी केला गेलाय, असे मला वाटते. कोणतेही नाटकीय धाडस न घेता नीटस राग मांडणी करण्याचे संस्कार, ही गायकी गाणाऱ्या गवयांवर असतात. त्यामुळे बऱ्याचदा ही गायकी बाळबोध वाटत आली आहे. आलाप, ताना हे केवळ रागमांडणीमध्ये चढता क्रम दर्शवणारे

टप्पे. विनाकारण लय खेचून अती विलंबित ठेवणे किंवा अती जलद लयकारीमधून चमत्कृती निर्माण करण्याचा अट्टहास या गायकीत नाही. विनाकारण अति खर्जही नाही, की विनाकारण अती तारसप्तकात जाऊन परिणाम साधायची इच्छा नाही. मध्यलयीची मांडणी ही यासाठीच की आवर्तनाचा कॅनव्हास श्रोत्यांच्या नजरेच्या टप्प्यात असावा. अशा या मध्य लयीमुळे आकृतिबंध दिसत राहतो आणि ही गायकीतली बढत, नजरेच्या कक्षेत असल्यामुळे बढतीचे सर्व टप्पे लोकांना अनुभवता येतात. अशा अनेक बाबींमुळे ग्वाल्हेर गायकीत हरप्रकारचे राग सहजपणे मांडता येतात. कारण गायकीत मुळात क्लिष्टता नाही. अधिक अधिक सोपेपणाने राग मांडून त्याचे सौंदर्य लोकांपर्यंत कसे पोहोचेल आणि ते लोकांना कठीण न वाटता आपले वाटेल, सुगम वाटेल हा अंत:स्थ हेतू ग्वाल्हेर गायकीत दिसतो आणि त्यामुळे ग्वाल्हेर गायकी गाणारे गायक प्रामाणिकपणे यावर मेहनत करतात. त्यामुळेच आपल्या लक्षात येईल, की गांधर्व महाविद्यालयांतर्गत उपलब्ध अभ्यासक्रमाचे नीट शिक्षण घेत राहिले, तरी सात वर्षांत ते शिकणाऱ्यामधला 'कानसेन' तरी नक्कीच घडत जातो. तर अशा समृद्ध ग्वाल्हेर गायकीचा वारसा मालिनीताईंनी चालवला. या गायकीचा आविर्भावच 'सज्ञान करूनि सोडेन सकळ जन।', 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार।।' असा असल्याने मालिनीताईंनी अक्षरशः सर्वांना 'सज्ञान' करून सोडले. त्यांनी गायलेले सर्व राग सुटसुटीत, एकदम तयारीने गायलेले, कुठेही ढिसाळपणा नसलेले, एकदम फायनल फाइन प्रॉडक्ट म्हणूनच श्रोत्यांपर्यंत आले.

माझ्या गाणे शिकण्याच्या सुरुवातीच्या काळात माझ्या वडिलांनी ज्या दोन गायकांचे गायन मला अतिशय ऐकवले, ते म्हणजे मालिनीताई आणि पंडित कुमारगंधर्व. त्यावेळी कॅसेटवर मी यांचे राग अक्षरशः घासले आहेत. अगदी खरं सांगायचं तर त्या लहान वयात यांचे गायलेले राग पाठ केले आहेत. त्यांच्याच दिलफेक स्टाइलने आवाजाची नक्कल उतरवून गायले आहे. माझ्या नकळत त्यांचे गायन रक्तात भिनवले आहे. पुढे पुढे आपले गुरू शिकवत जातात. गायकीची नवीन दालने उघडून दाखवतात. परंतु एका सकस गायकीच्या सततच्या श्रवणभक्तीमुळे पुढे शिक्षणाचा प्रवास अधिकाधिक समृद्ध होत जातो, तसे झाले आहे.

मालिनीताईंशी मला कधी एक वाक्यही संवाद करण्याचे भाग्य लाभले नाही. त्या काळी असा ट्रेंडही नव्हता की मोठ्या कलाकारांबरोबर संवाद करावा, त्यांच्या बरोबर उभं राहून फोटो काढून घ्यावेत. इमानेइतबारे दर शनिवार-रविवार गिरगावपासून पार्ल्यापर्यंत ज्या सभागृहात गाणे असेल, तिथे वडिलांनी आपल्याला न्यावे, तिथे जे गाणे चालू असेल ते संपूर्ण ऐकावे, पायाला मुंग्या येईपर्यंत त्या रसिकांच्या गर्दीत कोंबून बसावे, जे ऐकतोय त्यातले डोक्यात काय शिरतेय हेही समजायचा स्कोप नसलेलं वय; परंतु स्टेजवर चालले आहे, ते उत्तम आहे आणि ज्या अर्थी वडिलांनी ऐकायला आणलेय, त्या अर्थी ते आपल्यासाठी बेस्ट आहे, या विश्वासाने ते भक्तिभावाने आपण ऐकायचे आहे, केवळ एवढीच भावना असायची. तेव्हा मला गर्दीत मधे कुठेतरी बसवून माझे वडील एक छोटेसे रेकॉर्डर जिथे स्पिकर ठेवला असेल तिथे घेऊन उभे राहायचे. परवानगी नसतानाही ते गायन रेकॉर्ड करायचे. त्या ठेवलेल्या मोठ्या स्पीकरजवळ आधीच तीन-चार 'अनधिकृत' छोटे छोटे रेकॉर्डर खोचून ठेवलेले असायचे आणि आपापल्या रेकॉर्डरवर डोळा ठेवून तिष्ठत उभी असलेली काही मंडळी तिथे रेंगाळत राहून 'नीट रेकॉर्ड होतंय ना', याकडे बारीक लक्ष ठेवायची! त्यांच्या मनात प्रचंड आतुरता असे, की आपण या 'स्वर्गीय स्वरां'ची चोरी करतोय आणि हे सुंदर चालू असलेले गाणे रेकॉर्डरमध्ये कैद करून नेणार आहोत आणि मग पुनःपुन्हा श्रवणभक्तीचा आनंद घेणार आहोत! असे घबाड घेऊन माझे वडील कार्यक्रम झाला की मला घरी घेऊन यायचे. नंतर मग सुरू व्हायचे त्या कॅसेटचे रिवाईंड आणि फॉरवर्ड! ही संपूर्ण मैफल कॅसेट झिजेपर्यंत ऐकली जायची. वडिलांनी हे सर्व दर्जेदार प्रत्यक्ष ऐकवून माझ्यावर किती उपकार केले आहेत हे मी शब्दात सांगू शकत नाही.

तर, त्या काळी अशा या मैफिली ऐकताना पं. कुमारजी, किशोरीताई, उस्ताद झाकीर हुसेनजी, पं. भीमसेनजी आणि पुढे वीणाताई सहस्रबुद्धे या सर्वांबरोबर मालिनीताईंनीही माझ्यावर गारुड केलं.

सुरुवातीला वडिलांनी जातीने ऐकायला नेले. पुढे पुढे जेव्हा जेव्हा मालिनीताईंचे गाणे मुंबईत असायचे, तेव्हा तेव्हा माझी तिथे हजेरी असायचीच. मला पक्की खात्री आहे की आम्ही कधी बोललो नसलो तरी त्यांनी कालांतराने माझ्या चेहऱ्याची नक्कीच नोंद घेतली असावी. कारण माझ्याकडे त्यांची नजर वळली की त्यांच्या नजरेत स्मित उमटायचे. त्यांच्या तेवढ्याच एका कृतीने किती छान वाटायचे! आता विचार करताना वाटते की मोठ्या कलाकारांमध्ये किती ताकद असते एक नवीन कलाकार घडवण्याची. त्यांचा एक प्रेमळ कटाक्ष पुरतो त्यावेळच्या बालमनाला हे पोचवायला की आपणसुद्धा गाणे शिकतोय. म्हणजे आता आपणसुद्धा याच परंपरेतले आहोत आणि आपल्यालाही यांच्यासारखंच गायचे आहे!

मी मालिनीताईंच्या ऐकलेल्या अनेक मैफिलींपैकी स्मरणात राहिलेली त्यांची मैफल म्हणजे आकाशवाणी संगीत संमेलनात त्यांनी गायलेला 'नारायणी' राग. इतकी सुंदर राग मांडणी, रागावरची पकड असलेले गाणे मी कधीच विसरू शकत नाही. 'बमना रे बिचार' आणि त्यानंतर 'सहेलरीया गावो री आज' या पारंपरिक बंदिशी माझ्या मनात कोरल्या गेल्या आहेत! त्या काळात बंदिशीचे अपूर्ण, अस्पष्ट उच्चार

करून गाणे ही पद्धत फार प्रचलित होती. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या घराण्याच्या बंदिशी लोकांना सहज कळू नयेत. मालिनीताईंनी आपल्या सुस्पष्ट उच्चारांनी हा पायंडा खोडून काढला. त्यांचे बंदिशीचे उच्चारण इतके सुस्पष्ट की गाणे चालू असताना बंदिशीचे शब्द कागदावर उतरवून घ्यावेत! टप्प्यासारखा अत्यंत कठीण गायनप्रकार त्यांनी लीलया पेलला. गळ्याची, श्वासाची एका अर्थाने यात परीक्षाच असते. आवाज पूर्णपणे ताब्यात असेल त्यांनीच हा प्रकार गावा. नाहीतर टप्पा अतिशय फसतो. तो वानगीदाखल गाऊन दाखवण्याचा प्रकार नव्हे; तर त्यात रंग जमला पाहिजे. 'ये बात!' अशी श्रोत्यांच्या तोंडून उत्स्फूर्त दाद निघाली पाहिजे! असे हे लचिले, रसिले टप्पे मालिनीताईंनी लीलया गाऊन आपणांसर्वांना वर्षानुवर्षे थक्क करून सोडले आहे.

अर्थात, त्यांच्या गायनाच्या या पार्श्वभूमीवर त्या व्यक्ती म्हणून किती गोड होत्या, याची नोंद घेतल्याशिवाय हे लिखाण संपन्न होऊ शकत नाही. अत्यंत साधा, तरी नीटनेटका पहेराव, आत्ता ओट्यावरचे काम जरा बाजूला ठेवून हात पुसत पुसत यावं आणि पदर कंबरेला खोचून एक कसदार तान घेऊन समेवर यावं! – इतकं त्यांचं गाणं आणि त्यांचं व्यक्तिमत्त्व एकमेकांत बेमालूम मिसळलं होतं. आपली घरचीच कोणी आई किंवा काकू असावी इतकी साधी सोज्ज्वळ राहणी; पण गाणं! एकदम तयार, घोटीव! मालिनीताईंचे गाणे ऐकताना मला नेहमी पाठीला आपले बाळ घट्ट बांधून घोड्यावर मांड ठोकून युद्धावर निघालेल्या झाशीच्या राणीची आठवण होत आलीय आणि ऊर आनंदाने भरून वाहिला आहे.

'मालिनीताई गेल्या' हे मनाला झेपत नाहीये. अतिशय समर्पित गायिका आज आपल्यातून गेली आणि आपल्यामागे एवढा मोठा स्वरांचा ऐवज सहजपणे सोडून गेली.



माणिकताइ भिडे

स्व. माणिकताईं भिडे यांच्या भेटीचा मला दोनदा योग आला. पहिल्यांदा, आकाशवाणीच्या रेकॉर्डिंगसाठी मी स्टुडिओत गेले असताना तिथे त्यांचे गायन ऐकले आणि दुसऱ्यांदा त्यांच्या घरी माझ्या एका मैत्रिणीबरोबर गेले असताना, त्यांची भेट घ्यायची संधी मिळाली. तेव्हा त्या अत्यंत प्रांजळ व्यक्तिमत्त्वाला मला प्रथमच भेटता आले. जयपूर अत्रोली घराण्याच्या गायकीचा शिस्तबद्ध अभ्यास केलेल्या माणिकताई पूर्वीपासूनच, म्हणजे मी एसएनडीटीमध्ये असतानाच माझ्या मनात घर करून राहिल्या होत्या. मी एसएनडीटी महाविद्यालयात संगीत घेऊन एम.ए. केले, तेव्हा मला आदरणीय स्व. डॉ. सरलाताई भिडे यांच्याकडे बरेच राग शिकण्याचे भाग्य लाभले. अत्यंत दर्जेदार जयपूर पद्धतीने त्यांनी आम्हाला हे राग शिकवले. राग शिकवण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. जेमतेम तिसऱ्या किंवा चौथ्या तासिकेला तो राग त्यांनी आम्हाला शिकवून झालेला असायचा आणि त्यात कुठेही लिखापढी नसे. कधीही नोटेशन म्हणणे नसे. सगळं स्वच्छ आकारात. तरीही त्यांनी गायलेल्या फ्रेजेस आजही मनात कोरल्या गेल्या आहेत. मी तिथे संगीत विषयात बी.ए. आणि एम.ए. दोन्ही केल्यामुळे सरलाताईंबरोबर माझा परिचय दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेला होता. पुढे पुढे सरलाताईंबरोबर अवांतर बोलणेही होऊ लागले होते. सुरुवातीला अत्यंत मितभाषी, जेमतेम स्मित करून पुन्हा गंभीर चेहरा करणाऱ्या सरलाताई, आमच्या एम.ए.पर्यंत आमच्याबरोबर खूपच मोकळ्या झाल्या. आम्हाला थोड्याशा शिष्ट वाटणाऱ्या सरलाताई, किती गोड आणि मृदू मनाच्या आहेत, त्या किती ज्ञानी आहेत आणि त्या कशा जयपूर गायकीबरोबर अत्यंत रसाळ ठुमरीही गातात, हे आम्हाला तेव्हा कळले. सरलाताई कधी कधी आपल्या घरी कोण कोण आहेत हे आम्हाला सांगायच्या. तेव्हा कळले की त्यांच्या घरी सगळेच उत्तम गायक आहेत. सगळेच जयपूर घराण्याचे गाणे गातात. मुक्ताताई या सरलाताईंची बहीण आणि माणिकताई त्यांच्या वहिनी. विदुषी अश्विनीताई भिडे माणिकताईंच्या सुपुत्री तसेच शिष्या आणि सरलाताईंची भाची. असा सगळा भिडे परिवाराचा नातेसंबंध आम्हाला एव्हाना स्पष्ट झाला होता. सरलाताई सांगायच्या की अश्विनी(ताई) जरी माणिकताईंची मुलगी असली तरी त्यांच्यासाठी ती 'शिष्या'च आहे आणि माणिकताई इतर शिष्यांप्रमाणेच अश्विनी(ताई)ला वागवतात. हे ऐकल्यावर माझी माणिकताईंबद्दलची जिज्ञासा अतिशय वाढली. (खरं तर माझे वडील मला आपली मुलगी कमी; शिष्याच जास्त– असे

वागवायचे आणि अत्यंत कठोर तालीम करून घ्यायचे. त्यामुळे अश्विनीताईंसाठीही अशीच शिस्त आहे हे सरलाताईंकडून कळल्यावर मला फारच बरे वाटले होते!)

माझ्या कॉलेजच्या मैत्रिणी मुक्ताताई भिडे यांच्याकडे रीतसर गायकी शिकायला जाऊ लागल्या. त्या दरम्यान मी अशोक रानडेसरांकडे तालमीला जाऊ लागले. रानडे सरांची ग्वाल्हेर गायकी आणि मुक्ताताईंची गायकी खास जयपूर! मग कधी कधी आम्हा मैत्रिणींमध्ये चर्चा व्हायची आपण शिकत असलेल्या गायकीची, घराण्याची, सांगीतिक विचारांची. आपापल्या गुरूंची मते आम्ही एकमेकींना सांगायचो. तर लक्षात आलं की या सर्व मंडळींना सर्व घराण्यांचा आदर आहे. मुक्ताताईंकडे माझ्या मैत्रिणी शिकताना कधी कधी माणिकताई तिथे येऊन बसायच्या. गायकांच्या विविध घराण्यांबाबतीतली त्यांची मते या लेखात आवर्जून नमूद करावीत, अशी आहेत. त्या सांगायच्या, की कोणताही विद्यार्थी गाणे शिकणे सुरू करताना कोणत्या ना कोणत्या घराण्याचे गाणे शिकायला सुरुवात करत असतो. आणि कोणतेही घराणे तुम्हाला चुकीचे काहीच शिकवत नाही. त्यामुळे कधीही घराण्यांना नावे ठेवू नयेत. पुढे पुढे नवीन वाटा चोखाळताना तुम्हाला इतर घराणी आणि त्यांची गायकी आवडेल आणि तुम्ही ती शिकायलाही जाल. त्यामुळे नेहमी मोकळ्या मनाने शिका. सगळी घराणी श्रेष्ठ आहेत म्हणूनच आज इतकी वर्षे रुजली आहेत. कोणतेही घराणे कमी दर्जाचे नाही. सगळ्या घराण्यांचा एकमेव उद्देश असतो की संगीतातून रसनिर्मिती करणे आणि आपल्या गायकीतून रागसौंदर्य मांडणे. त्यामुळे सगळ्या घराण्यांचे गाणे ऐका. आपण शिकत असलेली गायकी नीट आत्मसात करा. जेणेकरून तुम्हाला दुसऱ्या घराण्याचे वेगळेपण आणि परिणामी आपल्या घराण्याचे बलस्थान कळू लागेल. आणि त्यामुळे तुम्ही त्या गायकीचे सौंदर्य दिलखुलासपणे ॲप्रिशिएट करू शकण्यास पात्र व्हाल.

माणिकताई कधी कधी मोकळेपणाने सल्लेही द्यायच्या. त्या म्हणायच्या, तुमच्या अभ्यासक्रमात आहेत ते सगळे राग नीट शिका. कोणताही राग कंटाळवाणा नसतो. प्रत्येकाचे आपले सौंदर्य असते. तो राग सहा-सहा महिने गा. इतके गायल्यानंतर तुम्हाला त्या त्या रागांची सौंदर्यस्थळे दिसायला लागतील आणि मग तुम्हाला ते आवडायला लागतील. प्रत्येक राग गळ्यावर, मनावर चढावा लागतो. त्यासाठी वेळ द्यावा लागतो; तो वेळ द्या. त्या आणखी एक गोष्ट सांगायच्या. त्या म्हणायच्या, उद्या तुम्ही प्रसिद्ध गायिका व्हाल-न व्हाल, तुम्हाला खूप कार्यक्रम मिळतील-न मिळतील; पण रियाज करत राहा. कायम विद्यार्थी बनून राहा. शिकत राहा.

किती महत्त्वाची गोष्ट आहे ही! गाणे शिकण्याच्या प्रोसेसमध्ये अत्यंत ताकद देणारे असे हे वाक्य आहे, असे मला वाटते. कारण ही प्रोसेस अतिशय कठीण आणि प्रदीर्घ असते. त्यामध्ये अनेकदा निराशा येऊ शकते. हाती काही लागत नाही म्हणून सोडावे की काय अशीही भावना कित्येकांची बळावते. परंतु त्या मन:स्थितीसाठी माणिकताईंचे हे वाक्य प्रत्येक विद्यार्थ्याने मनात कोरून ठेवावे. जेव्हा जेव्हा निराशा येईल, तेव्हा तेव्हा हे वाक्य त्याला निश्चितच नवसंजीवनी देईल.

माणिकताईंनी अतिशय निरलसपणे जयपूर घराण्याच्या गायकीचा पाठपुरावा केला. त्या गायकीची बलस्थाने, सौंदर्य आपल्या गाण्यातून मांडले. स्वच्छ नितळ आवाज, मोकळ्या आकारातले गाणे, स्वरलगाव आपल्या गुरूप्रमाणेच; परंतु त्यात कुठेही कुरघोडी करण्याचा आविर्भाव नाही. मुळात त्यांच्या ते स्वभावातच नव्हते, असे दिसते. शांतपणे गाणे मांडणे. काहीही दाखवण्यासाठी गायचे, अशी त्यांची गायकीच नव्हती. त्यामुळे आजही यूट्यूबवर त्यांचे गाणे ऐकताना वाटते की त्या गाणे शिकवताहेत, राग उलगडून दाखवताहेत. आणि हे उलगडणे फार मोहक असते! गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर यांच्या परंपरेतल्या या गायिकेने त्यांच्या गायकीची वैशिष्ट्ये अत्यंत तयारीने आणि नेमकेपणाने मांडली. त्यांनी ही गायकी अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने त्या गायकीच्या सौंदर्यासकट आपल्या शिष्यांमध्ये संक्रमित केली. विदुषी अश्विनी भिडे-देशपांडे हे त्याचे अतिशय सुंदर उदाहरण आहे.

अशा रितीने संगीताने अतिशय भारलेले समृद्ध जीवन माणिकताई जगल्या. १३ सप्टेंबर २०२३ रोजी त्यांचे निधन झाले. मालिनीताई राजूरकरांपाठोपाठच तरुण पिढीसाठी गरजेचा असणारा आणखी एक आधार संपला! शास्त्रीय संगीतजगतात फार महत्त्वाचं स्थान प्राप्त केलेल्या या दोन अत्यंत प्रतिभावान गायिका याच वर्षी अवघ्या काही दिवसांच्या अंतराने संगीतविश्वाला पोरके करून गेल्या.

या दोन्ही महान गायिकांना या लेखाच्या माध्यमातून आदरपूर्वक नमन!

**– कल्याणी पांडे-साळुंके**
(शास्त्रीय गायिका. गुरू पं वसंतराव कुलकर्णी आणि डॉ. अशोक दा. रानडे)
भ्रमणध्वनी : ९२२४७७०५६७

**दिवाळी अंक संच योजनेत सहभागी व्हा!**
**पाच दर्जेदार दिवाळी अंकांसह मिळवा**
**दिवाळी पहाट कार्यक्रम**
**आणि**
**उत्तम कथांची दोन ऑडिओ बुक**



**डॉ. लतिका भानुशाली**

# सहृदयी कर्तृत्ववान!

'**ग्रंथाली**' गेली तीस वर्षे अमेरिका येथे बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे (बीएमएम) आयोजित होणाऱ्या अधिवेशनाला नेमाने भेट देते. मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार अमेरिकास्थित मराठी मंडळींपर्यंत नेणे, त्यांच्या पुढच्या पिढीसाठी साहित्य ऑडिओ स्वरूपात तयार करणे अशा अनेक बाबी या निमित्ताने साधल्या जातात. या दीर्घ प्रवासात अनेक अमेरिकन मराठी माणसे 'ग्रंथाली'शी जोडली गेली. काही सुहृद म्हणून तर काही लेखक म्हणून. 'ग्रंथाली'शी लेखक आणि सुहृद या दोन्ही नात्यांनी कायमचे जोडले गेलेले एक नाव म्हणजे विनता कुलकर्णी.

शांत लोभसवाणा चेहरा, मंद स्मित, प्रचंड अभ्यासू वृत्ती, लेखनाचा-वाचनाचा प्रचंड सोस असलेल्या विनताताई 'ग्रंथाली' परिवारातील एक आघाडीच्या लेखिका म्हणून आमच्याबरोबर जोडल्या गेल्या यात नवल काय ते.

माझी आणि त्यांची भेट बोस्टन येथे भरलेल्या बीएमएमच्या अधिवेशनात झाली आणि पुढेही या मैत्रीचे नाते टिकून राहिले. खरे तर त्या मूळच्या अमरावतीच्या. त्यांच्या कुटुंबात संस्कृत भाषा आणि आयुर्वेद यांचा प्रचंड प्रभाव होता. वडील आणि आजोबा दोघेही आयुर्वेदाचार्य. साहजिकच शिक्षणाची ही तेजस्वी परंपरा त्यांना वारसाहक्कानेच मिळाली. शाळेच्या इतिहासात दीर्घकाळानंतर एसएससीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकण्याचा मान त्यांनी मिळवला. इतर भावंडांचा कल भाषा म्हणजे कलाशाखेकडे असताना विनताताईंनी मात्र विज्ञानशाखा, त्यातही सांख्यिकीशास्त्र या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांनी नागपुरात पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिकवायला सुरुवात केली तेव्हा अनेक विद्यार्थी हे वयाने त्यांच्यापेक्षा मोठे होते!

लग्नानंतर कुटुंबाची जबाबदारी पेलत असतानाही त्यांनी शैक्षणिक बाजूवर लक्ष केंद्रित केले आणि एम.बी.ए.च्या विद्यार्थ्यांसाठी 'सांख्यिकी आणि ऑपरेशन संशोधन' या संदर्भात



विनता कुलकर्णी

चार पुस्तके लिहिली.

प्रचंड बुद्धिमत्तेची व्यक्ती किंवा सतत नवीनतेचा ध्यास असणारी व्यक्ती एकाच क्षेत्रात फार काळ रमू शकत नाही. विनताताईंच्या बाबतीत नेमके तेच झाले. तोच तो अभ्यासक्रम पुन्हा पुन्हा शिकल्यानंतर त्यातील आव्हान आणि रुची दोन्ही कमी झाले. त्यांच्यासाठी अध्यापकीय नोकरी नीरस ठरली. मग त्यांनी नवीन क्षेत्रे शोधायला सुरुवात केली. अर्थातच अमेरिकेत त्यांना हव्या असलेल्या सगळ्या संधी आणि आव्हाने उपलब्ध होतीच. त्यामुळे भारतातून त्या अमेरिकेत स्थलांतरित झाल्या. तिथे कारकिर्दीच्या अगदी मध्यभागी असताना त्यांना शिकागो येथील एका महाविद्यालयात शिकवण्याची संधी मिळाली आणि मग त्यांनी सर्वस्वी नवीन विषयात म्हणजे संगणक विज्ञानात पुन्हा पदव्युत्तर पदवी मिळवली आणि त्यानंतर लगेचच


'पीएचडी'ची पदवीदेखील प्राप्त केली. शिकागोत स्थिरावण्याच्या आधी बरीच वर्षे त्या कुटुंबासह टोरंटो येथे वास्तव्यास होत्या.


त्यांच्या विषयांच्या एकदम विरुद्ध अशा मराठी लेखनाकडे त्या वळल्या त्या आत्मीय ओढीनेच! वाचनाची प्रचंड आवड उपजत होतीच. त्यामुळे लेखिका म्हणूनही त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला. 'बृहन्महाराष्ट्र वृत्त' हे 'बीएमएम'तर्फे प्रकाशित होणारे मराठी मासिक. त्याच्या संपादकपदाची धुरा त्यांनी जवळ जवळ पंधरा वर्षे सांभाळली. त्यासाठी अमेरिकेतल्या मराठीजनांना आपल्या मातृभाषेत लिहिते करण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. त्यानिमित्ताने वेगवेगळ्या विषयांवरचे लेखन मराठीत आले. त्यांनी 'क्षितिज पश्चिमेचे', 'ठसे आठवांचे', 'पुस्तकचोर' आणि 'तरंग भवतालचे' अशी चार पुस्तके लिहिली. 'ग्रंथाली'च्या 'शब्द रुची' या मासिकासाठी त्या नियमित लेखन करत असत. एखादी नवीन माहिती मिळाली की सामान्य माणसाला समजेल अशा सोप्या भाषेत लिहिण्याची त्यांची हातोटी होती.


मी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या 'शिक्षण संक्रमण' या मासिकाच्या संपादकीय मंडळाची सदस्य होते. विनताताईंचे लेखनकौशल्य माहीत असल्याने मी त्यांना 'विद्यार्थ्यांच्या दृष्टीने काही लेख द्याल का?' अशी विनंती केली आणि त्यांनी ती आनंदाने मान्य केली. अमेरिकेतल्या 'आमिष' जमातीविषयावरचे लेख असोत की टाइमझोन या विषयी त्यांनी दिलेली माहिती असो, शिक्षकांनी त्यांच्या लेखांना प्रचंड प्रतिसाद दिला. 'शिक्षण संक्रमण' या मासिकाचे ३६,००० सदस्य आहेत. कारण हे मासिक महाराष्ट्राच्या सरकारमान्य शाळांमध्ये अनिवार्य आहे. त्यामुळे अक्षरशः महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून त्यांना लेखांवर आधारित प्रतिक्रिया ई-मेलच्या माध्यमातून येत असत. ग्रामीण महाराष्ट्रातील लोकांचा हा प्रतिसाद पाहून त्या खूप आनंदित व्हायच्या; आणि म्हणायच्या 'खऱ्या अर्थाने माझ्या लेखनाचा सामाजिक उपयोग होतोय.'

'न्यू यॉर्क टाइम्स'चे अनेक वर्षे बेस्टसेलर पुस्तक 'द बुक थीफ' हे स्थानिक लायब्ररीत त्यांच्या वाचनात आले. या पुस्तकाने त्या




प्रभावित झाल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मन कुटुंबातील होरपळून निघालेल्या छोट्याशा मुलीची म्हणजे लिझलची ही कथा आहे. या कादंबरीच्या निमित्ताने विनताताईंनी अनुवादाच्या क्षेत्रात प्रवेश केला. त्यांच्याकडे अत्यंत चिकाटी आहे. त्यामुळे एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की त्यांना स्वस्थ बसवतच नसे. त्यांनी 'ग्रंथाली'च्या मदतीने कॉपीराईटबाबत औचारिकता पूर्ण करण्यासाठी लेखक मार्क झुसॅक यांच्या कायदा कार्यालयाशी संपर्क साधला आणि चारशे पानांच्या या पुस्तकाच्या अनुवादाचे मोठे आव्हानात्मक काम पेलले. त्या म्हणतात, 'संख्याशास्त्रातील पीएच.डी. आणि हा अनुवाद या दोघांचे कार्य आव्हानात्मक आहे.' मला या पुस्तकावर पुस्तकपरिचय लिहून देण्यासाठी त्यांनी आग्रह केला. अनुवाद उत्तमच होता. काही ठिकाणी इंग्रजी भाषेच्या प्रभावामुळे वाक्यरचना खूप लांबलचक झाली होती त्यामुळे रसास्वादात अडथळा येत होता. मी पुस्तक परिचयात या बाबीची स्पष्ट नोंद केली. विनताताईंनी मोठ्या मनाने ते मान्य केले. त्यामागची कारणमीमांसा मला समजावून सांगितली आणि समीक्षकाचा मान म्हणून एकही टीकात्मक वाक्य न गाळता, स्वतः संपादक असलेल्या मासिकात ती समीक्षा तशीच्या तशी छापली. मनाचा इतका प्रांजळपणा हल्ली क्वचितच अनुभवायला मिळतो.

त्या खूप सामाजिक होत्या. संपादक म्हणून काम करताना अनेकांशी घट्ट नातेसंबंध त्यांनी जुळवले होते. त्यामुळे त्या गमतीने म्हणायच्या, की 'अमेरिका आणि कॅनडा या दोन्ही देशांत माझ्या स्वागतासाठी उत्सुक असलेली अनेक मित्रमंडळी आहेत.'

समाजाचे आपण काही देणे लागतो हा कृतज्ञताभाव त्यांच्या ठायी कायम होता. याच जाणिवेने त्यांनी अनेक वर्षे स्थानिक अमेरिकन रेड क्रॉससाठी काम केले. यामध्ये 'द पिलोकेस प्रोजेक्ट' हे त्यांचे आवडते काम होते. या उपक्रमांतर्गत ९ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांना आपत्कालीन परिस्थित उशीच्या कव्हरचा वापर पिशवी म्हणून कसा करायचा आणि महत्त्वाच्या वस्तू त्यात भरून घर सोडून बाहेर कसे पडायचे हे शिकवण्याचे काम त्या आवडीने करत असत.

आपली भारतातील मुळे आणि अमेरिकेत

कारकिर्दीच्या निमित्ताने बहरलेला व्यावसायिक वटवृक्ष यांचा त्यांना अभिमान होता.

व्यायाम आणि आहार यांचे पथ्य पाळणाऱ्या, नियमित योगा करणाऱ्या, पूर्ण शाकाहारी असणाऱ्या विनितातार्इंची तब्येत आजारपणाच्या शेवटच्या टप्प्यात वेगाने ढासळत गेली. तरीही हलका व्यायाम करण्यास त्या उत्सुक असायच्या. त्या श्रद्धाळू होत्या, पण 'परमेश्वरापर्यंत माझी प्रार्थना पोचण्यासाठी मंदिरात जाणे आवश्यक आहे' अशा मानणाऱ्यांतल्या नव्हत्या. २५ वर्षे अमेरिकेत राहूनही त्यांच्या घरी मुलाबाळांची आणि आईवडिलांची संवादाची भाषा ही मराठीच होती याचे पूर्ण श्रेय विनितातार्इंकडे जाते.

'२०२४चे बीएमएम अधिवेशनाचे रजिस्ट्रेशन कधी सुरू होणार आहे?' असा मी त्यांना मेसेज पाठवला आणि उत्तराची वाट बघत बसले होते. एरवी अमेरिकेतल्या रात्र-दिवसाच्या वेळांच्या गणिताच्या हिशोबाने त्याचे उत्तर मला लगेच येत असे. यावेळी मात्र कसलाच प्रतिसाद न मिळाल्याने मला काळजी वाटली. कामात असतील असे वाटले. त्यानंतर थेट त्यांचे पती अरविंद कुलकर्णी यांचा १० जुलै २०२३ रोजी त्या गेल्याचा संदेश आला. त्यांच्या आजारपणाची कोणतीच प्राथमिक कल्पना नसताना ही बातमी येणे हा 'ग्रंथाली' परिवारासाठी प्रचंड मोठा धक्का होता. हे कटू सत्य पचवणे खरेच कठीण आहे. अमेरिका आणि मराठी भाषा यांच्यात सेतू बांधण्याचे काम करणाऱ्या एक चांगल्या लेखिका आणि अनुवादक मराठी भाषेने गमावल्या आहे हे कधीही न भरून येणारे नुकसान आहे.

**- डॉ. लतिका भानुशाली**
bhanushali.latika@gmail.com

॥ग्रंथाली॥✲॥

## अवघा रंग.. एक झाला

### समरेंद्र निंबाळकर




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

''नायाधीश समरेंद्रची कविता
वाचायला सुरुवात केली...
सत्याचे विविध पैलू उलगडणारी,
मनाचे इंद्रधनुष्य रेखाटणारी,
मोगऱ्याचा सुगंध असणारी!


पण भावला, तो त्यातला
अंतःकरण छेडणारा
बासरीचा आर्त सूर!

... शेवटी जाणवली,
एका निखळ कवीची
ही नितळ प्रामाणिक कविता!''

**- न्या. मृदुला भाटकर**
माजी न्यायमूर्ती
उच्च न्यायालय, मुंबई

## दिवेलागणीच्या वेळी...

### जगदीश आचरेकर




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

मनकप्प्यात हृदयाच्या,
खळबळले जे जे काही
वापरून शाई मनाची,
लिहिले जे भुललो नाही

अनभिज्ञ मी लिहिताना
काय लपले मनांतरी
सांडता गुपित मनाचे,
वेचिले मी कागदावरी

शिरोमणी पाहतील का!
आरशात माझ्या मनाच्या
उघडतील का हो दारा!
सारस्वतांच्या प्रासादाच्या

शब्दच आहेत हस्तक,
करण्यासी तुम्हा भावुक
लिहिता झाले सवंगडी,
नव्हते ते मज ठाऊक

लिहूनी होताच कविता,
नमितो मी मातापित्यास
मायबाप तुम्हीही माझे,
पदरात घ्या पुस्तकास



**संजीवनी खेर**

# कॅनडाची शब्दप्रभू - ॲलीस मन्रो

**कॅनडा** वास्तविक इंग्रजी भाषक प्रदेश, अमेरिकेच्या जवळचा, पण वृतीने मात्र अगदी वेगळा. कॅनडामध्ये तेथील बर्फाला प्रदेश इन्कीडूसंस्कृतीचा प्रभाव तर अमेरिकेला मात्र त्याचा गंधही नाही, उलट तिरस्कारच. त्यामुळे आपल्या साहित्याला ते कमी लेखतात असा साहजिकच त्यांचा समज झालेला असल्याने आपले वेगळेपण सिद्ध करायचा प्रयत्न सुरू असतो. आज आपण २०१३च्या साहित्याचे नोबेल पारितोषिक प्राप्त झालेल्या ९२ वर्षीय साहित्यिकेचा परिचय करून घेणार आहोत.




ॲलीस मन्रो

फक्तलघुकथा लिहून जगप्रसिद्ध झालेली ही लेखिका. लग्नानंतर मुलांचे करण्यात कांदबरी लिहायला वेळ मिळाला नाही म्हणून मी लघुकथा लिहिल्या असे तिने नमूद करून ठेवले आहे. लहानपणापासून तीव्र बुद्धिमत्तेची ही लेखिका तेव्हापासूनच लेखन करत होती. घरी लेखनाचे वातावरण नव्हते. वडील मिंक फार्मर म्हणजे कोल्ह्याच्या कातडीपासून कपडे बनवण्याचा उद्योग करत होते. नंतर ते टर्की फार्मिंग करू लागले. आई आयरिश होती, शिक्षिका होती. घराची परिस्थिती बेताचीच होती. तिचा जन्म १० जुलै १९३१ रोजी विंगहॅम अन्टारिओ इथे झाला. माहेरचे आडनाव लेडलॉ. घरही गावातल्या तशा बेताच्याच आर्थिक स्तरातील लोकवस्तीत होते. तिच्यावर तिच्या आईचा नि आजीचा खूप प्रभाव आहे. पुढच्या काळात आईला पार्किन्सन आजार झाल्याने तिच्याकडे खूप लक्ष द्यावे लागे. तरुण वयात लिहायला सुरुवात केली असली तरी प्रकाशक मात्र तिच्या कथा परत पाठवत होते. घर नि मुलींची जबाबदारी यांमुळे तिच्या लेखनावर बऱ्याच मर्यादा येत होत्या. तिच्या कथांचा पहिला संग्रह होता 'डान्स ऑफ हॅपीशेड्स'.

तिची पहिली कथा 'डायमेंशन ऑफ ए शॅडो'. ती पौगंडावस्थेत असतानाच प्रकाशित झाली. तिला शाळा-कॉलेजमध्ये स्कॉलरशिप मिळत गेल्या नि तिचे शिक्षण पुरे झाले. इंग्लीश लिटरेचरची दोन वर्षांची शिष्यवृत्ती मिळवून तिने त्यात प्रावीण्य मिळवले, परंतु पदवी मिळवली नाही. काही काळ पत्रकारिताही केली. वयाच्या विसाव्या तिने जेम्स मन्रोशी लग्न केले. ती दोघे वेस्ट व्हँकूव्हरला राहू लागले. तिथे त्यांनी 'मन्रोज' नावाचे पुस्तकाचे दुकान काढले जे आजतागायात सुरू आहे. त्यांना शैला मन्रो, जेनी मन्रो, आणि कॅथरीन (ती कॅन्सरने गेली) अशा मुली आहेत. तिचे 'डीअर लाइफ', 'रन अवे', 'टू मच हॅपिनेस', 'हेटशिप', 'फ्रेंडशिप', 'लाईव्हज ऑफ गर्ल्स अँड विमेन', 'बॉइज अँड गर्ल्स' असे अनेक लघुकथा संग्रह आहेत. तिच्या लघुकथांची तुलना तेथील समीक्षक चेकाव्हशी करतात. तिच्या कथा छोट्या गावात घडतात. त्यांचा पुढे घटस्फोट झाला आणि तिने गेराल्ड फेमलीशी लग्न केले.

तिला २०१३ मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले. त्याअगोदर तिच्या प्रदीर्घ साहित्यिक कारकिर्दीत तिला तीनदा गव्हर्नर जनरल्सचे साहित्यविषयक पारितोषिक (कॅनडा) मिळाले. गिलर प्राईज दोनदा, मॅन बुकर इंटरनॅशल प्राईज अशी अनेक पारितोषिके मिळाली आहेत. तिच्या लेखनात स्थानिक संस्कृतीचे प्रतिबिंब असते. लोकल ते ग्लोकल असा तिच्या भावनांचा प्रवास आहे. ओंटारिओ प्रातांच्या ह्युरोन प्रदेशातील लोकांची जीवनशैली, जीवनमूल्य, संघर्ष यांचा समावेश तिच्या लघुकथांमध्ये असतो. फॉक्स आणि मिंक फार्मिंगमधील जीवन तिच्या लेखनात दिसते.

दुसऱ्या विवाहानंतर ती आणि पती गेराल्ड ओंटारिओला राहायला आले. पतीच्या मृत्यूनंतर ती आपल्या मुलींच्या शेजारील गावात क्लिंटन  इथे राहू लागली. वाढते वय आणि आजार यांमुळे तिला मुलींच्या जवळ राहणे अधिक सुरक्षित वाटू लागले. तिने साहित्यात वर्णन केलेला परिसर 'मन्रोप्रदेश' म्हणून आज ओळखला जातो. सर्वसामान्य स्त्रीपुरुषांच्या जीवनातले ताणतणाव, गूढ, खेद, निराशा सारे तिने बारकाईने टिपले आहे.




सुरुवातीच्या काळात तिच्या वाचनाच्या प्रचंड आवडीने ती सतत वाचत असे. मनातल्या मनात त्या वाचलेल्या कथांवर विचार करून त्यात आपल्या मनाने बदल करत असे. तिला आठवतेय ती 'द लिटल मरमेड'ची कथा. तिचं एका राजकुमारवर आत्यंतिक प्रेम असतं, पण ती त्याच्याशी लग्न करू शकत नसते कारण तिला पाय नसतात माशासारखे शेपूट असते. ती अत्यंत दुःखी असते. आणि तिच्या कथेने ॲलीसदेखील दुःखी होत असे. मग तिने त्या कथेचा सुखांत केला. 'द लिटल मरमेड'ने अनेक ऑपरेशन करून स्वतःला दोन पाय जोडून घेतले आणि तिने साऱ्या वेदना सहन करून सर्वसाधारण तरुणीसारखी ती झाली आणि मग तिने राजपुत्राशी लग्न केले. त्या काळात तिला दुखांत कथा अजिबात आवडत नसत. तिला ह्याची चिंता नसे की लोकांना हे आवडेल की नाही, पण स्वतःला जे पटते ते बदल तिने केले. ह्या साऱ्या प्रक्रियेत कधी चांगली गोष्टदेखील नष्ट होई पण काय करणार उत्स्फूर्ततेत असे काही होऊन जायचे. मग मात्र ते मुळीच आठवत नसे. ती मुळात गृहिणी होती. मुलींचे शाळेचे डबे करताना ती कथेचा विचार करत असे. गृहिणी असण्यात तिला कमीपणा वाटत नसे. मुद्दाम स्त्रीवादी भूमिका ती घेत नसे, पण ती जे लिहीत असे ते स्त्रीच्याच दृष्टीने असे. तिच्या मते ती ज्या प्रदेशात राहत होती तिथे लिहिण्यावाचण्याची कामे स्त्रिया करत. पुरुष शारीरिक कष्टाची कामे करत. त्यामुळे तिच्या कामाला महत्त्व येत असे. ती अनेकदा लिहिलेले पसंत न झाल्याने फाडून टाकत असे. पुन्हा लिहीत असे. नक्की कसे हवेय हे तिलाच ठाऊक नव्हते. मनाला ती गोष्ट भिडेपर्यंत ती लिहीत राही.

आईला पार्किन्सन आजार झाल्यावर ती चार लोकांत जाऊ इच्छित असे. तिचे बोलणे इतरांना कळत नसे. मग लोक हिच्याकडे पाहत. मग ही लोकांना सांगत असे. हा प्रकार तरुण वयात तिला खूप अस्वस्थ करत असे. परंतु आईचा उत्साह मात्र अनावर असे. तिला वाचनाची आवड होती. वडीलही वाचत असत. पण 'मी लिहितेय हे मी कुणाला सांगत नसे. स्त्रीच्या भावविश्वातल्या कथा लिहिण्यात मला आनंद होता. माझे बराच काळ गृहिणी असणे हे त्याला पूरकच होते.' त्यांनी पुस्तकाचे दुकान काढले तेव्हा सारे म्हणत ह्यात तुमचे कसे भागणार? आरंभी जरा कमी पैसे मिळाले, पण तिला लोकांना भेटायला मिळे. त्यांना पुस्तके शोधून देण्यात तिला आनंद वाटे. ते गर्दी नसताना तिच्याशी गप्पा मारत बसत असत. त्यात ते स्वतःच्या आयुष्यातील घटना सांगत प्रश्न सांगत. हा सारा ऐवज तिला कथेसाठी मिळत असे. असे सारे भवतालाच तिच्या कथेचा मसाला बनत असे. त्यावेळीही कथेपेक्षा कादंबरीला लेखनविश्वात महत्त्व होते. तिने एकदा अट्टहासाने कादंबरी लिहायला घेतली, पण अथक श्रमाने तिला जमली नाही. त्यानंतर आपल्याला जे उत्तम जमते तेच करायचा तिने निश्चय केला. ज्याचा परिणाम तिचे नाव साऱ्या विश्वात लोकप्रिय होण्यात झाला.

तिच्या 'पत्राची वाट पाहता!' या  कथेचा अंश देत आहे. ही एक लघुकथा तिच्या लेखनकौशल्याचे मर्म आपल्याला सांगेल. 'पत्राची वाट बघता बघता' ही उत्तम अनुवादमध्ये प्रकाशित झालीय. अनुवाद मीना साठे यांनी केला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरची गोष्ट आहे एका छोट्याशा खेड्यातली. बहुतेक लोक शेतकारी, अशिक्षित. एडी ही तरुण मुलगी डॉ. पिबल्स ह्या गुरांच्या डॉक्टरकडे घरकाम करत असे. त्यांची शेजारीण लोरेटा नेहमी गावच्या कुरापती येऊन सांगत बसत असे. एकदा ती आली ती धावत, 'अगोबाई, किती जोराचा विमानाचा आवाज आला, मला वाटलं तुमच्या घरावर विमान पडलं आणि तुम्ही सारे मेलात की काय?'

प्रत्यक्षात तसे काही नव्हते. ते विमान सहजपणे समोरच्या मैदानावर उतरले होते. गावात कळले की त्या विमानाचा चालक आता लोकांना त्यातून चक्कर मारून आणणार आहे. अर्थात पैसे घेऊन! डॉ. पिबल्स खुश झाले. 'मी नक्की त्यातून फिरून, आपलं गाव वरून कसं दिसतं ते पाहीन.' 'मी बाई बाहेरूनच बघेन.' सौ. पिबल्स म्हणाल्या तर मुले आनंदाने नाचू लागली.

साधारणपणे मन्रोच्या कथा ह्या प्रथमपुरुषी निवेदनातून उलगडतात. ह्या कथेत एडी ही कथा तिच्या नजरेतून सांगतेय. ती घरातील सगळी कामे अगदी मनापासून करत असते. घर चकाचक ठेवण्यात तिला आनंद वाटत असतो. एकदा मालकीण आणि घराची मंडळी बाहेर गेले असताना ती मॅडमचा वेडिंग गाऊन घालते. एवढ्यात बाहेरून एका पुरुषाचा आवाज येतो. एडी घाबरून जाते. तो म्हणतो, 'घाबरू नका. ते मैदानावरचं विमान माझं आहे. मला पाणी हवं आहे. घेऊ का बादलीभर? इथे बोअर वेल दिसली म्हणून आलो. मी ख्रिस. तुम्ही मालकीण बाई आहात? तुमचा काही नृत्याचा कार्यक्रम आहे?' ती 'पाणी घ्या' म्हणाली, पण 'मी मालकीण नाही काम करणारी आहे.' तो सहजपणे म्हणाला, 'तुम्ही खूप सुंदर आहात.' आजवर तिला असे कुणी म्हटले नव्हते.

घरी आल्यावर तिने घरच्यांना सांगितले की तो विमानवाला पाण्यासाठी येऊन गेला. 'तरुण होता का ग?' तिने काहीच उत्तर दिले नाही. रात्री घरातले मोठे शहरात सिनेमाला गेले. हिची झोप उडाली होती. ती हळूच घराबाहेर पडली. समोरचा रस्ता ओलांडून विमानाजवळ गेली. 'राईडसाठी आला असाल तर उद्या या.' तो खुर्चीवरून तिची चाहूल न पाहता बोलला. मागे वळून पाहून म्हणाला, 'अरे तुम्ही हो. या. कशा आलात?' 'माझ्या ड्रेसबद्दल माझ्या मालकिणीला बोलू नका. वचन द्या.' 'नाही सांगणार' हा पाहा माझ्या विमानातून फिरण्याच्या रेटचा बोर्ड. कसा वाटतोय?' इतक्यात तिला निजलेल्या मुलांची आठवण आली नि तिथून ती निघाली. कुणी आपल्याला पाहिले नसेल ना? विचार करत ती घरी आली, मुले निजलेली होती.

त्यानंतर ती ख्रिसला भेटली नाही. तो रोज पाणी न्यायला येत असे, पिबल्सबाई चार शब्द बोलत त्याच्याशी. एकदा मिस केलीग्ज नावाच्या रंगवलेल्या केसांच्या, फारशा तरुण नाही पण भडक कपडे घातलेल्या बाई त्यांच्या गाडीतून आल्या नि स्वत:ची ओळख देत म्हणाल्या, 'समोरच्या मैदानावरच्या विमानमालकाची मी प्रेयसी आहे.' पिबल्स आणि त्या दोघी म्हणाल्या, 'तो एवढ्यात येणार नाही आपण जरा बाहेर जाऊया. एडी, तू त्याला मी आल्याची बातमी देऊन ये इथेच बोलाव.' आपली खूप जुनी ओळख असल्यागत ती वागत होती. 'मी जाऊन ख्रिसला सांगितले. तो फारसा खुश वाटला नाही.' तिला आदल्या संध्याकाळी एडीने त्याच्यासाठी घेऊन गेलेल्या केकचा आस्वाद घेताना तिला जवळ ओढून चुंबन घेतले होते तेच आठवत होते. त्यानंतर तो रात्री जेवायलाही आला. पण त्यांच्यात फारसे प्रेम राहिले नसावेसे एडीला वाटले. दुसऱ्या दिवशी उलट ख्रिस सगळे गुंडाळून निघून गेलेला लक्षात आले. 'काही तुला निरोपाच्या वेळी बोलला कुठं जाणार ते!' 'तो बहुधा बेकफिल्डला गेलाय.'

जाताना तो एडीला म्हणाला होता, 'माझ्या पत्राची वाट पाहा. मी कळवीन कुठं आहे ते. तिथं येऊन भेट मला.' त्याने तिची हळुवार चुंबनं घेतली. ती मोहरून गेली. पिबल्सबाईंनी साऱ्या गोष्टी गुप्त ठेवायला सुचवले होते. तिची मदत त्यांना गमावायची नव्हती. एडी रोज ख्रिसच्या पत्राची वाट पाहत लेटरबॉक्सजवळ जाऊन उभी राहत असे. 'आज नाही आलं, उद्या नक्की येईल' तिला खात्री होती. असे अनेक दिवस गेले. थंडी सुरू झाली, पण अजून पत्र नव्हतं. ती घेऊन येणाऱ्या पोस्टमनला तिने विचारले, 'तुमचं नावं काय?' 'कारमायकेल' तिनं आशा सोडली नव्हती. एकदा एकच पत्र कारमायेकेलने बॉक्समध्ये टाकले. तिची खात्री होती हे नक्कीच ख्रिसचे असणार, पण ते बिल होते पाणीपट्टीचे. मग मात्र ती निराश झाली. तिने लेटर बॉक्सकडे जाणेच सोडले. तिला एकदा शेजारच्या घरून कारमायकेलचा तिच्याकरता फोन आल्याचे कळले. त्याने विचारले, 'कशा आहात तुम्ही? चार-सहा दिवस दिसला नाहीत, म्हणून काळजी वाटली. तुमच्या स्मितहास्यानं माझा दिवस सुरू होत असे. एक विचारायचं होतं. शहरात एक खूप प्रसिद्ध चित्रपट लागलाय. उद्या याल माझ्याबरोबर फिल्मला?' तिने हो म्हटले. त्यांच्या भेटीगाठी होत राहिल्या. आणि एकदा त्याने तिला मागणी घातली आणि त्यांचा सुखी संसार सुरू झाला. तिचा नवरा म्हणजे मायकेल मुलामुलींना त्यांची प्रेमकहाणी रंगवून सांगत असतो, की कशी त्यांची आई त्याच्यासाठी वेडी झाली होती. रोज त्याची वाट पाहत लेटर बॉक्सशेजारी उभी राहत असे. त्यातूनच त्यांची प्रेमकहाणी आकारली! एडी म्हणते कशाला त्याचा भ्रमनिरास करू?

किती साधी-सुंदर कथा आहे.

**- संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com

**'ग्रंथाली'च्या 'विज्ञानधारा' आणि 'आरोग्य'**
**या दोन यात्रा**
**२४ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत**
**महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांत योजल्या आहेत.**
**सहभागी व्हा.**



शरद काळे

# बदलते जागतिक हवामान

**हवामान** (climate) हे एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील वातावरणाचे (weather) दीर्घकालीन चित्र असते. वातावरणात दर क्षणाला, मिनिटाला किंवा तासाला बदल होत असतात. वातावरणातील तापमान, हवेची आर्द्रता, पडणारा पाऊस आणि हवेतील वाऱ्याचा वेग ह्या चारही गोष्टींची नोंद वेधशाळा ठेवत असते. तीस वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधीसाठी वातावरणाचे सरासरी वर्णन त्या क्षेत्राचे हवामान असते. वाळवंटात एखाद्या आठवड्यात पावसाळी वातावरण असू शकते, परंतु तेथील दीर्घकालीन हवामान मात्र कोरडे आहे, असेच त्याचे वर्णन केले जाते. वातावरण बदलत असले तरी प्रत्येक भूभागाचे हवामान मात्र स्थिर असते. प्रत्येक क्षेत्रात राहणारी जीवसृष्टी त्या क्षेत्रातील हवामानाशी जुळवून घेत असते. ध्रुवीय अस्वलांचे शरीर ध्रुवीय थंड हवामानात राहण्यासाठी अभिमुख झाले आहे म्हणजेच आजूबाजूला असलेल्या शीत वातावरणाशी त्यांचे शरीर जुळवून घेऊ शकते. तर निवडुंग वाळवंटी क्षेत्रातील कोरड्या आणि विषम हवामानात पाणी काटकसरीने वापरून, साठवून ठेवून, राहण्यासाठी विकसित झाले आहे. पृथ्वीवरील जीवसृष्टीची प्रचंड विविधता मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेल्या विविध क्षेत्रीय हवामानामुळे निर्माण होते. हवामानही बदलत असते. मात्र हवामानातील बदल एकदम होत नसतात. ते अगदी हळूहळू होत असतात. शेकडो किंवा हजारो वर्षांमध्ये हवामान बदलत असताना, परिसरात राहणारे सजीव परिस्थितीशी नकळतपणे जुळवून घेत असतात. तसे बदल त्यांच्यात झाले नाहीत, तर ते स्थलांतरित तरी होतात, किंवा नामशेष तरी होतात. आमच्या पुण्यात पूर्वी असा पाऊस पडत नव्हता किंवा पुण्याचे हवामान अतिशय प्रसन्न असायचे असे तेथील लोक जे म्हणत असतात, त्याचा संबंध रोजच्या वातावरणाशी नसून तेथील हवामानाशी असतो.

विसाव्या शतकाच्या मध्यापासून हवामानबदलाचा दर हजारो वर्षांमध्ये अभूतपूर्व असाच आहे. ४६० कोटी वर्षांच्या इतिहासात पृथ्वीचे हवामान अनेकदा बदलले असणार यात शंका असण्याचे कारण नाही. सूर्यापासून वेगळी झाल्यानंतर पृथ्वी सुरुवातीला तप्त गोळा होता व त्यानंतर काही कोटी वर्षांनी थंड होत असताना सजीवसृष्टीची उत्पत्ती झाली. फक्तगेल्या आठ लाख वर्षांमध्ये, बर्फयुग आणि उष्ण कालावधीची आठ चक्रे पूर्ण झाली आहेत, सुमारे ११,७०० वर्षांपूर्वी शेवटच्या हिमयुगाच्या समाप्तीसह आधुनिक हवामानयुगाची आणि मानवी संस्कृतीची सुरुवात झाली आहे. यातील बहुतांश हवामानबदल पृथ्वीच्या कक्षेत होत असलेल्या अगदी लहान फरकांमुळे घडले आहेत. या लहान वाटणाऱ्या फरकांच्या परिणामी सौरऊर्जेत बदल होत राहतात व त्याचे नेमके एकत्रित परिणाम हे हवामानबदलास कारणीभूत ठरतात. सध्याच्या तापमानवाढीचा प्रकार थोडा वेगळा आहे कारण त्याला नैसर्गिक कारणांच्या बरोबरीने मानवी हस्तक्षेप जबाबदार आहे. पृथ्वीभोवती फिरणारे उपग्रह आणि नवीन तंत्रज्ञान यामुळे शास्त्रज्ञांना मोठी मदत झाली आहे, आपल्या ग्रहाबद्दल आणि जगभरातील त्याच्या हवामानाविषयी विविध प्रकारची माहिती गोळा केली जात आहे. अनेक दशकांपासून गोळा केलेला हा प्रचंड माहितीचा खजिना बदलत्या हवामानाची चिन्हे आणि नमुने अधोरेखित करत आहे.

सन १८२४ मध्ये, जोसेफ फोरियर यांनी गणिताद्वारे सिद्ध केले की सूर्यापासून पृथ्वी जितक्या अंतरावर आहे, त्या अंतरावर ती आज आहे त्यापेक्षा जास्त थंड असायला हवी होती. त्याने सुचवले की वातावरणात असा काहीतरी थर आहे जो ब्लँकेटसारखे कार्य करत असावा. सन १८५६ मध्ये युनिस फूटने ते ब्लँकेट पृथ्वीच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साइड आणि पाण्याची वाफ यांनी बनलेले असल्याचे शोधून काढले आणि अतिरक्तकिरणांचे (इन्फ्रारेड) उत्सर्जन रोखण्यास ते जबाबदार असल्याचे प्रतिपादन केले. सन

१८६०च्या दशकात, भौतिकशास्त्रज्ञ जॉन टिंडल यांनी पृथ्वीचा नैसर्गिक हरितगृह परिणाम ओळखला आणि असे सुचवले की वातावरणातील रचनेत थोडासा बदल हवामानातील बदल घडवून आणू शकतो. सन १८९६ मध्ये, स्वीडिश शास्त्रज्ञ स्वंते अरहेनियस यांच्या एका महत्त्वपूर्ण शोधनिबंधानुसार प्रथम भाकीत केले की वातावरणातील कार्बन डायऑक्साइडच्या पातळीत होणारे बदल हरितगृह परिणामाद्वारे पृष्ठभागाच्या तापमानात लक्षणीय बदल करू शकतात. सन १९३८ मध्ये गाय कॅलेंडरने पृथ्वीच्या वातावरणातील वाढीव कार्बन डायऑक्साइडची सांगड जागतिक तापमानवाढीशी घातली. सन १९४१ मध्ये, मिलुटिन मिलनकोविक यांनी हिमयुगाचा संबंध पृथ्वीच्या कक्षीय वैशिष्ट्यांशी जोडला. गिल्बर्ट प्लास यांनी सन १९५६ मध्ये हवामानाच्या बदलासाठी कार्बन डायऑक्साइड सिद्धांताची मांडणी केली.

म्हणजेच शास्त्रज्ञांनी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात कार्बन डायऑक्साइड आणि मिथेन, नायट्रोजन ऑक्साइड यासारख्या इतर हरितगृह वायूंचे उष्णता शोषून घेण्याचे जे स्वरूप होते ते लक्षात आणून दिले. नासा ही प्रसिद्ध अवकाशसंस्था आपल्या ग्रहावरील हवामानाचा अभ्यास करण्यासाठी, अनेक आधुनिक विज्ञान उपकरणे व प्रणाली वापरून, हे वायू वातावरणातून अतिरक्त किरणांच्या (इन्फ्रारेड रेडिएशनच्या) हालचालीवर कसा परिणाम करतात यावर प्रकाश टाकण्याचा सातत्याने प्रयत्न करत असते. या वायूंच्या वातावरणातील वाढीचे २४ x ३६५ (वर्षभर) मोजमाप करून व होणाऱ्या परिणामांशी सांगड घालून, हरितगृह वायूंची पातळी वाढल्यानेच पृथ्वी उबदार होत आहे व त्याचे अनिष्ट परिणाम हवामानावर होत आहेत. ही पातळी वाढण्याची कारणे स्पष्टपणे १८००च्या दशकाच्या मध्यापासून मानवी हस्तक्षेपाचा परिणाम आहे आणि अलीकडील अनेक सहस्राब्दींमध्ये कधी न पाहिलेल्या व अनुभवलेल्या गतीने पुढे जात आहे. पृथ्वीच्या प्रणालीतील सूर्याच्या या अतिरिक्तऊर्जेमुळे वातावरण, महासागर आणि जमीन उबदार होत आहे आणि वातावरण, महासागर, क्रायोस्फीअर आणि बायोस्फियरमध्ये व्यापक आणि जलद बदल होत आहेत. पृथ्वीचे हवामान हरितगृहवायूच्या पातळीतील बदलांना प्रतिसाद देते असे ग्रीनलँड, अंटार्क्टिका आणि उष्णकटिबंधीय पर्वतीय हिमनद्यांमधून काढलेले बर्फाचे स्तंभ दर्शवतात. वृक्षांच्या वयदर्शक कड्या, समुद्रातील गाळ, प्रवाळ खडक आणि गाळाच्या खडकांच्या थरांमध्येही याचे प्राचीन पुरावे सापडतात. या प्राचीन, किंवा पॅलेओक्लाइमेट, पुराव्यावरून असे दिसून आले आहे की वर्तमान तापमानवाढ हिमयुगानंतरच्या तापमानवाढीच्या सरासरी दरापेक्षा अंदाजे दहा पट वेगाने होत आहे. मानवी हस्तक्षेपामुळे कार्बन डायऑक्साइडची वाढ शेवटच्या हिमयुगानंतर नैसर्गिक स्रोतांपेक्षा सुमारे अडीचशे पट वेगाने होत आहे. जलद हवामानबदलाचे वैज्ञानिक पुरावे सबळ असून विचारांना प्रवृत्त करायला लावणारे आहेत. ते पुरावे असे सांगता येतील.

**१. जागतिक तापमान वाढत आहे –** एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ग्रहाच्या पृष्ठभागाच्या सरासरी तापमानात सुमारे २ अंश सेल्सिअस फॅरनहिट किंवा सुमारे १ अंश सेल्सिअस इतकी वाढ झाली आहे, हा बदल मुख्यत्वे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन आणि इतर मानवी हस्तक्षेपामुळे झाला आहे. बहुतेक तापमानवाढ गेल्या ४०–५० वर्षांमध्ये झाली आहे. सर्वात अलीकडील वर्षे ही मानवी इतिहासातील सर्वात उष्ण वर्षे आहेत. सन २०16 आणि सन २०२० ही वर्षे विक्रमी सर्वात उष्ण वर्षे म्हणून नोंदली गेली आहेत.

**२. महासागर गरम होत आहे –** सन १९६९ पासून ०.६७ अंश फॅरनहिट किंवा ०.३३ अंश सेल्सिअस तापमानवाढीसह समुद्राच्या पृष्ठभागावरच्या १०० मीटर पाण्याने ही वाढलेली उष्णता शोषून घेतली आहे. पृथ्वी महासागरात ९० टक्के अतिरिक्तऊर्जा साठवते.

**३. बर्फाच्या थराची जाडी कमी होत आहे –** ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकाच्या बर्फाचे प्रमाण कमी झाले आहे. नासाच्या ग्रॅव्हिटी रिकव्हरी आणि क्लायमेट एक्स्परिमेंटमधील माहितीनुसार ग्रीनलँडने सन १९९३ ते सन २०१९ या दरम्यान दरवर्षी सरासरी २७९ अब्ज टन बर्फ गमावला, तर अंटार्क्टिकाने दरवर्षी सुमारे १४८ अब्ज टन बर्फ गमावला.

४. हिमनद्या मागे सरकत आहेत – आल्प्स, हिमालय, अँडीज, रॉकीज, अलास्का आणि आफ्रिका यासह जगभरातील जवळपास सर्वच हिमनद्या मागे सरकत आहेत.

**५. समुद्राची पातळी वाढत आहे –** गेल्या शतकात जागतिक समुद्रपातळी सुमारे ८ इंचांनी (२० सेंटीमीटर) वाढली. गेल्या दोन दशकांतील दर, तथापि, गेल्या शतकाच्या तुलनेत जवळजवळ दुप्पट आहे आणि दरवर्षी किंचित अधिक वेग घेत आहे.

**६. आर्क्टिक समुद्रातील बर्फ कमी होत आहे –** गेल्या अनेक दशकांमध्ये आर्क्टिक समुद्रातील बर्फाची व्याप्ती आणि जाडी दोन्ही वेगाने कमी होत आहे.

**७. नैसर्गिक अतिरेकी घटनांची वारंवारिता वाढत आहे –** जगभरात विक्रमी उच्च तापमानाच्या घटनांची संख्या वाढत आहे, तर सन १९५० पासून विक्रमी कमी तापमानाच्या घटनांची संख्या कमी होत आहे. तीव्र पावसाच्या घटनांची संख्याही वाढत आहे.

**८. महासागरातील आम्लीकरण वाढत आहे –** औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीपासून, पृष्ठभागावरील महासागराच्या

पाण्याची आम्लता सुमारे ३० टक्के वाढली आहे. ही वाढ मानवाने वातावरणात अधिक कार्बन डायऑक्साइड उत्सर्जित केल्यामुळे आणि तो महासागरात अधिक प्रमाणात शोषला जात असल्यामुळे होत आहे. अलीकडच्या दशकात एकूण मानववंशीय कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनाच्या २० आणि ३० टक्क्यांच्या दरम्यान उत्सर्जन समुद्राने शोषले आहे. टक्केवारीत हा हिशेब लक्षात येणे अवघड आहे, पण २०-३० टक्क्यांच्या दरम्यान म्हणजे निव्वळ आकडा प्रतिवर्षी ७.२ ते १०.८ अब्ज मेट्रिक टन इतका कार्बन डायऑक्साइड आहे, हे सांगितले तर त्याचे गांभीर्य लक्षात येईल व अनिष्ट परिणामविषयी मनात शंका उरणार नाही.

वर म्हटल्याप्रमाणे पृथ्वीवरील हवामान अनेक वेळा बदलले आहे. उदाहरणार्थ, क्रेटासियस कालखंडातील (१४.४ ते ६५ कोटी वर्षांपूर्वीचे) जीवाश्म दाखवतात की पृथ्वी आजच्यापेक्षा जास्त उष्ण होती. जीवाश्म स्वरूपात असलेली सजीवसृष्टी सामान्यतः आजच्यापेक्षा अधिक उबदार वातावरणात राहत होती आणि त्यांचे आजच्या काळात पृथ्वीवर ज्या भागात वास्तव्य आहे, त्यापेक्षा अधिक विस्तृत भूभागांवर ही सृष्टी राहत असावी असे पुराव्यानिशी म्हणता येते. उदाहरणार्थ, ब्रेडफ्रूट ट्री (आर्टोकार्पस अल्टिलिस) ही वनस्पती आता म ादागास्कर किंवा कॅरेबियन किंवा वेस्ट इंडिज या उष्णकटिबंधीय बेटांवर आढळते, पण एके काळी ती उत्तरेकडे ग्रीनलँडपर्यंत अस्तित्वात होती असे पुरावे उपलब्ध जीवाश्मांच्या माध्यमातून दिसतात. पृथ्वीने अनेक मोठ्या हिमयुगांचाही अनुभव घेतला आहे. गेल्या ५००,००० वर्षांत किमान चार हिमयुगे पृथ्वीवर येऊन गेली. या कालखंडात पृथ्वीचे सरासरी तापमान कमी झाले आणि हिमनद्या विस्तीर्ण होऊन बर्फाचे थर जाड होत गेले. सर्वात अलीकडील हिमयुग सुमारे वीस लाख वर्षांपूर्वी सुरू झाले आणि सुमारे वीस हजार वर्षांपूर्वी त्याने कळस गाठला. अठरा हजार वर्षांपूर्वी बर्फाच्या ध्रुवीय थराची जाडी कमी होऊ लागली. अर्थात ते पूर्णपणे वितळलेले नाहीत. अंटार्क्टिका आणि ग्रीनलँडमध्ये त्यांचे अस्तित्व ही पृथ्वी अजूनही हिमयुगात असल्याची जाणीव करून देते. बऱ्याच शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की आपण एका आंतरहिमाच्या कालखंडात आहोत आणि उष्ण तापमानामुळे बर्फाचा थर कमी होत आहे. परंतु येणाऱ्या काळात हिमनद्या पुन्हा वाढू शकतात आणि पुन्हा एकदा हिमयुग येऊ शकते.

हवामानशास्त्रज्ञ पृथ्वीवरील वेगवेगळया ठिकाणी भूतकाळातील हवामानबदलाचे पुरावे शोधत असतात. नवशिक्या गुन्हेगारांप्रमाणे हिमनद्या त्यांच्या मागे अनेक सुगावे सोडत असतात. त्या वाहत असताना खडकांना झिजवतात आणि विविध प्रकारचा गाळ जमा करतात. हा गाळ काही वेळा मोरेन नावाचे ढिगारे किंवा खडे बनवतो. ग्लेशियर्स ड्रमलिन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लांबलचक अंडाकृती टेकड्यादेखील त्या तयार करतात. सध्या हिमनद्या नसलेल्या जमिनीवरील या सर्व भौगोलिक वैशिष्ट्यांवरून असे सूचित होते, की तिथे एकेकाळी हिमनद्या अस्तित्वात होत्या. शास्त्रज्ञांकडे हिमनद्यांमधील गाळ आणि गाळाच्या खडकांपासून हिमयुगाचे रासायनिक पुरावेदेखील आहेत. काही खडक फक्त हिमनदीपासून बनतात. समुद्राखाली किंवा जमिनीवर त्यांची उपस्थिती शास्त्रज्ञांना सांगते की या भागात हिमनद्या होत्या. शास्त्रज्ञांकडे जीवाश्मशास्त्रीय पुरावे आहेत. जीवाश्म दर्शवतात की कोणत्या प्रकारचे प्राणी आणि वनस्पती विशिष्ट भागात राहत होते. हिमयुगात थंड हवामानाशी जुळवून घेणारे जीव विषुववृत्ताच्या जवळ जाऊन त्यांच्या भौगोलिक कक्षा वाढवू शकतात. उबदार हवामानाशी जुळवून घेणारे जीव त्यांच्या निवासस्थानाचा काही भाग गमावू शकतात किंवा नामशेषही होऊ शकतात. हवामानातील बदलही कमी कालावधीत होतात. उदाहरणार्थ, तथाकथित छोटे हिमयुग केवळ काहीशे वर्षे टिकले. इसवी सनाच्या सोळाव्या आणि सतराव्या शतकात त्याने शिखर गाठले. या काळात, सरासरी जागतिक तापमान १ ते १.५ अंश सेल्सिअस (२ ते ३ अंश फॅरनहिट) ते आजच्यापेक्षा थंड होते. एक किंवा दोन अंशांचा बदल कदाचित फारसा वाटणार नाही, परंतु मोठ्या प्रमाणावर प्रभाव पाडण्यासाठी ते पुरेसे असते. उदाहरणार्थ, हिमनद्या मोठ्या होत गेल्या आणि त्यांनी कधी कधी संपूर्ण पर्वतीय गावांना वेढल्याची उदाहरणे आहेत. हिवाळा नेहमीपेक्षा दीर्घ होता, त्याचा परिणाम म्हणजे पिकांच्या वाढीच्या हंगामावर मर्यादा येत होत्या. उत्तर युरोपमध्ये, लोकांनी उपासमार टाळण्यासाठी शेते आणि गावे सोडून स्थलांतर केले होते.

तीनशे वर्षांहून अधिक जुन्या झाडांच्या वलयांचा अभ्यास करून शास्त्रज्ञांना छोट्या हिमयुगाविषयी माहिती मिळाली आहे. झाडांच्या बुंध्यांवरील कड्यांची जाडी ही झाडांच्या वार्षिक वाढीच्या प्रमाणाशी संबंधित असते. या कड्याच्या जाडीतील बदल हा हवामानबदलांशी संबंधित असतो. दुष्काळ किंवा थंडीच्या काळात झाडे तितकी वाढू शकत नाहीत. त्यावेळी कड्या एकमेकांच्या जवळ असतात. हवामानातील काही बदल जवळपास अपेक्षित स्वरूपाचे असतात. उष्णकटिबंधीय पूर्व प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाच्या पाण्याच्या तापमानवाढीमुळे नियमित हवामानबदलाचे एक उदाहरण आहे. या तापम ानवाढीला एल निनो-द चाइल्ड म्हणतात. सामान्य वर्षांमध्ये, व्यापारी वारे पूर्वेकडून पश्चिमेकडे समुद्र ओलांडून सतत वाहतात आणि उबदार पृष्ठभागाचे पाणी त्याच दिशेने खेचतात. यामुळे पूर्व पॅसिफिकमध्ये उबदार पाण्याचा उथळ थर निर्माण होतो आणि पश्चिमेला उबदार पाण्याचा साठा निर्माण होतो. दर काही वर्षांनी, सामान्य वारे वाहतात आणि सागरी प्रवाह उलटतात.

हा एल निनो परिणाम आहे. पूर्व पॅसिफिकमध्ये उबदार पाणी खोल होत आहे. यामुळे, नाट्यमय हवामानबदल घडतात. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आशियामध्ये पाऊस कमी होतो आणि विनाशकारी वादळे पॅसिफिक बेटे आणि अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीला धडकू शकतात. एक किंवा दोन वर्षांत, एल निनो संपतो आणि हवामानप्रणाली सामान्य होते.

**हवामानबदलाची नैसर्गिक कारणे**

हवामानातील बदल विविध कारणांमुळे होतात. यापैकी काही कारणे पृथ्वीच्या वातावरणाशी संबंधित आहेत. एल निनोने आणलेला हवामानबदल वारा आणि सागरी प्रवाहांवर अवलंबून असतो, हे नैसर्गिक वातावरणातील बदलांचे उदाहरण आहे.

नैसर्गिक हवामानबदल पृथ्वीच्या वातावरणाबाहेरील शक्तींमुळेदेखील होऊ शकतो. उदाहरणार्थ, हिमयुगाचे एक लाख वर्षांचे चक्र बहुधा पृथ्वीच्या अक्षाच्या झुकण्यामुळे आणि सूर्याभोवतीच्या तिच्या कक्षेतील बदलांशी संबंधित आहेत. हे ग्रहाशी संबंधित घटक कालांतराने हळूहळू बदलतात आणि सूर्याची ऊर्जा वेगवेगळ्या ऋतूंमध्ये पृथ्वीवरील विविध भागांमध्ये किती पोहोचते यावर वेगवेगळे परिणाम करतात.

पृथ्वीवरील मोठ्या उल्कापातामुळे हवामानात बदल होऊ शकतात. उल्कांच्या प्रभावामुळे लाखो टन मातीसारखा पदार्थ वातावरणात जातो. हा ढिगारा सूर्याची किमान काही किरणे तरी रोखून धरू शकतो, त्यामुळे वातावरण थंड आणि दाट (dense) होते. या हवामानातील बदलामुळे कोणते जीव जगू शकतील यावर मर्यादा येऊ शकतात. अनेक जीवाश्मशास्त्रज्ञ मानतात की उल्का किंवा धूमकेतूच्या प्रभावामुळे डायनासोर नष्ट होण्यास हातभार लागला. डायनासोर थंड आणि दाट अशा हवामानात जगू शकले नाहीत. त्यांचे शरीर थंडीशी जुळवून घेऊ शकले नाही आणि धूसर अंधारसदृश वातावरणात ज्या वनस्पती त्यांना अन्न पुरवत होत्या, त्यांची वाढ खुंटली. परिणामस्वरूप डायनोसोर नामशेष झाले.


प्लेट टेक्टोनिक्सदेखील हवामानबदलांमध्ये भूमिका बजावतात. पृथ्वीच्या महाद्वीपीय प्लेट कालांतराने मोठ्या प्रमाणात हलल्या आहेत. तीस कोटी वर्षांपूर्वी, पृथ्वीवरील त्यावेळचे खंड एक महाकाय भूभाग म्हणून एकत्र विलीन झाले. त्याला पँगिया (Pangaea) असे म्हणतात. पँगिया हा ग्रीक शब्द असून त्याचा अर्थ पृथ्वीवरील सर्व जमीन असा आहे. पुढे कालांतराने (वीस कोटी वर्षांपूर्वी) जसजसे पँगिया तुटले आणि हलले तसतसे पृथ्वीवरील त्यांची स्थिती बदलली आणि सागरी प्रवाहांच्या हालचालीही बदलल्या. त्यातून आज अस्तित्वात असलेले खंड निर्माण झाले. या दोन्ही बदलांचा परिणाम हवामानावर झाला.

वातावरणातील हरितगृहवायूंमध्ये होणाऱ्या बदलांचाही परिणाम हवामानातील बदलांवर होतो. कार्बन डायऑक्साइडसारखे वायू पृथ्वीच्या वातावरणात सूर्याची उष्णता शोषून घेतात. त्यामुळे पृष्ठभागावरील तापमान वाढते. जमिनीवर आणि समुद्राखाली ज्वालामुखीचे उद्रेक झाले तर त्यातून हरितगृहवायू उत्सर्जित होतात, त्यामुळे उद्रेक फक्त ट्रोपोस्फियरपर्यंत (पृथ्वीलगत ते १७-१८ किलोमीटर अंतरावर असलेला वातावरणाचा थर) पोहोचला तर अतिरिक्तवायू जागतिक तापमानवाढीस हातभार लावतात. तथापि, उद्रेक स्ट्रॅटोस्फियरपर्यंत (वातावरणातील १८ ते ५० किलोमीटरवरचा थर) पोहोचण्याइतपत शक्तिशाली असेल तर ते कण सूर्यप्रकाश परत अंतराळात परावर्तित करतात. त्यामुळे क्षेत्रीय पातळीवर थंडावा निर्माण होतो व तो बराच दीर्घ काळ टिकतो.

**हवामानबदलाची मानवी कारणे**

औद्योगिक क्रांती आणि विज्ञानातील आश्चर्यकारक शोधांनी मानवी जीवन कधी नव्हे तेवढे सुखी आणि आराम दायक बनवण्यात मोठा वाटा उचलला आहे. त्यातून बरेच प्रश्नही निर्माण झाले आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा भागवण्यासाठी उद्योगक्षेत्र गतिमान झाले. त्यातील बरेचसे मानवी उद्योग हरितगृहवायू उत्सर्जित करतात. वाहतूक आणि जीवाश्मइंधन जाळून ऊर्जानिर्मिती ही त्याची उदाहरणे आहेत. झाडे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, त्यामुळे लाकूड किंवा विकासासाठी जंगले तोडणे हरितगृह परिणाम घडवून आणते. रासायनिक कारखाने वातावरणात कार्बन डायऑक्साइडच्या जोडीला सल्फर डायऑक्साइड, हायड्रोजन सल्फाइड, नायट्रोजन ऑक्साइड असे विविध प्रकारचे प्रदूषक वायू सोडतात. ह्या सर्वांचा संबंध जागतिक हवामानबदलाशी अगदी जवळचा आहे.

या विविध कारणांमुळे पृथ्वीच्या हवामानात नाट्यमय आणि धोकादायक बदल होत आहेत. सन १८८० पासून जगभरातील सरासरी तापमानात वाढ झाली आहे. शास्त्रज्ञांनी त्यांचा मागोवा घेण्यास सुरुवात केली. विसाव्या शतकातील सात सर्वात उष्ण वर्षे १९९०च्या दशकात आली होती. हा तापमानवाढीचा कल मानवी हस्तक्षेपामुळे हरितगृह परिणाम वाढत असल्याचे लक्षण असू शकते. जागतिक तापम ानवाढीचा संबंध अनेकदा उद्योग आणि स्वयंचलित वाहनांद्वारे जीवाश्मइंधन-कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू जळण्याशी असतो. तापमानवाढ उष्णकटिबंधीय जंगलांच्या नाशाशीदेखील जोडलेली आहे. कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी रिव्हरसाइड आणि नासाच्या अंदाजानुसार मानवी क्रियाकलापांमुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण गेल्या दीडशे वर्षांत सुमारे तीस टक्क्यांनी वाढले आहे. मिथेन हा एक अतिशय प्रभावी असलेला हरितगृहवायू वनस्पती आणि प्राणीपदार्थांचे




विघटनातून तयार होतो. पृथ्वीच्या वातावरणात मिथेनचे वाढलेले प्रमाण हे सहसा कृषीविकास आणि औद्योगिक तंत्रज्ञानाशी जोडलेले असते. जसजशी अर्थव्यवस्था वाढत जाते तसतसे लोक अधिक वस्तूंचा वापर करतात आणि अधिक साहित्य फेकतात. कुजणाऱ्या कचऱ्याने भरलेले मोठे लँडफिल्स वातावरणात टनावारी मिथेन सोडत असतात. कार्बन डायऑक्साइडच्या तुलनेत मिथेनचा हरितगृह प्रभाव एकवीस पट अधिक आहे.

क्लोरोफ्लोरोकार्बन (सीएफसी), हायड्रोक्लोरोफ्लोरोकार्बन (एचसीएफसी), आणि हायड्रोफ्लोरोकार्बन (एचएफसी) रसायने रेफ्रिजरेशन आणि एरोसोल स्प्रेमध्ये वापरली जातात. ही रसायनेदेखील हरितगृहवायू आहेत. अनेक देश त्यांचा वापर टप्प्याटप्प्याने बंद करण्यासाठी काम करत आहेत आणि काही देशांमध्ये कंपन्यांना त्यांचे उत्पादन करण्यापासून रोखण्यासाठी कायदे आहेत. १९९०च्या दशकात या रसायनांमुळे ओझोनच्या संरक्षक कवचाला मोठे भोक पडले आहे! आता त्यात सुधारणा होत आहे.

**जागतिक तापमानवाढ**

वातावरणातील हरितगृहवायूंचे प्रमाण जसजसे वाढते तसतसे त्यांनी शोषलेल्या अधिक उष्णतेमुळे पृथ्वीचे तापमानही वाढते. हवामानशास्त्रज्ञांना काळजी वाटते की जागतिक तापमान इतके वाढेल की पुढील काही दशकांत बर्फाचे ध्रुवीय थर वितळण्यास सुरुवात होईल. यामुळे समुद्राची पातळी वाढेल. अनेक सखल बेटांसह किनारपट्टी भागात पूर येईल. किनारी प्रदेशातील लोकवस्तीला त्याचा फार मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहेच. तीव्र हवामानबदलामुळे अधिक चक्रीवादळे, टोर्नेडो येतील. काही ठिकाणी जास्त पाऊस पडेल तर काही ठिकाणी खूपच कमी. ज्या प्रदेशात आता पिके उगवतात ते प्रदेश वाळवंट बनू शकतात.

जसजसे हवामान बदलते तसतसे सजीवांच्या अधिवासातही बदल होतो. परिसरात राहणारे प्राणी धोक्यात येऊ शकतात. सर्वच ठिकाणी मानवी समाज अन्न, वस्त्र आणि व्यापारासाठी विशिष्ट पिकांवर अवलंबून असतात. एखाद्या क्षेत्राचे हवामान बदलल्यास, तेथे राहणारे लोक यापुढे जगण्यासाठी अवलंबून असलेली पिके घेऊ शकणार नाहीत. काही शास्त्रज्ञांना काळजी वाटते की जसजसे पृथ्वीचे तापमान वाढते तसतसे उष्णकटिबंधीय रोग जसे की मलेरिया, वेस्ट नाईल विषाणू आणि पिवळा ताप यांचे प्रमाण समशीतोष्ण प्रदेशांमध्ये वाढत जाईल.

प्रतिबंधात्मक पावले उचलली नाही तर तापमान वाढतच राहील. बहुतेक हवामानशास्त्रज्ञ सहमत आहेत की आपण वातावरणात सोडलेल्या हरितगृहवायूंचे प्रमाण कमी केले पाहिजे. हे करण्याचे अनेक मार्ग आहेत–

- स्वयंचलित खाजगी वाहनांची संख्या खूप कमी झाली पाहिजे. सार्वजनिक वाहतुकीचा वापर, स्वयंचलित वाहने भागीदारीत चालवणे आणि शक्य असेल तिथे पायी चालणे आवश्यक आहे.
- कमीत कमी हवाईप्रवास करावा. विमाने मोठ्या प्रमाणात


हरितगृहवायू उत्सर्जन करतात.

- वापर कमी करा, वस्तू पुन्हा पुन्हा वापरा आणि पुनर्चक्रांकन करा. ही त्रिसूत्री अतिशय महत्त्वाची आहे व जास्तीत जास्त लोकांनी तिचा स्वीकार करण्यासाठी प्रभावी जनजागृतीची गरज आहे.
- एक तरी झाड लावा आणि ते जगवा. झाडे कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, शिवाय प्रत्येक वृक्ष हा कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा कल्पवृक्ष असतोच. त्याची विविध प्रकारे मदतच होते.
- जिथे शक्य असेल तिथे ऊर्जेचा वापर कमीत कमी करा.
- गायी आणि भातशेती सर्वात मोठ्या मिथेन उत्पादकांपैकी आहेत. त्यामुळे गायीच्या शेणापासून वीजनिर्मिती करून मिथेनची विल्हेवाट लावता येते.
- सौरऊर्जा आणि पवनऊर्जा यासारख्या जीवाश्मइंधन न वापरणाऱ्या पर्यायी ऊर्जास्त्रोतांचा वापर अधिकाधिक प्रमाणात झाला पाहिजे.

पृथ्वीचे हवामान तिच्या संपूर्ण इतिहासात बदलते राहिलेले आहे. असे होत आहे हे खरे असले, तरी गेल्या काही थोड्याच दशकांमधील सध्याची तापमानवाढ ही गेल्या दहा हजार वर्षांत कधीही न नोंदवलेल्या दराने होत आहे ह्याकडे दुर्लक्ष करता येणे शक्य नाही. इंटरगव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंजनुसार, (IPCC) सन १९७०च्या दशकात पद्धतशीर वैज्ञानिक मूल्यांकन सुरू झाल्यापासून, हवामान प्रणालीच्या तापमानवाढीवर मानवी हस्तक्षेपाचा प्रभाव केवळ पुस्तकी सिद्धांताच्या स्वरूपात राहिलेला नसून प्रत्यक्षात होत असलेला दिसत आहे. हे सिद्ध करण्यासाठी उत्तरध्रुवावरील बर्फाचे स्तंभ, खडक आणि झाडांच्या बुंध्यांवरील वयदर्शक कड्यांसारखे अनेक वैज्ञानिक पुरावे आपल्याकडे उपलब्ध आहेत. जागतिक तापमानवाढीपासून बर्फाच्या वितळण्यापर्यंत, पृथ्वीवर होत असलेल्या तापमानवाढीचे पुरावे उपग्रह आणि आधुनिक उपकरणांनी गोळा केलेल्या वैज्ञानिक माहितीतून बदलत्या हवामानाची चिन्हे स्पष्टपणे दिसून येत आहेत. ज्या बुद्धिमत्तेचा वापर करून मानवाने वैज्ञानिक प्रगतीची विविध शिखरे सर केली आहेत त्याच बुद्धिमत्तेचा वापर आता पृथ्वीवर होणाऱ्या या जागतिक हवामानबदलाचा सामना करण्यासाठी करायचा आहे. यात फक्तनवीन नवीन शोधच लागले पाहिजे असे नसून माणसाने आपली जीवनशैली बदलणे आवश्यक झाले आहे. आपले जीवन आरामदायी असावे असे सगळ्यांनाच वाटते, पण त्यातून विनाशाची बीजे पेरली जाणार असतील तर त्याचा गांभीर्याने विचार करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे पर्यावरणाशी समतोल राखणारी जीवनशैलीच आपल्याला या संकटातून सोडवू शकते.

**– शरद काळे**
sharadkale@gmail.com

॥ग्रंथाली॥





## गल्फस्थ

**सतीश थत्ते**

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

'गल्फस्थ' मजेशीरही आहे; भरपूर माहितीही देतं आणि मध्यपूर्वेशी संबंधित असलेल्यांना पुनःप्रत्ययाचा आनंदही देतं. हनिवेलच्या मधाच्या विहिरीचा गोडवा ल्यालेलं हे पुस्तक छान वाचनीय झालेलं आहे.

**– डॉ. उज्ज्वला दळवी**




## आरवली से अरावली

**प्रकाश अंबुरे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

प्रकाश अंबुरे लिखित 'आरवली ते अरावली'
या प्रेरणादायी आत्मकथनाच्या
हिंदी अनुवादाचे प्रकाशन
नुकतेच राजस्थानमधील ब्यावर येथे झाले.



राजीव श्रीखंडे

# सिद्धार्थ - हर्मन हेस

## Siddhartha by Hermann Hesse

**हर्मन** हेस हा एक जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिक विजेता जर्मन लेखक. कवी, कादंबरीकार आणि चित्रकार म्हणून त्याने दिगंत कीर्ती मिळवली.

हेसचा जन्म १८७७ मध्ये जर्मनीतील एका गावात झाला. त्याचे आजी-आजोबा (आईचे आईवडील) यांनी हिंदुस्थानमधील एका प्रोटेस्टंट मिशनसाठी काम केले होते. त्याच्या आजोबांनी बायबल मल्याळी भाषेत भाषांतरीतही केले होते. (त्यांना तीस भाषा अवगत होत्या.) हेसच्या आईचा जन्म भारतातलाच. त्याच्या वडिलांचा जन्म त्यावेळी रशियात असणाऱ्या इस्टोनियातील एका गावात झालेला असल्यामुळे त्याचे नागरिकत्व पहिल्यापासूनच जर्मनी आणि रशिया या दोन्ही देशांचे होते.

त्याच्या वडिलांचे वडील मोठे विद्वान गृहस्थ होते. त्यांच्यामुळे त्याला लहानपणापासूनच वाचायचा नाद लागला. लहानपणी हेस अतिशय हट्टी होता. त्यामुळे त्याच्या आईला त्याच्याबद्दल नेहमीच काळजी वाटत असे. त्याची आई एक कवयित्री होती आणि तिला संगीताची आवडही होती. त्याच्या एकंदर कुटुंबातच कविता आणि संगीत यांना खूप महत्त्व होते. हेसच्या बालपणावर या सगळ्या गोष्टींचा परिणाम झाला. अगदी लहानपणीच, म्हणजे तो १३-१४ वर्षांचा असताना हेसने लेखक व्हायचे ठरवले.

हेसचे प्राथमिक शिक्षण एका ॲबेत झाले. शिकत असतानाच पुढे त्याचे आईवडिलांशी खटके उडू लागले. त्याला बऱ्याच वैयक्तिक समस्यांना तोंड द्यावे लागले. त्यात त्याने एकदा आत्महत्येचा प्रयत्नही केला, त्यात नशिबाने तो वाचला. त्याला मानसोपचारतज्ज्ञांची मदतही घ्यावी लागली. या सगळ्यांमुळे त्याला बऱ्याच शाळा बदलाव्या लागल्या. त्याचे शालेय शिक्षण असेच गोंधळात झाले. मग काही कोर्स करून त्याने प्रथम घड्याळाच्या दुकानात आणि नंतर पुस्तकांच्या दुकानांत नोकऱ्या केल्या. त्याचे वाचन या सगळ्यांत सतत चालूच होते.

१८९९ साली हेसची पहिली दोन पुस्तके प्रकाशित झाली. एक कवितासंग्रह आणि दुसरा ललितलेखसंग्रह. परंतु त्यांना यश मिळालं नाही.

१९०४ मध्ये हेसची कादंबरी 'पीटर कमेनझिंड' चांगलीच गाजली. हे त्याचे पहिले यश. सिगमंड फ्रॉईड या प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञाची ती आवडती कादंबरी ठरली. या नंतर हेसनं पूर्णवेळ लेखन करण्याचा निर्णय घेतला. याचवेळी हेसनं लग्न करून गृहस्थाश्रमाला सुरुवात केली आणि ते उभयता Lake constance च्या तीरावरील एका गावात राहू लागले.

याच वेळी हेसला हिंदू धर्म व बौद्ध धर्म यांबद्दल कुतूहल वाटू लागले आणि त्याने त्यासंबंधी अभ्यास करण्यास सुरूवात केली. तेव्हाच हेसला थिओसॉफीनेही आकर्षित केले. त्याला भारताबद्दलही कुतूहल वाटू लागले, पण तो भारतात येऊ शकला नाही. त्याने सिलोन म्हणजे सध्याच्या श्रीलंकेला भेट दिली. त्याने सुमात्रा, बोर्निओ आणि ब्रह्मदेश या देशांची सफरही केली.

पहिले महायुद्ध सुरू झाल्यावर हेसने लष्करात भरती व्हायचा निर्णय घेतला, पण बहुधा दृष्टिदोषामुळे त्याला आघाडीवर जाता आले नाही. त्यावेळेच्या युद्धज्वरापासूनदेखील हेस अलिप्तच राहिला. त्यावेळेला चहूबाजूंनी त्याच्यावर टीकेचा भडीमारदेखील झाला. एका क्षणी हेसने असे उद्गार काढले की My attempt to apply love to matters political has failed.

युद्धानंतर हेसच्या कौटुंबिक स्वास्थ्यात मोठे परिवर्तन घडून आले. त्याची बायको मनोरुग्ण बनली होती. हेस मग एकटाच Ticino येथे स्थाईक झाला. तेथे त्याने पेंटिंग करण्यास सुरुवात केली. त्याचे लिखाण सतत चालूच होते. १९२३ साली त्याला स्विस नागरिकत्व मिळाले. त्याच्या 'Damian', 'Steppenwolf', 'Siddhartha', 'Narcissus and Goldmund' अशा कादंबऱ्या प्रकाशित होत होत्या आणि त्याच्या नावाचा


दबदबा वाढतच होता. त्याच्या वयाच्या ५० व्या वर्षी दुसऱ्या एका लेखकाने  लिहिलेले त्याचे चरित्रही प्रकाशित झाले. याच सुमारास त्याने दुसरे लग्न केले.


जर्मनीत उदयास येऊ लागलेल्या नाझीझममुळे हेस खूप अस्वस्थ होता. १९३३ मध्ये ब्रेख्त आणि थॉमस मान यांना जर्मनी सोडण्यात हेसने सक्रिय मदत केली. परंतु त्याच्या मुळातच असलेल्या अलिप्त स्वभावामुळे पुढे त्याने नाझीझमच्या विरुद्धच्या चळवळीत कुठलाही सक्रिय भाग घेतला नाही. नाझीझमविषयी त्याला विलक्षण घृणा होती हे वेगळे सांगायची खरी गरज नाही.

१९४३ साली प्रसिद्ध झालेली The Glass Bead Game ही हेसची शेवटची उल्लेखनीय कादंबरी. १९४६ मध्ये हेसला साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले. यानंतर त्याने ललित लेखन केले, विविध लोकांशी भरपूर पत्रव्यवहारही केला, पण यापलीकडे तो गेला नाही.

वयाच्या ८५ व्या वर्षी म्हणजेच १९६२ मध्ये हेसचा मृत्यू झाला.

हर्मन हेस त्याच्या काळातला जर्मनभाषक जगातला एक मोठा, प्रतिभावान लेखक होता. त्याच्या अनेक कादंबऱ्या प्रचंड लोकप्रिय झाल्या. पण जगभर त्याचे नाव झाले ते 'सिद्धार्थ'मुळेच, म्हणजे जरा उशिराच. विसाव्या शतकात ज्या युरोपीय लेखकाच्या साहित्याची जास्तीत जास्त भाषांतरे झाली तो म्हणजे हर्मन हेस. त्याच्या कविता, कथा, कादंबऱ्या आजही आवडीने वाचल्या जातात. तरुण वाचकवर्गात हेस नेहमीच खूप लोकप्रिय होता आणि हा शिरस्ता आजही कायम आहे. प्रसिद्ध जर्मन संगीतकार रिचर्ड स्ट्रॉसने हेसच्या तीन कवितांना संगीत देऊन आपल्या प्रत्येक कार्यक्रमांमध्ये त्यांचा आवर्जून समावेश केला. हेस याला खूप पारितोषिकेही मिळाली.



हर्मन हेस

हेसची सर्वात गाजलेली आणि लोकप्रिय कादंबरी म्हणजे 'सिद्धार्थ' होय, आता आपण तिच्याकडे वळूया.

सिद्धार्थ या तरुणाची ही कहाणी आहे. ज्याला मानवी जीवनाचा अर्थ कळला तो सिद्धार्थ असा सिद्धार्थ या शब्दाचा अर्थ आहे. त्याने जे शोधले ते त्याला गवसले आहे. या नावातच हेस आपल्याला बरेचसे सांगून जातो.

ही गोष्ट घडते ती कपिलवस्तू या देशात, म्हणजेच प्राचीन नेपाळमध्ये. सिद्धार्थ हा तरुण आत्मोन्नतीसाठी घर सोडतो आणि वैराग्याचा मार्ग स्वीकारतो. भिक्षा मागून जगायचे, फिरायचे हा त्याचा जीवनक्रम होता. त्याच्याबरोबर त्याचा जिवलग मित्र गोविंद हाही असतो. सिद्धार्थ समाधीसाधनेलाही सुरुवात करतो. नंतर तो बुद्धाचा शोध घेतो आणि त्यांची भेटही होते. बुद्धाच्या बरोबर त्याचे बोलणे होते. या प्रभावाखाली गोविंद बुद्धाच्या पंथात सहभागी होतो, पण सिद्धार्थ तसे करत नाही. तो असे म्हणतो की प्रत्येक मानव जे काही शोधत असतो ते युनिक म्हणजे अनन्यसाधारण असल्यामुळे ते कोणी गुरू सांगू किंवा शिकवू शकत नाही. प्रत्येक माणसाने हा शोध स्वतःनेच घ्यायचा आहे. त्यामुळेच त्याचा शोध तो एकट्यानेच चालू ठेवतो.

एकदा एक मोठी नदी पार करून सिद्धार्थ एका नगरात प्रवेश करतो. नदी पार करून नेणाऱ्या नावाड्याला द्यायला त्याच्यापाशी काहीच नसते. त्या नावाड्याचे नाव असते वासुदेव. तो त्याला असे सांगतो की तू इथे परत येणारच आहेस आणि तेव्हा आपण यासंबंधी बोलू. या नगरात सिद्धार्थची कमला या अतिशय सुंदर गणिकेशी ओळख होते. कमला सिद्धार्थला सांगते की त्याला प्रेमाचा अनुभव घ्यायचा असेल तर सिद्धार्थने प्रथम तिला जिंकले पाहिजे आणि तिला जिंकण्यासाठी प्रथम त्याने श्रीमंत झाले पाहिजे. व्यापारी वर्गात तिच्या असलेल्या काही ओळखींमुळे सिद्धार्थ व्यापारात शिरतो आणि यशस्वीही होतो. कमलाही त्याची होते. तो चांगलाच श्रीमंत होतो. परंतु काही वर्षांनी त्याला त्याच्या जीवनशैलीचा उबग येतो. यात फारसा काही अर्थ नाही हे त्याला उमगते. एके दिवशी सगळ्याचा त्याग करून सिद्धार्थ परत नदीवर येतो. जीवनाला विटलेला, पूर्ण भ्रमनिरास झालेला सिद्धार्थ आत्महत्येचा विचार करू लागतो. त्यातच त्याला समाधीवजा झोप लागते आणि त्यात तो 'ओम' या शब्दाचा धीरगंभीर

नाद ऐकतो. हा ऐकू आलेला आदिम हुंकार हा जणू जीवनाचा खराखुरा प्रारंभ आहे अशी भावना त्याच्या मनात निर्माण होते. म्हणजेच दुःख, अवहेलना इथून शांती, आत्मज्ञानापर्यंतचा प्रवास या जीवनयात्रेची नांदी. या अनुभवामुळे त्याचे सगळे जीवनच बदलून जाते. दुसऱ्या दिवशी त्याची गोविंदशी ओझरती भेटही होते. गोविंद आता बौद्ध भिक्षुक बनलेला असतो. सिद्धार्थ मग असे ठरवतो की आध्यात्मिक बळ देणाऱ्या त्या नदीच्या तीरावरच आपले पुढचे आयुष्य काढायचे. त्याची परत वासुदेवाशी भेट होते. ते दोघे मग त्यांचे वेगळे आयुष्य त्या नदीतीरावर सुरू करतात. वासुदेवाने त्याचे सर्व आयुष्य नदीतीरावरच व्यतीत केलेले असते. त्याचा नावाड्याचा व्यवसाय असल्यामुळे त्याने अगणित लोकांना नदीपार नेलेले असते आणि ते करताना त्यांच्याशी संवादही साधलेला असतो. त्यातून आणि नदीकडून तो खूप काही शिकलेला असतो आणि एक सिद्ध पुरुष बनलेला असतो. सिद्धार्थ आणि वासुदेव नदीतीरावर शेजारी शेजारी राहायला लागतात तेव्हा वासुदेव त्याचे सगळे अनुभव सिद्धार्थला हळूहळू कथन करतो आणि त्यातूनही सिद्धार्थ बऱ्याच गोष्टी शिकतो.

सिद्धार्थच्या या आध्यात्मिक प्रवासात त्याला वेगवेगळे अनुभव येतात, वेगवेगळ्या गोष्टी तो शिकतो. चिरंतन सत्याच्या शोधार्थ निघालेल्या सिद्धार्थचा प्रवास मानवी जीवनात प्रेम हे अंतिम सत्य आहे यापाशी येऊन थांबतो आणि तो खरोखरीच 'सिद्धार्थ' होतो.

सिद्धार्थ ही खरे तर एक लघुकादंबरीच आहे, फक्त १२१ पानांची. ही कादंबरी गौतम बुद्धाबद्दल नाही, पण ती त्याच काळातली आहे. पूर्वेकडील हिंदू धर्म व बौद्ध धर्म यांतील तत्त्वज्ञान हेसचा व्यक्तिगत मित्र प्रख्यात मानसशास्त्रज्ञ कार्ल ह्युन्ग याचे मूलभूत विचार आणि पाश्चिमात्यांची व्यक्तिप्रधान विचारसरणी या सर्वांच्या विचारमंथनातून सिद्धार्थ या कादंबरीची निर्मिती झालेली आहे. वरवर साधे पण अर्थाने ओतप्रोत भरलेले हे कथानक लिहिताना हेसने अत्यंत नादमधुर (Lyrical) भाषेचा उपयोग केलेला आहे. या पुस्तकाची भाषांतरित आवृत्ती वाचतानादेखील हे पटकन ध्यानात येते. व्यक्तिरेखासुद्धा मर्यादितच आहेच. त्यात मुख्य आणि दुय्यम असा भेदाभेद जवळजवळ नाहीच. या कादंबरीत संवाद एकंदरीत कमीच आहेत पण जे आहेत ते वरवर साधे वाटले तरी अर्थाने ओतप्रोत भरलेले आहेत. सगळ्या कादंबरीच्या रसाळ शैलीचा त्यांच्यावर प्रभाव दिसतो. या व्यक्तिरेखा हेसने विलक्षण ताकदीने रंगवून जिवंत केलेल्या आहेत, मुख्यतः सिद्धार्थ, गोविंद, कमला आणि वासुदेव यांच्या. या कथेचा नायक म्हणजे सिद्धार्थ. पूर्ण वैराग्यापासून ते पूर्ण उपभोगापर्यंत जाऊन परत फिरणारा पण कशातच न रमणारा, आयुष्याचा अर्थ एकट्यानेच सतत शोधणारा, त्यासाठी काहीही करायची तयारी असणारा असा हा आगळावेगळा कथानायक आहे. सिद्धार्थची तळमळ आपल्याला नुसती जाणवत नाही तर खोलवर आत कुठेतरी आपल्याला ती उमगते आणि अस्वस्थही करते. बुद्धाच्या धीरगंभीर व्यक्तिमत्त्वाची छायाच या संबंध कथानकावर पडलेली आहे. त्या काळाचे चित्रण, मानवाच्या विचारांचे, भावनांचे वर्णन या लघुकादंबरीत फार समर्थपणे केलेले आहे आणि हे सगळे हेसला जणू विनासायास जमलेले आहे. सिद्धार्थ आणि वासुदेव यांचे नदीतीरावरचे एकत्र असलेले जीवन हा या कादंबरीचा सर्वात भावणारा भाग आहे. वासुदेवाचे संवाद मोजकेच असले तरी ते विलक्षण परिणामकारक आहेत. मघाशी म्हटल्याप्रमाणे याच कालखंडात सिद्धार्थला वासुदेव आपले अनुभव कथन करतो आणि सगळ्या कादंबरीतला हा अतिशय महत्त्वाचा आणि तेवढाच हृद्य भाग आहे. हेसने तो इतक्या परिणामकारकरीत्या रंगवलेला आहे की त्याला तोड नाही. हेसने त्याच्या व्यक्तिरेखांना किती अर्थपूर्ण नावे दिलेली आहेत हेही लक्षात घेण्यासारखे आहे. म्हणजे बघा सिद्धार्थ, गोविंद आणि नदी पार करून नेणारा नावाडी वासुदेव.

या कथानकाला लाभलेली हेसची लेखनशैली विलक्षण तर आहेच, शिवाय त्यात एक प्रचंड झपाटलेपण आहे. त्याला एक वेगळाच narrative drive आहे. कथनशैलीच्या पलीकडे जाऊन जे काही कथा-कादंबरीत असते त्यामुळे ती अतिशय वाचनीय होते त्यालाच narrative drive म्हणता येईल. कादंबरी वाचायला घेतली की संपवल्याशिवाय ती सोडवत नाही हे सर्वस्वी खरे आहे.

सामान्य गृहस्थाश्रमातील जीवनापासून संन्यासाश्रमातील सर्वसंग परित्याग कल्पनेपर्यंतचा प्रवास भारतीयांना साधारणपणे पूर्वापार परिचित आहे. त्याचप्रमाणे निरनिराळ्या प्राचीन संस्कृत ग्रंथांतून आणि संतवाङ्मयातून याविषयी काही विचार स्पष्ट केलेले आहेत. त्यामुळे 'कोऽहम' (मी कोण?), माझ्या आयुष्याची इतिकर्तव्यता काय या आणि अशा मूलभूत तत्त्वज्ञानविषयक प्रश्नांचा स्पर्श हे आपणाला नवीन नाही. त्याचप्रमाणे गौतम बुद्धही इथलाच! या सर्व बाबींमुळे कदाचित हेसची ही लघुकादंबरी निव्वळ कथेच्या दृष्टीतून साधी, सोपी, सरळ आणि अतिशय रसाळ आहे एवढेच आपल्याला वाटण्याची शक्यता! पण थोडा विचार केला, अभ्यास केला तर हे कथानक अर्थाने किती ओतप्रोत भरलेले आहे याची प्रचीती येते. आध्यात्मिक यात्रा असे जर आपण म्हटले तर ते अनाकलनीय, गूढ वाटते म्हणूनच आपल्या आयुष्यात मनाच्या विचारातून होणाऱ्या प्रवासात सतत येत राहणारे प्रश्न, अनुत्तरित प्रश्नांमुळे होणारी मानसिक अस्वस्थता आणि वादळे आणि शेवटी ज्ञानप्राप्तीपासून आत्मज्ञानापर्यंतचा प्रवास या सर्वांवर या पुस्तकात अत्यंत परिणामकारक असे भाष्य आहे आणि तेही साध्या, सरळ भाषेत, गोष्टीरूपाने.

हर्मन हेसने असे म्हटले आहे की त्याने 'सिद्धार्थ' लिहिली कारण त्याला sickness with life ला उतारा शोधायचा होता. हा उतारा त्याला भारतीय उपनिषदे आणि भगवद्गीतेतील तत्त्वज्ञानात मिळाला. हेसने कथेतून हेही दाखवून दिलेले आहे की नवीननवीन अनुभव घेताना नव्या गोष्टी शिकत जायच्या आणि त्यातून स्वतःच्या ज्ञानाने आणि विचाराने पुढील मार्ग आक्रमत जायचा हेच खरे मानवी जीवनाचे उद्दिष्ट आहे.


सिद्धार्थ ही हेसची कादंबरी १९२२ साली प्रसिद्ध झाली. जागतिक वाङ्मयात सिद्धार्थला एक क्लासिक म्हणून मान्यता मिळालेली आहे. तिची जगातील निरनिराळ्या साठ भाषांमध्ये भाषांतरे झालेली आहेत आणि यात बहुतेक सर्व भारतीय भाषांचा समावेश आहे, अगदी मराठी व संस्कृतसुद्धा. या कादंबरीच्या आतापर्यंत दहा कोटी प्रती विकल्या गेलेल्या आहेत. तिच्यावर काही चित्रपटही निघालेले आहेत. बऱ्याच वर्षांपूर्वी शशी कपूरचा इंग्रजी भाषेतला 'सिद्धार्थ' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या कादंबरीवर बेतलेली एक संगीतिकाही आलेली आहे.

भारतीय संस्कृतीत रुजलेल्या संकल्पनांचा अतिशय कौशल्याने उपयोग करून हेसने एक विलक्षण कलाकृती निर्माण केलेली आहे. ही छोटेखानी कादंबरी प्रत्येक वाचकाने आणि मुख्यतः भारतीय वाचकाने खरे तर वाचावी अशीच आहे. ही वाचून आपण तृप्त होतो, तरीही एक अनामिक हुरहुर मनाला लागून राहते. हजारो मैलांवर जन्मलेला, आपल्या भारतात कधी न आलेला एक जर्मन लेखक अशी एक कादंबरी लिहितो हे आश्चर्यच नाही का? इतक्या वर्षांनंतरही या कादंबरीची लोकप्रियता कायम आहे आणि ती पुढेही तशीच राहील यात मुळीच शंका नाही, कारण या कादंबरीत हेसने जे मानवी जीवनाचे अंतिम सत्य सांगितलेले आहे ते तर चिरंतनच आहे की!

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com

॥ग्रंथाली॥

**शिवगंधार** निर्मित
## संत बहेणाबाई शिऊरकर यांची अभंगवाणी





**'तिनेच गगन झेलियेले'चे**
निर्मितिकथन
**योजना शिवानंद**
शब्दांकन
**ऋतुजा सावंत**

प्रस्तावना
**डॉ. सदानंद मोरे**

संत बहेणाबाई शिऊरकर या काहीशा अपरिचित प्रतिभावान संत कवयित्रीच्या अभंगवाणीच्या दोन मैफिली २०२२-२३मध्ये गायिका योजना शिवानंद यांनी सादर केल्या!
या दोन्ही कार्यक्रमांची संहिता आणि निर्मितिकथन पुस्तकरूपात १२ ऑक्टोबर २०२३ रोजी बहेणाबाईंच्या जयंतीदिनी प्रकाशित होत आहे!
विशेष - QR Code स्कॅन करून यातील वीस गाण्यांचा आस्वाद घेता येईल.

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**




## आणि मी रस्ता ओलांडला
**श्रीकांत बोजेवार**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**

'आणि मी रस्ता ओलांडला' हा लेखकाचा ऋतुरंगमध्ये आलेला पहिला लेख २००८ सालचा. त्यानंतरच्या पंधरा वर्षात लेखकाचे आणखी पाच लेख 'ऋतुरंग'मध्ये प्रसिद्ध झाले. पंधरा वर्षे झाली, आजही जवळपास प्रत्येक महिन्याला महाराष्ट्राच्या एखाद्या कोपऱ्यातून फोन येतो 'आणि मी रस्ता ओलांडला' हा लेख आवडल्याचे वाचक सांगतो. ऋतुरंगमधील लेखकाच्या सहा लेखांचे हे छोटेखानी पुस्तक प्रसिद्ध करतानाही तोच लेख पहिला घेतला आहे आणि पुस्तकाला शीर्षकही तेच दिले आहे. 'ऋतुरंग'चे विषय अनेकदा स्वानुभवाशी निगडित असतात त्यामुळे यातील बहुतांश लेखांचे स्वरूप थोडे आत्मचरित्रात्मक आहे.



सदानंद पुंडपाळ

# एकनाथ आव्हाड – बालसाहित्यातील एक आनंदाचे पान

**एकनाथ** आव्हाड हे आजच्या घडीला बालसाहित्यातील आघाडीचे नाव आहे. ते गेली सुमारे तीस वर्षे मुलांसाठी सातत्याने लिहीत आहेत. त्यांनी कविता, काव्यकथा, कथा, काव्यकोडी, नाट्यछटा, चरित्र इत्यादी साहित्यप्रकार लीलया हाताळले आहेत. मुलांना वाचनाची, भाषेची गोडी लागावी, त्यांच्या वाचनाने त्यांचे आयुष्य समृद्ध व्हावे यासाठी त्यांनी बालसाहित्यात अनेक नवनवीन आणि अभिनव प्रयोगही केले असून त्यांना वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांच्या आवृत्त्या निघाल्या असून त्यांवर नांदेडच्या राजर्षी शाहू विद्यालयातील बालवाचकांनी लिहिलेले 'एकनाथ आव्हाड यांचे बालसाहित्य बालसमीक्षकांच्या नजरेतून' (संपादक – डॉ. सुरेश सावंत आणि डॉ. मथु सावंत) आणि ज्येष्ठ साहित्यिक सदानंद पुंडपाळ यांनी 'एकनाथ आव्हाड यांच्या बालकविताः स्वरूप आणि शोध' ही समीक्षात्मक पुस्तके लिहिण्यात आली आहेत. काहींची पीएच.डी.साठीही तयारी सुरू आहे. त्यामुळेच राज्यभरातील काही नामवंत साहित्यप्रेमी संस्थांसह राज्य शासनाने त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवले आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि दर्जेदार लेखनाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आणि त्यांच्या 'छंद देई आनंद' या बालकवितासंग्रहाला २०२३चा बालसाहित्यासाठीचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर करून त्यांचा उचित सन्मान केला आहे, ही बालसाहित्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. त्यांच्या काही कथा आणि कवितांचा 'बालभारती'च्या पाठ्यपुस्तकात समावेश आहे, तर त्यांच्या 'छंद देई आनंद' या बालकवितासंग्रहाची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या एम.ए.च्या अभ्यासक्रमात, तर त्यांच्याच 'आनंदाची बाग' या बालकथासंग्रहाचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या एम.ए. प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. अर्थात हे यश त्यांना सहजासहजी मिळालेले नाही, त्यामागे त्यांची सुमारे तीस वर्षांची अविरत, अविचल आणि बालसाहित्याप्रति निष्ठा आणि त्यासाठी केलेली कठोर मेहनत आहे.




एकनाथ आव्हाड


साहित्य अकादमी पुरस्कारानिमित्त एकनाथ आव्हाड यांचा बालसाहित्याचा प्रवास समजून घेताना त्यांना विचारले, तुम्ही मुंबईतच लहानाचे मोठे झालात, शिक्षण आणि नोकरीही मुंबई शहरातच करता, मग साहित्याचे इतर प्रांत सोडून तुम्हाला बालसाहित्यलेखनाकडे का वळावेसे वाटले? ते म्हणाले, 'आम्ही मूळचे नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील दापूर या गावाचे. घरची परिस्थिती हलाखीचीच. पोटापाण्याचा काही तरी उद्योग शोधावा म्हणून आमचे कुटुंब मुंबईत आले. आई भाजीविक्रीचा व्यवसाय करायची, पण ती गोष्टी फार खुलवून सांगायची, तिच्या या कथाकथनामध्येच माझ्या बालसहित्यिक


होण्याची बीजे लपली आहेत. तिच्यामुळेच मला गोष्टी वाचण्याची आणि लिखाणाची सवय लागली. पुढे शिक्षक म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत रुजू झाल्यानंतर मी मुलांसाठी, पालकांसाठी, शिक्षकांसाठी कथाकथन करू लागलो. कथाकथनाबरोबरच ‘कथाकथन तंत्र आणि मंत्र’ ही कार्यशाळाही घेत गेलो. कथाकथनाचे शेकडो कार्यक्रम महाराष्ट्रभर केले. इथेही माझ्या आईचाच गोष्टी रंगवून सांगण्याचा गुण कामी आला. आईचा भाजीविक्रीचा छोटासा व्यवसाय, पण आई भाजी विकत असताना मी तिच्याजवळच कुठले तरी पुस्तक वाचत बसलेला असायचो. मला वाचनाचे अतोनात वेड होते आणि माझ्या आईनेही त्या ओढगस्तीच्या काळात माझ्या वाचनाला कधी विरोध केला नाही. तेव्हा घरात टीव्ही, रेडिओ नव्हताच आणि तो घेण्याची आमची ऐपतही नव्हती. मला खाऊसाठी मिळालेल्या पैशांतून मी छोटी छोटी पुस्तके विकत घेत असे. या पुस्तकांच्या वाचनानेच माझ्यातील बालसाहित्यिक घडवला आहे, असे मला वाटते. मी मुंबई महानरपालिकेच्या स्टेशन चेंबूर मनपा मराठी शाळा या चेंबूरच्या शाळेतच पहिली ते सातवीपर्यंत शिकलो. आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण चेंबूरच्या स्वामी मुक्तानंद हायस्कूलमधून पूर्ण केले आणि माझे डी.एड. चे शिक्षण परळच्या शिरोडकर कॉलेजमधून पूर्ण केल्यावर मी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतच शिक्षक म्हणून रुजू झालो. ज्या शाळेत शिकलो त्याच शाळेत शिक्षक म्हणून सेवा देणं माझ्यासाठी अतिशय आनंदाची बाब आहे.’

तुम्हाला वाचनाची आवड होती आणि आईच्या गोष्टी रंगवून सांगण्याच्या कलेमुळेच तुम्ही लेखनाकडे वळलात असे म्हणता, तुम्ही प्रशिक्षणानंतर शिक्षक झालात, पण तुमच्या बालसाहित्यलेखनाला खऱ्या अर्थाने केव्हा आणि कशी सुरुवात झाली? असे विचारता. ते म्हणाले, ‘मी दहावी उत्तीर्ण होईपर्यंत फारसे काही लिहिले नव्हते, पण माझे वाचन मात्र सतत सुरूच होते. प्रत्येकाच्या जीवनात असा एक टर्निंग पॉइंट येतो, की जो तुमचे सारे आयुष्य बदलून टाकतो. माझ्या बाबतीतही असेच घडले. एके दिवशी मी माझ्या वर्गावर शिकवण्यास गेलो असताना मी हजेरी घेत होतो आणि




सविता पटेकर नावाची मुलगी बरेच दिवस गैरहजर असल्याचे माझ्या लक्षात आले. माझ्या शाळेतील सारी मुले गरीब परिस्थितीतील आणि वंचित घटकांतील होती. त्यांना यातून बाहेर पडण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे समजल्यामुळे मी तिची चौकशी केली आणि शाळा सुटल्यावर तडक तिचे घर गाठले. तिच्या आईशी चर्चा केली आणि मला तिच्या गैरहजेरीचे कारण समजले. अनेक प्रयत्नानंतर सविता शाळेत यायला लागली. तिच्या आईने सांगितलेली सगळी कहाणी मी शब्दबद्ध केली आणि त्याचीच पहिली कविता झाली ‘सविता पटेकर सतत गैरहजर.’ सत्यघटनेवर आधारित माझ्या शिक्षकी पेशातील प्रत्यक्ष अनुभवावर आधारित या कवितेनेच माझ्या बालसाहित्य–लेखनाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या कवितेला मुंबई जिल्हा पातळीवर एका स्पर्धेत पहिले पारितोषिकही मिळाले. मेधा पाटकर यांच्या मातोश्री इंदुताई खानोलकर ‘स्वाधार’ चेंबूर शाखेत मुलींसाठी शैक्षणिक प्रकल्प चालवायच्या. याच दरम्यान त्यांनी मला विद्यार्थ्यांसाठी गाणी, नाट्यछटा लिहायला सांगितल्या. अनेक मुलांकडून लेखनासाठी मला विषय आणि प्रेरणा मिळत गेली. मी एका वर्तमानपत्रात बोधकवितेचे सदर चालवत होतो, त्याला बाल आणि प्रौढ वाचकांचाही चांगला प्रतिसाद मिळत होता. या कविता आणि तालकथांनी मला श्रीमंत केले, माझ्या या कथाकवितांचे ‘बोधाई’ हे माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले.’

बालसाहित्य हे मोठ्यांनी (हल्ली मुलंही लिहू लागली असून ती आश्वासक बाब आहे) मुलांसाठी लिहिलेले असले, तरी ते मुलांच्या भावभावना, त्यांची भाषेची जाण, त्यांच्या आवडीनिवडी, आजूबाजूची बदलती परिस्थिती पाहूनच लिहायला हवे, तरच ते त्यांना भावते अन्यथा ते त्यांच्यावर लादल्यासारखे होईल. असे लिहिणे म्हणजे एक प्रकारचा परकायाप्रवेशच असतो तो.

मुलांना वाचनाची गोडी लागावी यासाठी तुम्ही तुमच्या लिखाणात काही प्रयोग केलेले दिसतात, त्याबद्दल काय सांगाल? यावर आव्हाड म्हणाले, ‘बालांसाठी लिहायचे म्हणजे

लेखकालाही बालक व्हावे लागते. त्यांचे भावविश्व, त्यांच्या अपेक्षा समजून घ्याव्या लागतात, त्यांचा भाषेचा आवाकाही पाहावा लागतो. मी मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत पहिले ते आठवीच्या मुलांना शिकवत असल्यामुळे मला मुलांच्या, बालांच्या निरीक्षणासाठी वेगळ्या ठिकाणी जावे लागले नाही. अगदी शिशू गटापासूनच्या मुलांच्या अपेक्षा लक्षात घेऊन मी सुरुवातीला पूर्णपणे जोडाक्षरविरहित असा 'गंमतगाणी' हा कवितासंग्रह लिहिला. या गटासाठी लिहिणे वाटते तितके सोपे नाही, त्यासाठी भाषेची जाण असावी लागते. या संग्राहालाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या अभिनव प्रयोगशील पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट बालकवितासंग्रहाचा वा. गो. मायदेव पुरस्कार लाभला. आणि माझ्या लिखाणाला गती आणि दिशा मिळाली. मुलांना कोडी घालायला आणि ती सोडवायलाही आवडते, यासाठीच मी काव्यकोडी या प्रकारातून मुलांना सामान्यज्ञानाबरोबरच त्यांच्या चौकसपणाला आणि बुद्धीला आवाहन करून आणि आव्हान देऊन त्यांना स्वयंअध्ययनास प्रवृत्त करणारा 'मजेदार कोडी' हा काव्यकोडीसंग्रह लिहिला. त्यानंतरही मी काही नियतकालिकांतून अशी कविता, कथा, कोड्यांची सदरे चालवली. बालसाहित्याने मुलांमध्ये अपेक्षित बदल झाला पाहिजे हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून 'आनंदाची बाग' नावाचा जणू काही कथांची सलग मालिकाच वाटावा असा कथासंग्रह मुलांच्या हाती दिला. त्यात बाबा, आई, शमी आणि बाळू यांचे कुटुंब आणि जोडीला त्यांच्या मित्र आणि इतरांच्या मदतीने त्यांना माणूस घडवणाऱ्या कथा या संग्रहात लिहिल्या. या कथासंग्रहाला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. या कथासंग्रहाचे सदानंद पुंडपाळ यांनी इंग्रजीत भाषांतर केले असून त्याचेही वाचकांनी तितक्याच आनंदाने स्वागत केले आहे. त्यानंतर याच पठडीतला त्याचाच पुढचा भाग मूल्यकथा वाटाव्यात असा 'खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा' हा बालकथासंग्रह आला. मराठीवर इंग्रजीचे आक्रमण होतेय, मुले भाषा नीट समजून घेत नाहीत, त्यांना व्याकरण कंटाळवाणे वाटते, अशा तक्रारी सार्वत्रिक आहेत. मुलांना पठडीबाज कोरड्या पद्धतीने व्याकरण आणि भाषा शिकवण्याने त्यांना भाषेबद्दल गोडी न वाटता ती त्यापासून दूर जातात हे ओळखून प्रचलित पद्धत बदलून मी हसतखेळत काव्यमय पद्धतीने भाषेची आवड निर्माण करणारा 'शब्दांची नवलाई' हा बालकवितासंग्रह लिहिला. 'शब्दांची नवलाई' या बालसाहित्यातील अभिनव प्रयोगाला बालक, पालक, शिक्षक आणि शिक्षणक्षेत्रातूनही उत्तम प्रतिसाद मिळाला आणि त्याला राज्य शासनाचा उत्कृष्ट बालकवितासंग्रहाचा बालकवी पुरस्कारही लाभला. नाट्यछटा हा एकाच पात्राने अभिनित केलेला प्रकार असून तो मुलांना नाटकासारखाच आनंद देतो, हे ओळखून मी 'मला उंच उडू दे' हा नाट्यछटासंग्रह मुलांच्या हाती सोपवला. याच्याच जोडीला त्यांना थोरामोठ्यांची ओळख व्हावी म्हणून माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे चार भागांतील चरित्र लिहिले, तेही चरित्रलेखनाची रूढ पद्धत टाळून संभाषणातून–गोष्टीरूपातून लिहिलेले हे चरित्र मुलांच्या पसंतीस उतरले.'

हल्ली मुलं वाचतच नाहीत, वाचनसंस्कृती लोप पावत चाललीय, अशी सर्वत्र ओरड ऐकायला मिळते. याबद्दल तुमचे मत काय आहे? या मताशी तुम्ही सहमत आहात का? यावर ते उसळून म्हणाले, 'कोण म्हणते मराठी पुस्तके आणि विशेषतः बालसाहित्य वाचले जात नाही म्हणून? याला कारणीभूत पालकच आहेत. तेच स्वतः वाचत नाहीत, त्याचा दोष मुलांना देता येणार नाही. कोणतेही मूल हे त्याच्या पालकांचे किंवा त्याच्या आजूबाजूला बोलणाऱ्यांचे ऐकूनच बोलायला शिकते. भाषाशिक्षण हे श्रवणाने सुरू होते. ती भाषा आपण वापरतच नसू, मुलांच्या कानावर ती पडलीच नाही, तर ते मूल शिकणार तरी कसे? यासाठीच पालकांनी मुलांना गोष्टी रंगवून–खुलवून सांगितल्या पाहिजेत. गाणी, कविता वाचून दाखवल्या पाहिजेत. त्यांना वाचनाची गोडी लावून दर महिन्याला वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके, नियतकालिके खरेदी करून वाचायला द्यायला हवीत. कार्यक्रमांच्या निमित्ताने मी जेव्हा जेव्हा बाहेर जातो तेव्हा माझी काही पुस्तके सोबत नेतो आणि त्या ठिकाणी त्यांना मागणी असल्याचे माझ्या लक्षात येते. नांदेडच्या राजर्षी शाहू माध्यमिक शाळेतील मुलांनी माझ्या पुस्तकांवर समीक्षात्मक लेखन केले असून ते पुस्तकरूपाने प्रकाशितही झाले आहे. काही ठिकाणी तर शाळेच्या दर्शनी फलकांवर माझ्या कविता मुलांनीच लिहून ठेवलेल्या व चित्रेही त्यांनीच रेखाटलेली मी पाहिली आहेत. त्यामुळे मुले वाचत नाहीत असे म्हणण्यात काहीही तथ्य नाही. लहान वयातच वाचनाही गोडी लागली, तर पुढचे सारे आयुष्य पुस्तके सुखकर करतील यात संदेह नाही, पण यात मोठ्यांची भूमिका महत्त्वाची आहे.'

आता तुमचे कोणते लेखन चालू आहे? भविष्यात कोणते लिखाण करणार आहात?

'सध्या मी साप्ताहिक सकाळमध्ये मुलांसाठी 'मुलांचे पान' हे सदर लिहीत असून एक बालकादंबरी लिहिण्याचाही माझा मानस आहे. मी गेली तीस वर्षे मुलांसाठी लिहितो आहे, असे म्हणण्यापेक्षा गेली तीस वर्षे मुलांनीच मला लिहिते ठेवले आहे, हे मला महत्त्वाचे वाटते, म्हणूनच मुलांची आनंदाची बाग फुलवणारे साहित्य लिहिणे आणि मुलांपुढे ते सादर करणे ही आनंददायी गोष्ट भविष्यातही माझी सुरूच राहील.'

**– सदानंद पुंडपाळ**

भ्रमणध्वनी : ९४०४९६८८२९



किरण येले

# अमराठी प्रदेशातील मराठी साहित्यिक डॉक्टर संदीप भुयेकर



डॉ. संदीप भुयेकर

**डॉ.** संदीप भुयेकर मूळचे महाराष्ट्राचे. सध्या ते उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे नोकरीनिमित्त राहत आहेत आणि तिथे मराठी साहित्याची साधना करत आहेत. डॉक्टर भुयेकर यांनी विज्ञान विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली असून मराठी विषयात मराठी कादंबरीतील पर्यावरणीय जाणिवांचा अभ्यास या विषयात पीएचडी केली आहे. सन २०१९ पासून उत्तर प्रदेशातील बनारस विद्यापीठात डॉक्टर भुयेकर साहाय्यक प्राध्यापक म्हणून मराठी विषयाचे अध्यापन करत आहेत. २०१४ साली 'नांगर' हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित झाला. परंतु डॉक्टर भुयेकर फक्तकविता लिहीत नाहीत तर ते ललित लेख लिहितात आणि समीक्षणात्मक लेखही लिहीत असतात. मराठी प्रदेशापासून दूर राहूनही डॉक्टर संदीप भुयेकर मराठी साहित्यलेखन करत असतात, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

**गड्या आपला गाव बरा – संदीप भुयेकर**

गावाचे आपल्यावर अनंत उपकार असतात. अडी-अडचणीला गावातली माणसं एका हाकेला धावून येतात. एरवी एकमेकांमध्ये हेवेदावे असणारे आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भावकी-भावकीमध्ये ईर्ष्या करणारे गावकरी संकटकाळामध्ये मात्र एकसंघ होतात. एकजीव होतात. गावाच्या जत्रा-यात्रा आणि सणासमारंभामध्येही गावाची ही एकत्वाची भावना सगळ्या गोष्टी निर्विकारपणे पार पाडत असते. ग्रामदेवता, राजकारणी, उच्चपदस्थ अधिकारी, लेखक-कवी, खेळाडू ही सगळी मंडळी गावाला प्रसिद्धी मिळवून देत असतात. काही गुन्हेगार किंवा गुंडांमुळे गाव कुप्रसिद्ध होते तेव्हा गावाला ते रुचत नाही. बाहेरच्या जगात गावकऱ्यांची ओळख केवळ गावामुळेच ठाशीव होत असते. काळाच्या ओघात गावाचे गावपण हरवत चालले असले तरी गावाचे आपलेपण मात्र अबाधितच आहे, असे मला वाटते. गावाच्या आदिमतेच्या खुणा जितक्या जास्त, गाव जितके अप्रगत, जितके अनागर तितका तिथला आपलेपणाचा ओलावा जास्त. अशा गावात माणुसकीचे झरे लवकर खळाळू लागतात. आपलेपणाचा गंध गावभर दरवळत असतो. ह्या आपलेपणासाठी गावातली घरे एकमेकांना खेटून असावीत असे काही नसते. कोकणात वाड्या-वाड्यांची लोकवस्ती असते. चार-पाच वाड्यांचा मिळून एक गाव बनतो, तरीही त्यांच्यातली एकत्वाची भावना गुरुत्वाकर्षणासारखी बळकट असते. शिमगा, गणेशउत्सव, कात्रादेवीची यात्रा, भराडीदेवीची यात्रा, अंजनेश्वराची त्रिपुरारी, मानेश्वराचे श्रावण सोमवार इत्यादी प्रसंगांच्या वेळी आपलेपणाच्या या बागेला फुलोरा येतो. जो शहरवासी सण-उत्सवाला सुट्टीला गावाकडे येऊन हजेरी लावत नाही तो गावकऱ्यांच्या दृष्टीने गावाला विसरलेला असतो. वास्तव परिस्थिती काही असो; पण गावकऱ्यांच्या दृष्टीने तो पैसेवाला झालेला असतो, त्याला माज आलेला असतो वगैरे वगैरे. गावाच्या गावपणाला खतपाणी घालणारी कोकणातली आणखी एक बाब म्हणजे ग्रामदेवतेच्या देवराया व देवस्थानची जमीन. देवराया म्हणजे स्थानदेवतेच्या

नावाने वाढवलेला आरक्षित जंगलाचा पट्टा. या प्रदेशात वृक्षतोड करण्यास वा शिकार करण्यास अघोषित बंदी असते. या जंगलाच्या सुरक्षिततेसाठी एखादी गूढकथा, दैवी कोपाची आख्यायिका किंवा भुताची गोष्ट मोलाची भूमिका बजावत असते. देवस्थानच्या शेतजमिनीवर भात, नाचणी यांसारखी स्थानिक पिके घेतली जातात. सगळे गावकरी मिळून दिवस ठरवतात व ही शेती कसतात. कुणीतरी ठरलेला पिढीजात मानकरी या पिकाच्या नियोजनात सुसूत्रता आणतो. सुगी होते आणि आलेल्या मिळकतीतून देवस्थानचा वार्षिक खर्च भागवला जातो. गावातला सामुदायिक भागवत सप्ताह किंवा जेवणाची पंगत त्यातला अविभाज्य भाग. इथे जात-पंथ, धर्म-कर्म असा कोणताच भेदभाव नाही. 'ह्यो आपलो गावकरी' एवढीच एक भावना. या बहुमुल्य गावठी भावनेचा विस्तार कधीकधी आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील पोहोचतो.

महाराष्ट्राच्या बाहेर गेलो आणि तिथे एखादा मराठी बोलणारा माणूस भेटला तर लगेच तो आपला गावकरी होतो मग भले तो चांद्यापासून बांद्यापर्यंत कुठला का रहिवासी असेना. तो आपला भाऊच. त्याच्याइतका विश्वासपात्र माणूस या घडीला तरी तुमच्याकडे असणार नाही. मी छत्तीसगडला असताना मला असाच एक चहाटपरीवाला मराठी माणूस भेटला. त्याला कोण आनंद झाला म्हणून सांगू! आपली सगळी सुखदुःखे सांगण्यासाठी त्याने मला हक्काचे माहेरच बनवून टाकले. चहाच्या तलफेपेक्षा त्याच्याकडे जाऊन गप्पा मारण्याचीच मला तल्लफ यायची. अनोळखी पायवाटेवर चालायला कुणीतरी गावातला सोबती मिळाला आहे, असे वाटायचे. भारताच्या बाहेर खेडेगावातले कुणी दोन भारतीय भेटले तर त्यांच्यासाठी भारत हा विशाल देश वगैरे काही असत नाही. ते गावकरीच असतात आणि त्यांच्या गावाचे नाव असते – भारत.

माणूस कुठल्याही खंडावर असो, बालपणीच्या आठवणी मातीच्या गंधासारख्या त्याच्या मेंदूत साठतात. नवा पाउस पडला की मातीला छान गंध येतो, तसे प्रत्येक सुख-दुःखाच्या प्रसंगात त्याला आपले बालपण आठवते. पर्यायाने गाव आठवतो. हा मृदुगंध त्याला पुन्हा पुन्हा अनुभवावा, असे वाटते. गावाची ओढ त्याला जत्रा-यात्रेला आपल्याकडे आकर्षित करून घेते. छटपूजेसाठी उत्तरप्रदेश-बिहारकडचे लोक मग काहीही करून गावची वाट धरतात. ओणमच्या दिवसांत केरळकडे जाणाऱ्या गाड्या हाऊसफुल होतात, ख्रिसमसला गोवा हाउसफुल होतो. श्रावणात गंगेच्या पाण्याच्या कावडी भरून 'बोल.. बम'चे नारे देत लोक मैलोनमैल चालतात. गणपतीला गावाकडे जाण्याचे नियोजन कोकणी चाकरमानी माणूस सहा महिने अगोदरच करून ठेवतो. कुणी जोतिबाच्या चैत्रपौर्णिमा यात्रेचा गुलाल वर्षभर देव्हाऱ्यावर ठेवतो. कुणी खंडोबाच्या सोमवती अमावास्येचा भंडारा घेऊन येतो. विठोबाच्या आषाढी वारीतली भक्तीची गंधगोळी वर्षभर कपाळाला लावून वारकरी सजतो. पंढरपुरातून आणलेला लाखेचा चुडाही सुवासिनी सोन्याप्रमाणे जपतात. वर्षातून एकदा तरी सवड काढून गावकरी जुगाईचा राखणीचा नारळ घेऊन जातात. नवरात्रात अंबाबाईला, तुळजाभवानीला, विंध्यवासिनीला तेल- तुपाचे दिवे लावतात. या सगळ्यात केवळ श्रद्धा परंपरेचा भाग नाही तर गावाच्या गावपणाशी स्वतः ला जोडून घेण्याची माणसाची सहजसुलभ आदिम प्रवृत्ती असते. त्याच्या रित्या मनाची ही सांस्कृतिक गरज गाव भागवत असते.

लहानपणी आम्ही कोल्हापुरातून गावाकडे जायचे असेल तर अगदी बिनधास्तपणे एसटी स्टँडवर बसून राहायचो. एखादा गावकरी गडबडीने एसटीकडे किंवा वडापकडे चालताना दिसला की समजून जायचे की आता गावाकडे जायची गाडी लागली.- 'उठा!' गावकऱ्यांचे एसटीकडे जाणे हीच आमच्या गावाला जाण्यासाठी कोणते तरी वाहन उपलब्ध झाल्याची खूण असायची. गर्दी असो वा नसो एक जागा उगाचच पकडून ठेवायची. कुणी गावकरी दिसला, की त्याला ती जागा देऊन टाकायची; की गावगप्पा करायला मोकळे. जोतिबावर यात्रेत, खेट्याला गेल्यावर गावकरी चुकू नये म्हणून आम्ही आमची एक खूण बनवून ठेवली आहे. कोणीही गावकरी मुलगा असो की म्हातारा त्याला चुकलो असे वाटले किंवा पायवाटेने चालायला जोडीदार हवा असेल तर त्याने तोफेपाशी जाऊन थांबायचे. गावात जाणारा माणूस जाता-येता त्या तोफेकडे एकदातरी पाहणारच व त्याला एक तरी गावकरी भेटणारच. मग मिळून चालत यायला सोपे. सर्व गावकऱ्यांना न शिकवता तोफेचा हा नियम आता पाठ झालेला आहे.

गावातल्या पोरांना गावातल्या गल्लीबोळांची खडानखडा माहिती असते. कुठल्या दुकानात दोन रुपयांत चिंचेचे गोळे मिळतात, कुठल्या दुकानात लेमनगोळ्या घेतल्यानंतर लॉटरीचे तिकीट मोफत मिळते, कुठल्या दुकानात नव्याकोऱ्या वह्या डेरेदाखल झाल्या आहेत, कुठल्या दुकानात खेळायच्या गोट्या मिळतात याची माहिती कुठलेही जाहिरात शुल्क न आकारता ते एकमेकांना देत असतात. गावात कधीमधे येणारी भाचेमंडळीही गावाचाच हिस्सा असतात. मग एखादी म्हातारी आदबीन त्याची चौकशी करील. 'कुणाचा र तू बाळ?' इथे मात्र बेरके पोरगे वडिलांचे नाव सांगणार नाही. 'रावबाच्या अंजीचा नातू' किंवा 'माळीतल्यांच्या मंजूचा पोरगा' अशी काहीतरी आपली ओळख करून देईल. मग म्हातारी त्याला आपलाच नातू असल्यागत त्याच्या गालाला हात लावून बोट मोडून आशीर्वाद देईल. तशात ही एखाद्या पाहुण्याचे एखादे लहान पोर चुकलंच तर गल्ली-भावकीतले दहा-पंधरा जण लगेच त्याची तिकटी, रस्ते, देऊळ, दुकाने येथे शोधमोहीम चालू करतील. आपल्याच घरातलं कुणीतरी हरवलंय या आपुलकीने त्या पोराला शोधून आणतील. त्याच्या आईच्या स्वाधीन करतील. सोप्यात बसून त्याच्या कुटुंबीयांशी आपल्या बालपणीच्या गप्पा मारतील. पोर सापडल्याच्या आनंदात घरात रटारट चहा शिजेल. नको नको

म्हणतानाही सोप्यातल्या सगळ्या जणांना चहा दिला जाईल. 'मोहीम फत्ते'च्या आवेशात सगळे शेजारी मग आपापल्या कामाला निघून जातील. आपुलकीचे हे चांदणे वर्षानुवर्षे सांडत राहील.

गावाकडच्या मित्रांची मैत्रीही निरागस आणि नि:स्वार्थ असते. हे खरे लंगोटीयार दोस्त असतात. आयुष्याच्या अखेरपर्यंत कधी हाक मारली तरी तुमच्या हाकेला धावून येणारे असतात. एखादा यशस्वी झाला तर त्याला गौरवाचा फेटा बांधणारे असतात आणि एखादा अयशस्वी झाला तरी त्याला बहुमोलाचा धीर देणारे असतात. ज्याच्याशी मनाच्या तळातले काहीतरी बोलावे अशी विश्वासार्हता त्यांनी जपलेली असते. नंतरच्या काळात व्यवसायाच्या निमित्ताने जवळ येणारे मित्र भावनिक दृष्ट्या इतके ओलसर नसतात. जुन्या गावठाण मित्रांमुळे जगण्यात नवे रंग भरले जात असतात.

गावात चुकूनमाकून एखादा अपघात झाला तर गावकरी तिकडे धावून जातील. कोण-कुठला याची सांगोपांग चौकशी करतील. काहीतरी जुगाड करून जखमीला दवाखान्यात नेऊन सोडतील. त्यातही जखमी झालेला आपल्या गावचा असेल तर दवाखान्यात त्याला पाहायला लोक एवढी गर्दी करतील की विचारू नका. आपले एवढे चाहते आहेत या गोष्टीचा त्या गावकऱ्याला तेव्हा प्रथमच साक्षात्कार होतो आणि तो मनोमन सुखावतोही. रस्त्यावर भांडताना दोन माणसे दिसली की चूक कोणाची आहे हे आजही गावात जाणून घेतले जात नाही. सदर प्रकरणात केवळ आणि केवळ गावकऱ्यांची बाजू ऐकून घेतली जाते आणि न्यायदानाचे काम ही परस्पर उरकून दुसऱ्या इसमास तिथून पळ काढण्यास भाग पाडले जाते. आपल्या गावाइतके सुरक्षित आपण कुठेच नसतो.

खंडेनवमीला भैरोबाचा दंडवत हा गावाचा अलिखित नियम. दसऱ्याचे सोने लुटणे, दिवाळी पाडव्याची ग्रामप्रदक्षिणा, वेगवेगळ्या देवळांतले हरिनामसप्ताह आणि महाप्रसाद, जोतिबाची सासनकाठी, गल्लोगल्लीच्या सार्वजनिक गणपती मंडळाच्या मिरवणुकी, आंबेडकरजयंती, ईदच्या ताबूतभेटी या सगळ्या सण-उत्सवांमध्ये गावकरी एकत्र येऊन आपल्या दुःखाचा निचरा करतात. हेव्यादाव्यांचा कडेलोट करतात. सुखाचे क्षण वेचतात आणि स्वतः समाधानाचा अभिषेक करून घेतात. 'अनुभव ते जाणती जे गुरुपदीचे रहिवासी' या उक्तीप्रमाणे त्यांचे हे समाधान शब्दातीत असते.


लग्नासाठी एखाद्या गावातले स्थळ आले तर त्यासंबंधित वधू-वराची माहिती मिळवण्यासाठी आधी तिथला गावकरी गाठा. गावातल्या माणसाने गावातल्या माणसाविषयी दिलेली माहिती म्हणजे इतरांसाठी ब्रह्मवाक्य! म्हणून पावण्या-पयाचा धागादोरा काढून सोयरीक जुळणारे संबंधित गावातल्या एखाद्या घरी येऊन जातात. शिपीभर दारू पिऊन गावातला एखादा जुनाजाणता म्हातारा गावची सगळी बित्तंबातमी सांगणार. त्यात आजकालची पोरे कशी फिरतात, अमक्याच्या पोरांने शिकून कसं नशीब काढलं, तमक्याचं पोरगं कसं आहे, अमकीच्या नवऱ्याचं नी तमकीच्या बायकोचं कसं लफड आहे,ही हेडलाईन असणारच. गावाच्या सातबाऱ्यावरच्या असल्या सगळ्या नोंदी नोंदवून मग हा म्हातारा मूळ मुद्यावर येऊन संबंधित वधू-वरांची खरी खोचं सांगणार. वराला ते पटत नसले तरी वरपित्याला त्याची अनुभवजन्य खात्री असल्याने म्हाताऱ्याच्या मतावरच लग्नाचा अंतिम निर्णय होण्याची शक्यता जास्त असते. बरे हे प्रकरण इथेच थांबत नाही. ज्या घरातल्या लोकांची गुप्त चौकशी चालू असते त्या गावकऱ्यांना हाच म्हातारा माहिती पुरवतो की, आशानं असं की तुमच्या पोरीची माहिती काढायला पाव्हण आलं होतं मी सगळं चांगलं आहे म्हणून सांगितलं आहे. मांडवावर चढणारा वेलं खुडू नये म्हाताऱ्याचे मांडवावर चढणारा वेल खुडू नये म्हणजे लग्नात मोडता घालू नये हे गावकीचे तत्त्वज्ञान पिढ्यांनपिढ्यांची सोयरीक जुळवत आलेले आहे.

महात्मा गांधीजी म्हणाले होते, 'खेड्याकडे चला'. पण, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव झाला तरी गाव आणि शहर यांच्यातली दरी बुजलेली नाही. शेतमालाला पुरेसा भाव मिळत नाही. शेती अधिक बेभरवशाची झाली आहे. रोजगाराच्या संधी अपुऱ्या पडताहेत. कधी कधी वाटते गाव शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्यासारखे अगतिक झाले आहे. चांगले शिक्षण, आरोग्य सुविधा, दळणवळणाच्या सोयी, विश्वासार्ह बँका, पिण्याचे पाणी इत्यादी बाबतीत आजही गाव तहानलेलाच आहे. गावातले शिकले-सवरलेले लोक हीच कारणे सांगून शहरांचा रस्ता धरताहेत. आपल्या अंगाखांद्यावर खेळवलेली ही लेकर गाव सोडून जात असताना गावाचा जीव तीळ-तीळ तुटत असेल. त्याच्याही डोळ्यांत आसवे दाटत असतील. त्यालाही वियोगाचे दुखः होत असेल. तरीही आपला आवंढा गिळून गाव तुम्हाला हसमुख होऊन शुभेच्छाच देत असते.

टीव्ही, मोबाइलमुळे गाव बदलला असला आणि राजकारणाने त्याचा विचका झाला असला तरी 'हा माझा गाव आहे' ही गावपणाची भावना नेहमीच वरचढ ठरते. जात-पात, धर्म-पंथ, गरीब-श्रीमंत या सगळ्या भेदभावना गावपणाच्या सरबतात अलगद विरघळून जातात. हे गावपणाचे सरबत सगळ्या गावकऱ्यांना थंडगार करत असते. त्यांच्या नसानसात माणुसकीचा गोडवा पेरत असते. माणूस चंद्रावर गेला किंवा मंगळावर गेला तरी तिथूनही आपला गावच शोधेल आणि म्हणेल, गड्या आपला गाव बरा! गड्या आपला गाव बरा!

**– संदीप भुयेकर**
sandipbhuyekar9@gmail.com

**– किरण येले**
kiran.yele@gmail.com




प्रभाकर भिडे

# एका लेखकाची गोष्ट

**काही** वर्षांपूर्वी अमीरखानचा 'तारे जमीपर' हा सुंदर व प्रेरणादायी चित्रपट आला होता. त्यात छोटा मुलगा व त्याला समजून घेणारे शिक्षक यांची नितांतसुंदर कथा गुंफलेली आहे. चित्रपटात एक वाक्य आहे- Every child is special. प्रत्येक मुलामध्ये देवाने कोणतीतरी चांगली कला किंवा वैशिष्ट्य गुंफलेले असते. मात्र आईवडिलांनी ती ओळखली नाही तर मुलगा शाळा किंवा शिक्षणामध्ये मागे पडतो व आईवडिलांची काळजी सुरू होते. या चित्रपटामध्ये अमीरखान (एक शिक्षक) ती बाब ओळखतो. त्या मुलाला समजून घेऊन त्याच्या कलेला वाव देतो व त्यांतून स्पर्धेत (हजारो मुलांमध्ये) तो उत्तम चित्र काढून स्पर्धा जिंकतो. चित्रपटामधील गाणी फार भावस्पर्शी असून आईवरचे एक गाणे डोळ्यांत पाणी उभे करते. कथाबीज चांगले असले की चित्रपट सर्वांना आवडतो.

वरील गोष्ट सांगायचे कारण म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अशाच एका लेखकाचा जन्म गोव्यातील सत्तरी परगण्यामधील आंबेडे या गावी झाला. त्यांचे वडील पुराणिक होते. पूर्वी प्रत्येक देवळात पुराणिक चातुर्मासात व इतर वेळी हरीविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत अशा ग्रंथांतील कथा सांगून लोकांपुढे जीवन कशाप्रकारे जगावे याचा एक वस्तुपाठ उभा करत. पूर्वी शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अशा कथा/गोष्टीमधून सांगितलेली धर्मतत्त्वे व जीवन जगण्याची सांस्कृतिक परंपरा लोकांना समजत असे. अशा पुराणिकांच्या पोटी महादेवचा जन्म झाला. दुर्दैवाने वडिलांचे लवकर निधन झाले. खेडेगावात उत्पन्नाचे साधन नसे. यांच्या गावात शाळाच नव्हती. तसेच, गावामध्ये दोनच मुख्य जाती होत्या. ब्राह्मण आणि कुळवाडी, जे सर्वसाधारणपणे मेहनत करून पोट भरत बौद्धिकदृष्ट्या दोन्ही जातींमध्ये विशेष फरक नसे.



महादेवशास्त्री जोशी

घरच्या लोकांनी महादेवाला पुढच्या शिक्षणासाठी सांगलीच्या वेदपाठशाळेत पौरोहित्य व वेदअध्ययन करण्यासाठी पाठवले. या मुलाला पाठशाळेत शिकत असताना मराठी वाचनाची गोडी लागली. त्याला वेळ मिळेल तेव्हा वाचनालयात जाऊन बसण्याचा छंद लागला. पाठशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी क्वचितच कोणी वाचनालयात जाऊन वाचत असत. त्यांचे मन लघुकथांवर झेपावत असे. खांडेकराच्या भावनास्पर्शी व समृद्ध भाषेमुळे त्यांच्या कथा त्यांच्या हृदयाला भिडत. त्यावेळचे प्रसिद्ध लघुकथालेखक विठ्ठल सीताराम गुर्जर यांच्या कथा आवडत. साहजिकच त्यांच्या मनात येई की अशा कथा आपण का लिहू नये.

त्यांनी मनोमन लघुकथालेखक व्हायचे ठरवले. त्याचवेळचे प्रसिद्ध कादंबरीकार हरीभाऊ आपटे यांच्या कथा व कादंबऱ्या सपाटून वाचल्या.

या वाचनामुळे मराठी साहित्यविश्व आपले गाव धाब्या आंबेडच्यामधून किती मोठे आहे याची जाणीव झाली. तोपर्यंत त्यांनी वेदपाठशाळेतील सात वर्षांचे शिक्षण पूर्ण केले. तेथे त्यांना लिखाणवाचनाबरोबर ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा व इतर धार्मिक ग्रंथ (रामायण-महाभारत) वगैरेचे आकलन झाले. ते आता दशग्रंथी ब्राह्मण म्हणून शिक्षण पूर्ण करून गोव्याला आपल्या गावाला परतले. मात्र तेथे पुढील चरितार्थासाठी काहीच साधन नव्हते त्यामुळे त्यांनी पुण्याकडे मोर्चा वळवला. तेथे अनेक देवालये असल्यामुळे पुराणिक/प्रवचनकार अशी कामे मिळण्याची शक्यता होती. त्याप्रमाणे पुण्यातील दोन/तीन देवळांमध्ये ते धार्मिक कामे करू लागले. आता आपण काहीतरी लिहावे म्हणून आपल्या सहाध्यायांच्या मदतीने 'सद्विचार' नावाचे मासिक सुरू केले. ते चारपाच वर्षे चालवले. पुणे त्यावेळी विद्येचे व ज्ञानाचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध होते. वेदपाठशाळेमध्ये त्यांनी कालिदास अभ्यासला होता. अर्थात तो तर संस्कृतभाषेचा मेरूमणी होता. ज्ञानेश्वर मराठी भाषेतील उत्तम कवी व तुकारामाच्या अभंगांनी त्यांना समृद्ध केले होते. (त्यावेळी गुरुपरंपरा होती पण या तिघांशिवाय दुसरे कोणी गुरू त्यांना मिळाले नाही.)

त्याच सुमारास पुण्याहून 'ध्रुव' नावाचे मासिक संपादक रा.प्र. कानिटकर चालवत असत. त्यांनी मासिकासाठी एक कथास्पर्धा जाहीर केली. त्यामध्ये परीक्षक न नेमता वाचकांनी त्यांना आवडलेली कथा सांगावी असे जाहीर केले.

त्यात महादेवशास्त्रींनी लिहिलेली 'धन आणि मन' ही कथा प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. ही कथा एका सावकारावर होती. परंतु हा सावकार आपल्या मनातील सावकाराच्या कल्पनेपेक्षा वेगळा होता. त्याचा एक ऋणको किंवा कर्जदार मुद्दल नव्हेच; व्याजपण देऊ शकत नव्हता तरी यावर्षी कसेही करून निदान व्याजतरी वसूल करायचे असे ठरवून सावकार कर्जदाराच्या घरी व्याज मिळेपर्यंत मुक्काम करायचा असे ठरवून जातो. परंतु ऋणकोच्या दारात गेल्यावर त्याचे जे दर्शन सावकाराला होते त्याने त्याचा निर्णय कोलमडून पडतो. ऋणकोचे घर जायच्या-यायच्या वाटेवर होते. त्यामुळे गरीब, दीनदुबळ्या प्रवाशांना तेथे आश्रय मिळायचा. अंगणात येऊन बसलेल्या कुळवाड्यांना तेथे हम खास द्रोणभर पेज मिळत असे. कोणीही वाटसरू त्या घराच्या ओसरीत तहान शमवण्यासाठी यायचा. एक दिवसरात्रीच्या वस्तीत सावकाराने हे सारे पाहिले. रात्री कर्जफेडीच्या गोष्टी निघाल्या तेव्हा ऋणकोने सावकाराला स्पष्ट सांगितले-

माझ्याकडून तुमचे कर्ज फिटेल असे आता वाटत नाही तेव्हा कर्जफेडीचा एक उपाय म्हणजे तुम्ही माझे घर आणि मागचे कुळागार घेऊन टाका. एखाद्या जातिवंत सावकाराला हा उपाय ऐकून आनंद झाला असता, पण या सावकाराला तसा आनंद होत नाही. तो उत्तर देतो ते अनपेक्षित व ऋणकोला धक्का देणारे असते.

सावकार म्हणतो, जनुभाऊ ठिकाण (घर) देण्याचा वेडेपणा तुम्ही करू नका. ते घेण्याचा लोभ मीही करणार नाही. हातचे घर गेले, जमीन गेली की तुम्हाला लाचारीने दिवस काढावे लागतील. ज्याला स्थान (घर) नाही त्याला मान नाही. या तुमच्या हजार रुपयांसाठी माझी चूल अडलेली नाही. तुमच्याकडून कर्जवसुली करताना मला माझी माणुसकी विसरता कामा नये. तुम्ही सवड होईल तेव्हा आणि तसे पैसे मला द्या. मी ते मुद्दलांतून फिटले असे समजेन. व्याजाची मला हाव नाही. आणि आणखी एक गोष्ट सांगतो-

आल्यागेल्याचे विश्रांतिस्थान अन् गोरगरिबांना घासभर अन्न देणारे हे तुमचे वाटेवरचे घर मी मोडले असे व्हायला नको. सावकाराच्या अशा दर्शनाने जनुभाऊ भारावून जातात. सुदैवाने त्यांना पुढे पैसे मिळतात आणि सावकाराचे सर्व पैसे परत देऊ करतात त्यावेळी सावकाराला त्याचा त्यागही करता येईना व स्वीकारताही येईना. (त्यावेळी ऋणकोने सावकाराची परीक्षा पाहण्यासाठी नाटक केले असावे) शेवटी त्यातले ५०० रुपये सावकार वेगळे काढतात व जनुभाऊंच्या पत्नीकडे देऊन ही धाकट्या भावाची 'प्रेमाची भाऊबीज' म्हणून निघून जातात.

या कथेमुळे महादेवशास्त्रींचा कथालेखनाचा आत्म विश्वास वाढला आणि महाराष्ट्रातील सर्वसामान्य वाचकवर्गाची मनोवृत्तीही कळून आली. असे दिसून आले की वाचकांची मानवी सद्भावनेवर श्रद्धा होती. वाचकांच्या अतरांत माणुसकीचा गहिवर होता. येथे वाचक व लेखक यांचा सांधा जुळला होता. या यशाने त्यांच्या कथालेखनाचा पुढील मार्ग निश्चित झाला.

आपल्या कथासाहित्याच्या माध्यमातून मनुष्याच्या मनावर सद्भावनांचे संस्कार करणे हे महादेवशास्त्रींचे उद्दिष्ट असावे असे वाटते. आपल्या निष्ठेवर त्यांची श्रद्धा आहे म्हणून जीवनविषयासंबंधी विचार, त्यांचे साहित्यिक कर्तृत्व व त्यांची आचरणशीलता यामध्ये एकवाक्यता आढळते. त्यांच्या कथेमधील पात्रे त्यांच्या आजुबाजूची किंवा लहानपणापासून अनुभवलेली असतात. त्यांची दुसरी कथा 'कन्यादान' या

त्यांच्या जीवनात घडलेल्या गोष्टीचा विचार केला तर त्यांनी आचरणात आणलेली जीवनमूल्ये किती उच्च दर्जाची होती याचा प्रत्यय येतो. यामध्ये दोन मित्र असतात. त्यातील एकाचे म्हणजे नानांचे दुसऱ्या मित्राला पत्र येते. पत्रातून नानाच्या मुलीला स्थळ सुचवलेले असते. नानाच्या संमतीने त्यांच्या मुलीच्या लग्नाची जबाबदारी कथानिवेदक मित्राने म्हणजे दुसऱ्याने घेतलेली असते. ते मित्राच्या मुलीला म्हणजे कुमारी प्रतिभेला आपल्या घरी आणतात व लग्नाची सर्व तयारी करतात. लग्नाची वेळ जवळ येऊन ठेपली तरी प्रत्यक्ष मुलीचा बाप म्हणजे नाना लग्नासाठी येत नाही. ऐनवेळी नानाच्या पत्नीचे नानांना गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यात पकडल्याचे पत्र येते. लग्नाचा सारा खर्च हा मित्रच करतो. लग्नाला आईबाप येऊ शकत नाहीत म्हणून वरपित्याला चिंता वाटू लागते, पण कन्यादान करण्यासाठी तयार झालेला प्रतिभेचा बाप ठरल्यावेळी व ठरलेल्या पद्धतीने लग्न होईल असे आश्वासन देतो. त्यातही परिसीमा म्हणजे हुंड्याचा खर्च म्हणून आपल्या बायकोचे दागिने गहाण ठेवतो. नानांची मुलगी प्रतिभा त्याला विरोध करते. शेवटी कळस म्हणजे ती दोघे (नवराबायको) पती-पत्नी हुंडा देण्यासाठी लग्नाच्या वेळी वरपक्षाकडे जातात. तेव्हा तो नवरा हुंड्याचे पैसे स्वीकारायला तयार होत नाही. जावई म्हणतो आधी काकूंच्या बिल्वर/पाटल्या हातात येऊ देत. मग कन्यादान. मला हुंडा नको. हे सर्व अकल्पित वाटणारे आहे. पण ही कथा सत्य असल्याचे समजते. यांच्या प्रत्येक कथेत व्यक्ती आणि व्यक्तीचे मन हे कथेचे मध्यवर्ती केंद्र आहे. कथेतील भावनांशी एकरूप होऊन हलक्या व नाजूक हाताने त्या सोडवतात. अशा कथांचे दहा संग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

महादेवशास्त्री जोशींच्या बहुतेक कथा गोमतंकीय असल्या तरी गोव्याच्या प्रादेशिक जीवनापुरत्या मर्यादित नाहीत. पं. महादेवशास्त्रीच्या कथा हृदयस्पर्शी व कौटुंबिक जिव्हाळ्याचे प्रश्न हाताळणाऱ्या आहेत. त्यांच्या कथेतील कौटुंबिक विषय, कौटुंबिक समस्या अगर सुखदु:खे सर्वसामान्य माणसांच्या जीवनात पदोपदी येणारे अनुभव आहेत. त्यामुळे वाचकांना ते आपले अनुभव वाटतात व त्यांची नाळ त्या कथांशी जोडली जाते. त्यांच्या 'गोपी', 'चतुर्भुज', 'येरे माझ्या मागल्या', 'आज मी असेच बोलणार' या कथांची बीजे त्यांना गोव्याच्या जीवनातून सापडली.

मराठी साहित्यात त्यांच्या कथांचे स्थान अनन्यसाधारण आहे. खरे म्हणजे त्याचवेळी चार मराठी नवकथाकार (गाडगीळ, भावे, गोखले, माडगूळकर) आपल्या नवकथा सादर करून आपले मराठी साहित्यविश्वातील स्थान निर्माण करत होते. तरी यांची पारंपरिक कथाही टिकून राहिली. त्यांच्या अनेक कथांवर चित्रपटसृष्टीचे लक्ष गेले व त्यांतून दहाच्या वर चित्रपट निर्माण झाले. त्यांच्या कथेवरील चित्रपट म्हणजे 'मानिनी', हिंदी 'मानापमान', 'बहुभेटी', 'धर्मकन्या', 'जिव्हाळा', 'अरे संसार संसार', 'जावई माझा भला', 'बहिष्कार' वगैरे आहेत. कारण चित्रपटांना लागणारे नाट्य त्यांच्या कथेत भरपूर होते.

त्यांच्या कथासंग्रहांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांचा कथालेखनाचा बहराचा काळ १९४० ते १९६० असा होता. पुढे त्यांनी कथालेखन थांबवले व त्यापेक्षा मोठे कार्य म्हणजे संस्कृतिकोश लिहिले. भारतीय संस्कृतिकोशाचे कार्यालय पुण्याला होते. त्यामधून त्यांनी अनेक सांस्कृतिक कोश खंडाची निर्मिती केली.

फारसे पारंपरिक शिक्षण नसताना स्वत:च्या प्रतिभेने, अनुभव व मेहनतीने आपले मराठी साहित्यातील स्थान निर्माण केले. त्यांच्या संस्कृतमधील 'पर्जन्यकुंडम्' या कथेला बक्षीस मिळाले. तसेच, प्रसिद्ध नाटककार बाळ कोल्हटकर यांनी 'दुरितांचे तिमिर जावो' हे नाटक लिहिले. भालचंद्र पेंढारकरांच्या प्रसिद्ध 'ललित कलादर्श' संस्थेने त्याचे शेकडो प्रयोग केले. अमाप लोकप्रियतेचा मिळवली. असे हे महादेवशास्त्री जोशींचे कथाविश्व. आपण वाचू लागलो की त्यांच्या प्रेमात पडतो.

बेलविस्तार, खडकातले पाझर, मोहनवेल, कल्पित आणि सत्य, कथाकांता, भावबळ, प्रतिमा, घररिघी, पुत्रवती, कन्यादान ही त्यांच्या दहा कथासंग्रहाची नावे. त्यांचे 'आत्मपुराण' हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

संदर्भ : 'आलेख'. मधुश्री प्रकाशन. लेखिका - श्रीमती अर्चना पंडित. (डोंबिवलीच्या आदानप्रदान प्रदर्शनात मिळालेल्या पुस्तकाची गोष्ट)

**– प्रभाकर भिडे**
भ्रमणध्वनी : ९८९२५६३१५४

**'विज्ञानधारा' व 'आरोग्य' या यात्रांच्या आयोजनांमुळे ग्रंथाली-प्रतिभांगण या वांद्रे येथील वास्तूत २० नोव्हेंबर ते २५ डिसेंबर कार्यक्रम होणार नाहीत.**

## डॉ. सुरेश हावरे यांच्याशी कॉर्पोरेट गप्पा

ग्रंथाली-प्रतिभांगण आणि उद्योगविश्व आयोजित 'कॉर्पोरेट गप्पा'च्या दहाव्या भागात हावरे ग्रुप ऑफ कंपनीजचे डॉ. सुरेश हावरे यांची मुलाखत 'उद्योगविश्व'चे संपादक ज्ञानेश चांदेकर यांनी घेतली. या मुलाखतीतून हावरे यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व उलगडत गेले. अणुशास्त्रज्ञ, बांधकाम व्यावसायिक, साई संस्थानचे अध्यक्ष, साहसी खेळाडू असे हावरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू या मुलाखतीत उलगडत गेले. घरची गरीब परिस्थिती, वडील राष्ट्रीय संघाचे स्वयंसेवक असल्याने आणीबाणीच्या काळात त्यांना झालेली अटक, अशा संकटांतून वाट काढत हावरे केमिकल इंजिनीयर झाले. पुढे भाभा ऑटोमिक एनर्जीमध्ये संशोधन करण्यासाठी त्यांची निवड झाली, ज्यातून त्यांच्यामधला अभ्यासू शास्त्रज्ञ घडला. पुढे जवळपास २६-२७ वर्षे त्यांनी देशासाठी योगदान दिले. या काळात हावरे यांनी न्युक्लियर रिॲक्टर लायसनिंग कोडचे केलेले संशोधन आजही वरदान ठरले आहे. बीएआरसीत असताना ते न्युक्लियर सबमरिन या विषयावर संशोधन करत होते. पुढे आयएनएस अरिहंत या पाणबुडीची निर्मिती करण्यात भारतीय शास्त्रज्ञांना यश मिळाले. ते यश 'याचि देही याचि डोळा' पाहण्याचे भाग्य आपल्याला मिळाले, अशा शब्दांत हावरे यांनी आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या.

बांधकाम व्यवसायात ते अपघाताने आले. २००५मध्ये त्यांच्या लहान भावाचे अपघातात निधन झाले. त्यामुळे घरच्या या व्यवसायाची जबाबदारी सुरेश हावरे यांच्यावर आली. 'नॅनो हाऊसिंग' ही कल्पना आपण प्रत्यक्षात कशी उतरवली, याविषयी त्यांनी सांगितले. सर्वसामान्य माणसांसाठी त्यांना परवडतील अशा प्रकारची घरे आपण बांधली, या विषयीची कृतार्थता त्यांनी व्यक्त केली. प्रत्येक व्यावसायिकाने व्यवसाय करताना, आपले मार्जिन काढताना ग्राहकाचा विचार पहिल्यांदा केला पाहिजे, ज्याला आपण 'मार्जिन ऑफ ऑनेस्टी' म्हणतो, त्याचा विचार केला पाहिजे, असे ते म्हणाले. सैनिक, शिक्षक, कलावंत, साहित्यिक यांच्यासाठी घरांचे आरक्षण ठेवून सामाजिक बांधिलकी कशी राखतो, याबद्दल त्यांनी सांगितले.

शिर्डीच्या साई संस्थानचे अध्यक्ष असताना राबवलेल्या महत्त्वाकांक्षी योजनांविषयी बोलले. निर्माल्यातून अगरबत्ती-निर्मिती, अन्नछत्रात विनामूल्य जेवण, शिर्डी शहरातील स्वच्छता, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट प्लॅन्ट, रक्तदान मोहीम असे उपक्रम त्यांनी साई संस्थानात राबवले.

विविध स्तरांवर काम करत असताना ते साहसी खेळांचा छंदही जोपासत असतात.

प्रस्तुत कार्यक्रमाचे प्रास्ताविक अश्विनी भोईर यांनी केले.

•

## माधवी नानल लिखित 'स्वातंत्र्यसंग्राम संगीतकारांचा' या पुस्तकाचे प्रकाशन

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्रचळवळीचा विविधांगांनी अभ्यास केला जात आहे व त्याचे विविध पैलू उलगडले जात आहेत. याच विचारातून माधवी नानल यांनी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात संगीतक्षेत्रातील विविध व्यक्तींच्या सहभागाविषयी संशोधन केले. या संशोधनातून त्यांनी 'स्वातंत्र्यसंग्राम संगीतकारांचा' हे पुस्तक लिहिले आहे. ग्रंथाली प्रकाशित या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ मंगळवार, १२ सप्टेंबर २०२३ रोजी मंत्रालयात महाराष्ट्राचे सांस्कृतिक, वन आणि मत्स्यखात्याचे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते झाला.

यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी माधवी नानल यांचे अभिनंदन केले व ग्रंथालीच्या साहित्यक्षेत्रातील कामगिरीचे कौतुक करून ग्रंथालीच्या पुढील उपक्रमांस शुभेच्छा दिल्या.

माधवी नानल यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले, की संगीताची ओळख आपल्याला भक्तिमार्ग व मनोरंजनाची असली तरी स्वातंत्र्यलढ्यामध्ये जनजागृतीसाठी त्याचा उपयोग अतिशय उत्तमपणे करण्यात आला. रवींद्रनाथ टागोरांपासून मा. दीनानाथांपर्यंत अनेक ज्ञात तसेच अपरिचित कलाकारांच्या कामगिरीचा इतिहास या पुस्तकामध्ये मांडण्यात आला आहे.

•

## कुर्ला येथील भाटिया हायस्कूलमध्ये 'विज्ञानगप्पा'

निसर्गात व मानवी जीवनात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीत विज्ञान आहे. सकाळ-दुपार-रात्र, पौर्णिमा-अमावास्या यासारख्या नैसर्गिक घटनांपासून आपल्या स्वयंपाकघरातील खाद्यपदार्थांच्या कृतीपर्यंत विविध बाबींमधील विज्ञानाची तत्त्वे समजून घेतली पाहिजेत. त्यासाठी न लाजता प्रश्न विचारणे व त्यांच्या योग्य उत्तरासाठी पाठपुरावा करणे हे आवश्यक असते. प्रत्येक विद्यार्थ्याने हे केल्यास भारतातून नोबेल पारितोषिक मिळवणारे शास्त्रज्ञ नक्की तयार होतील. याच उद्देशाने ग्रंथाली-प्रतिभांगणद्वारा सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सुधीर थत्ते व विज्ञान लेखिका नंदिनी थत्ते यांचा शालेय विद्यार्थ्यांबरोबर संवाद-शंकासमाधानाचा उपक्रम 'विज्ञानगप्पा' आयोजित केला जातो.

गुरुवार, १४ सप्टेंबर २०२३ रोजी आय.एच. भाटिया हायस्कूल, कुर्ला (प) येथे या उपक्रमातील सातवा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी, पृथ्वी गोल का असते? सूर्याचा रंग पिवळा का असतो? शास्त्रज्ञांना डॉक्टर का म्हटले जाते? लाकडी बाक व पुस्तक अशा वेगवेगळ्या पृष्ठभागावर आघात केला असता वेगवेगळा आवाज का येतो? रशियन यानाच्या तुलनेत भारतीय चांद्रयान-३ ला जास्त वेळ का लागला? असे अनेक विषयांशी संबंधित विविध प्रश्न मुलांनी विचारले. त्यांची उत्तरे देताना सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते यांनी मुलांना अतिशय खेळीमेळीने विज्ञानाची तत्त्वे समजावून सांगितली.

यावेळी मुले किती वेगळा विचार करू शकतात हे लक्षात आले. एका विद्यार्थिनीने प्रश्न विचारला, की समुद्रात पाण्याच्या खालीही जमीनच असते असे असताना आपण पृथ्वीवर फक्त २९ टक्के जमीन आहे असे म्हणणे योग्य आहे का? त्याचप्रमाणे मुलांच्या खोडकरपणातूनही विज्ञान समजावून सांगता येते हे थत्ते यांनी दाखवून दिले. सुरुवातीस त्यांच्या स्वागताखातर टाळ्या वाजवल्या तेव्हा मागे बसलेल्या एकदोघा मुलांनी शिट्याही वाजवल्या. त्या विद्यार्थ्यांना न ओरडता थत्ते यांनी शिट्टी वाजवताना दोन बोटे का वापरावी लागतात यातील विज्ञानतत्त्व समजावून दिले.

यावेळी ग्रंथालीद्वारा भाटिया हायस्कूलच्या वाचनालयासाठी विज्ञानविषयीची पुस्तके भेट देण्यात आली.

•

---

## एस. के. पंतवालावलकर विद्यालयात 'विज्ञानधारा' कार्यक्रमाचे आयोजन

वाढते जागतिक तपमान आणि वाढत असलेल्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचा गोंधळ या आपल्यासमोरील गंभीर समस्या आहेत. आपण निर्माण केलेल्या या समस्यांवर आपणच मार्ग काढला पाहिजे आणि शालेय विद्यार्थ्यांवर याविषयीचे संस्कार करून येणाऱ्या काळात हे प्रश्न कसे कमी होतील हे पाहिले पाहिजे. ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित 'विज्ञानधारा' या उपक्रमात ज्येष्ठ शास्त्रज्ञ शरद काळे शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधून, त्यांच्या शंकांना सोप्या भाषेत उत्तरे देऊन विज्ञानजागृतीचे कार्य करत आहेत.

शनिवार, १६ सप्टेंबर २०२३ रोजी कुर्ला पूर्व येथील एस.के. पंतवालावलकर हायस्कूलमध्ये 'विज्ञानधारा' उपक्रमातील १८वा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

फुगा, वीस रुपयांची नोट अशा सहज उपलब्ध असलेल्या वस्तूंमधून शरद काळे यांनी मुलांमधील विज्ञानवृत्ती जागृत करण्याचा प्रयत्न केला. माझे बोलणे संपले की माझे व्याख्यान सुरू होते, म्हणजेच त्या व्याख्यानातील सांगितलेल्या विषयांबद्दल श्रोते असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात विचार सुरू झाले की मगच माझे व्याख्यान सुरू झाले असे मी मानतो, असे म्हणत शरद काळे यांनी विद्यार्थ्यांच्या मनातील कुतूहलाला साद घातली. त्याचप्रमाणे पानात अन्न न टाकणे, ओल्या व कोरड्या कचऱ्याचे व्यवस्थापन करणे या गोष्टींचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनी क्वांटम थिअरी, ब्लॅकहोल कशापासून तयार होते, परग्रहावर सजीवांचे अस्तित्व, पृथ्वीची निर्मिती, प्रकाश सरळ रेषेत प्रवास का करतो, असे विविध प्रश्न विचारले.

अतिशय रंगलेल्या या कार्यक्रमाअखेर 'ग्रंथाली'तर्फे विज्ञानविषयक पुस्तके व 'विज्ञानधारा' मासिकाचे अंक शाळेच्या वाचनालयासाठी भेट म्हणून देण्यात आले.

•

## कुसुमाग्रजांचे अप्रकाशित साहित्य पुस्तकरूपात

हल्लीचं युग हे डिजिटल युग बनलं आहे, आता बऱ्याच सोयीसुविधा एका क्लिकवर चुटकी सरशी उपलब्ध असतात, हे एका अर्थानं चांगलंच आहे. आपला देश, समाज प्रगती करतोय. पण या डिजिटल युगात पुस्तक हातात घेऊन त्याची पानं हाताळणं, चाळणं ही भावना क्वचित काही जणच अनुभवत असतील. आपल्याकडे मराठी साहित्याचं भांडार आहे, प्रत्येक शैलीची अनेक पुस्तकं आहेत, पण सध्या मराठी वाचनसंस्कृती कुठेतरी हरवतंय असं दिसून येतंय आणि हे न हरवता जपलं गेलं पाहिजे याच उद्देशानं 'रावण पब्लिशिंग हाऊस'ची निर्मिती झाली. तसंच नवीन लेखकांसाठी 'रावण पब्लिशिंग हाऊस' हा मंच तयार करण्यात आला आहे.

प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक अभिजित पानसे यांच्या 'रावण पब्लिशिंग हाऊस'च्या वतीनं 'कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर' यांचं कथा, ललित लेख, कविता, अनुवाद आदी असंग्रहित साहित्य पुस्तकरूपानं प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झालेलं आहे.

'क' आणि 'ख' अशा या दोन पुस्तकांचं प्रकाशन 'मनसे'चे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते ठाणे इथे २४ सप्टेंबर रोजी झालं. यावेळी 'रावण पब्लिशिंग हाऊस'चे अभिजित पानसे, या पुस्तकांचं संकलन ज्यांनी केलं ते डॉ. नागेश कांबळे, ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, सुदेश हिंगलासपूरकर, महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाचे बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई आदी मान्यवर मंडळींची व्यासपीठावर उपस्थिती होती. जितेंद्र जोशी, स्पृहा जोशी, अवधूत गुप्ते, कौशल इनामदार, पुष्कर श्रोत्री यांनी कविता-कथांचे अभिवाचन केलं.

वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रजांची २२ काव्यसंग्रह, २२ नाटकं, ९ कथासंग्रह, ६ एकांकिका संग्रह, ६ लघुनिबंधसंग्रह, ३ कादंबऱ्या, २ निबंधसंग्रह, १ आठवणी संग्रह अशी एकूण ७१ पुस्तकं प्रसिद्ध आहेत. त्यांनी नियतकालिकांतदेखील विपुल साहित्य लिहिलं होतं, परंतु अजूनही ते पुस्तक स्वरूपात येऊ शकलं नव्हतं. कुसुमाग्रजांचं लिखाण ज्यांना समजलं, उमजलं त्या सर्व रसिकांची हीच इच्छा होती, की कुसुमाग्रजांच्या आजवर कधीही वाचनात न आलेल्या साहित्य वाचायला मिळावं. या रसिकांमध्ये अशा दोन व्यक्ती आहेत ज्यांनी ही इच्छा सत्यात उतरवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या दोन व्यक्ती म्हणजे शासकीय विभागीय ग्रंथालयाचे निवृत्त ग्रंथपाल डॉ. नागेश कांबळे आणि दिग्दर्शक अभिजित पानसे. डॉ. कांबळे यांनी निवृत्तीनंतर कुसुमाग्रजांच्या साहित्यावर पीएचडी केली आणि त्यासाठी राज्यभर भ्रमंती करून त्यांचं असंग्रहित साहित्य शोधून काढलं, हे साहित्य पुस्तकरूपात येण्यासाठी बरेच प्रयत्न केले, पण त्याला हवं तसं यश मिळालं नाही. यासंदर्भात त्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून गेल्या वर्षी सलग तीन दिवस बातम्या प्रसिद्ध केल्या आणि त्या बातम्या अभिजित पानसेंच्या वाचनात आल्या. त्वरित त्यांनी डॉ. कांबळे यांची भेट घेऊन शब्द दिला, की कुसुमाग्रजांचं हे साहित्य पुस्तकरूपात येईल. अखेर तो दिवस आला आणि अतिशय सुंदर पद्धतीनं कुसुमाग्रजांच्या असंग्रहित साहित्याचा प्रकाशन-सोहळा थाटामाटात पार पडला.

अभिनेत्री समीरा गुजर यांच्या निवेदनामुळे अतिशय सुंदर पद्धतीनं रंगला.

•


॥ग्रंथाली॥

## रमेश कुलकर्णी यांची चार पुस्तके प्रकाशित




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १३० रुपये**



**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

## 'सफरनामा : निवडक कलाकारांचा'

भारतीय आणि परदेशी चित्रकारांच्या 'सफरनामा : निवडक कलाकारांचा' या पुस्तकात समृद्ध कलेचे अभ्यासपूर्ण विवेचन असल्याचे प्रतिपादन कलाअभ्यासक डॉ. मनीषा पाटील यांनी केले. विदर्भ साहित्य संघ आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने, चित्रकार आणि कलाअभ्यासक पल्लवी पंडित यांच्या 'सफरनामा : निवडक कलाकारांचा' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात पार पडला त्यावेळी त्या बोलत होत्या. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. चित्रकार आणि कलाअभ्यासक डॉ. मनीषा पाटील, चित्रकार प्रा. विकास जोशी आणि कलाअभ्यासक प्रा. चंद्रकांत चन्ने यांनी यावेळी पुस्तकावर भाष्य केले.

डॉ. मनीषा पाटील पुढे म्हणाल्या, की भारतीय आणि परदेशी चित्रकारांवर या पुस्तकात भाष्य आहे. जर्मनीच्या कॅथे कोलविट्स यांच्या चित्रात प्रथम महायुद्धाच्या पार्श्वभूमी जीवनाचे दर्शन घडते, स्थानिक सामाजिक-आर्थिक उतार-चढाव यांचे संवेदनशील दर्शन होते. हे सर्व अभ्यासपूर्ण पद्धतीने लेखिकेने मांडले आहे. याशिवाय रवींद्रनाथ टागोर, जामिनी राय, अमृता शेरगिल, फ्रीडा काहलो यांचे जीवन आणि कलाक्षेत्रातील योगदान उत्तम साकारले आहे.

सुरुवातीला पल्लवी पंडित यांनी आपले मनोगत व्यक्त केले. चित्रकार प्रा. विकास जोशी यांनी पल्लवी पंडित यांच्या महाविद्यालयीन काळातील कवितेच्या आवडीचा अनुभव सांगितला. कलाअभ्यसाक प्रा. चंद्रकांत चन्ने यांनीदेखील यावेळी पुस्तकावर सविस्तर भाष्य केले. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते यांनी समारोपीय भाषणात लेखिकेला शुभेच्छा देऊन, मराठी साहित्यात गुणवत्तायुक्त भर घातल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. प्रकाश एदलाबादकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

•

## 'दिवेलागणीच्या वेळी'
## कवितासंग्रहाचे प्रकाश

'दिवेलागणीच्या वेळी' या ग्रंथाली प्रकाशित आणि जगदीश आचरेकर लिखित काव्यसंग्रहाचा प्रकाशनसोहळा, एमआयजी क्लब, बांद्रा येथे नुकताच झाला.



प्रकाशनसमयी – विजय पाटील, कवी जगदीश आचरेकर आणि अरुण नलावडे

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मराठीतील सुप्रसिद्ध दिग्दर्शक आणि अभिनेते अरुण नलावडे, डी.वाय. पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष विजय पाटील आणि ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते.

'दिवेलागणीच्या वेळी' या कवितासंग्रहाच्या प्रकाशनाच्या सोहळ्यात बोलताना विजय पाटील यांनी, घरी आईमुळे झालेल्या मराठी भाषेच्या संस्काराचा आवर्जून उल्लेख केला. लहान असताना अशाच कविता आणि कथांनी त्यांचं बालपण कसं बहरलं याविषयी ते व्यक्त झाले. अरुण नलावडे यांनी कवितासंग्रहाचं प्रकाशन माझ्या हातून होत आहे हा खूप मोठा आनंद आहे असं सांगितलं. तसंच, त्यांनी कवितांमुळे मराठी साहित्य कसं प्रगल्भ होत आलं आहे याविषयी सांगितलं. कवी जगदीश आचरेकर यांनी मनोगत मांडताना सर्व स्नेह्यांविषयी आत्मीयता व्यक्त केली. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन ग्रंथाली विश्वस्त डॉ. लतिका भानुशाली यांनी केलं.


•

# ग्रंथपरिचय



**डॉ. निर्मोही फडके**
९९२०१ ४६७११

**इजिप्सी**
**रवि वाळेकर**



''धाडधाड करत विमान कैरोच्या विमानतळावर उतरले तेव्हा विमानाचे 'शाकाप' तुटले की काय असाच संशय आला!... पुढचा अर्धा तास, दोन-तीन टॅक्सीवाल्यांशी 'अरेबिक-मराठी-इंग्रजी-हिंदी-उर्दू-फारसी' अशा अगम्य मिश्रभाषेत संभाषण केल्यावर मला एवढेच कळले, की हे 'तेहरीर स्क्वेअर' नामक स्थान अत्यंत दूर आहे, शक्यतो कोणी तिकडे जात नाही, त्यातच तो 'लै बेक्कार ट्रॅफिकवाला' एरिया आहे. वेगवेगळ्या रागांमध्ये एवढी एकच माहिती सांगून शेवटी सगळे टॅक्सीवाले समेवर यायचे, 'थ्री हंड्रेड पौंड!'

'यू टॅक्सी वॉंट?' 'येस! आय टॅक्सी वॉंट.' व्याकरण गेले खड्ड्यात. भावनाओं को समझो!

'धीस मेन वेरी बॅड' माझ्या सभोवती उभ्या असलेल्या चार-पाच टॅक्सीवाल्यांकडे बोट दाखवत ती बिनधास्त म्हणाली. ही मागच्या जन्मी कोल्हापुरात जन्माला आलेली असावी. असले काही कोणाच्या तोंडावर बोलायला बेक्कारच धाडस हवे.''

पूर्वी 'बालभारती'च्या पुस्तकात एक कविता होती, 'या बालांनो या रे या...' त्या कवितेसोबत एक चित्र होतं, एक जादूगार आणि त्याच्यामागून त्या 'दुसऱ्या दुनियेत'त संमोहित होऊन जाणारी बच्चेकंपनी. इजिप्तला न गेलेल्यांकरता इजिप्त म्हणजे अशीच एक गूढ, जादूभरली दुसरी दुनिया आहे. अशा वाचकांकरता लेखक रवि वाळेकर ह्यांचं 'इजिप्सी' हे पुस्तक म्हणजे त्या दुसऱ्या दुनियेची एक सुंदर, अविस्मरणीय ट्रिप आणि ट्रिट आहे. इजिप्त नामक त्या मंतरलेल्या देशाच्या ट्रिपला आपल्याबरोबर एक अतिशय मिश्कील, हजरजबाबी, काहीसा गोड वात्रटपणा करणारा, पण मनानं निर्मळ असा 'गाईड' आहे. शब्दांच्या अतिशय साध्या, पण अचूक कोट्या करत, हसवत स्वतःबरोबर आपल्याला तो इजिप्तसफरीवर घेऊन निघतो.

एका वेगळ्या देशातला प्रवास, त्या प्रवासाची आधी फसलेली योजना, नैराश्य, त्यामुळे करावी लागलेली धावपळ, नंतर त्यात यशस्वी होणं, प्रवासाची तयारी, प्रवासाला निघणं इत्यादी बाबी मराठी भाषेतल्या प्रवासवर्णनपर लेखनात नव्या नाहीत. 'इजिप्सी'चा प्रारंभही असाच होतो. अर्थात हे वास्तव दर्शवणारं प्रवासवर्णन असल्यानं, जसा प्रवास होत गेला, जे जसं घडलं, तसं आपल्यासमोर येतं. अनेक प्रसंग वाचताना आपण कधी आपल्या मनाशीच, कधी खुदुखुदु, तर कधी कधी खो खो हसतो.

ह्याचा अर्थ हे केवळ विनोदनिर्मिती करणारं, वरवरचं प्रवासवर्णन आहे, असं नाही. इजिप्तचा प्रवास कसा झाला, ह्याबद्दल केवळ माहिती न सांगता, लेखक आपल्याला त्या अद्भुतरम्य स्थळांची, तिथल्या वातावरणाची अनुभूती देतात. तिथे न जाऊ शकणारीही असंख्य माणसं असू शकतात, अशा मित्रांनाही शब्दांच्या माध्यमातून ती सफर घडवून आणायची आहे, ही साधीसरळ इच्छा पुस्तकभर विखुरलेली आहे.

अवाढव्य इजिप्तचा इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र, भाषा, प्राचीन संस्कृती,

पिरॅमिड, ममी, स्फिंक्स, निसर्ग, वर्तमान जीवनशैली, मनुष्यस्वभाव, राजकारण, पर्यटन-व्यवसाय, अर्थशास्त्र, फसवाफसवी अशा अनेकांगी वळणावळणांवरून आपल्याला हा प्रवास घडतो. मानवाच्या इतिहासातला एक अतिशय अभिमानास्पद सुवर्णकाळ, त्याचे आजपर्यंत जपून ठेवले गेलेले अवशेष, त्याविषयी अधिकृत माहिती इत्यादीबद्दल गांभीर्यानं केलेलं अभ्यासपूर्ण विवेचन आपल्यासमोर उलगडत जातं. आवश्यक तिथे 'चुरचुरीत' वाक्यरचना किंवा खुसखुशीत संवाद, तरल आणि लालित्यपूर्ण वर्णन, त्याचप्रमाणे वास्तवाचे कोन असलेलं आत्मचिंतन अशा विविधांगांनी हे लेखन आपल्यापुढे येतं. उदाहरणार्थ,

'समोर तिन्ही पिरॅमिड दिसत होते. समोर जे दिसत होते, ते जगावेगळे, अलौकिक आणि अद्भुत होते.... आता समोर फक्त ग्रेट पिरॅमिड होता. त्याचे वर वर जाणारे टोक. पायथ्याचे ते प्रचंड आकाराचे सुबक कापलेले दगड जवळजवळ येऊ लागले. जगातील कोणत्याही स्थापत्याशी भव्यतेच्या मापदंडात तुलनाच होऊ शकत नाही, असे भव्य स्थापत्य! अवाक् होऊन ती भव्यता शोषत होतो.' किंवा, 'इथे ही डॉक्टरी शिकलेली पोरगी काळ्या बुरख्यात वावरत होती. थोडा खिन्न झालो.'

अतिशय आकर्षक आणि तळटिपा असलेली छायाचित्रं आपल्याला इजिप्तच्या मोहात पाडतात. लेखिका दीपा देशमुख ह्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेमुळे 'इजिप्सी'ची तोंडओळख होण्यास मदत होते. पुस्तकाचं सुंदर मुखपृष्ठ, मांडणी, कलानिर्देशन इत्यादी गोष्टींमुळे त्याला एक उत्तम, कलात्मक मूल्य प्राप्त झालं आहे. आपल्या मनोगताच्या प्रारंभीच इजिप्तला कोणी जावं, ह्याबद्दल लेखकांनी काही निकष सांगितले आहेत. त्यातल्या शेवटच्या निकषाच्या धर्तीवर हे पुस्तक कोणी वाचावं, ह्याबद्दल असं म्हणावंसं वाटतं, की 'खरे तर, ज्यांना शक्य होईल, अशा प्रत्येकानंच 'इजिप्सी' वाचावं. अगदी अमिताभ बच्चन ह्यांनीही.' (आता ही बच्चनसाहेबांची गोष्ट आपण 'इजिप्सी'मध्येच वाचावी.)

तेव्हा 'इ' तंत्राचे 'जिप्सी' झालेल्यांनी, ते सगळं सोडून 'इजिप्सी' वाचावं आणि नंतर स्वतःही रवि वाळेकरांसारखंच 'जिप्सी' होऊन इजिप्तला जावं.

**इजिप्सी - रवि वाळेकर**
मनोविकास प्रकाशन
मूल्य - ७५० रुपये

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**एकटेदुकटे शेर**
**चंद्रशेखर सानेकर**




**एकट्यादुकट्याची सोबत करणारे शेर**

*'तो माझा आरसा फोडतो हे नाही भय माझे*
*मीच सतत माझ्या चेहऱ्यावर शंका घेतो आहे*
*त्याच्या नजरेला झालेला लकवा जपण्यासाठी*
*मीच सतत माझ्या चेहऱ्यावर शंका घेतो आहे.'*

गझल म्हटली की गालिबचे नाव ओठावर यायचे. मराठीमध्ये अशाच प्रकारे हमखास ओठावर नाव येणारे सुरेश भट यांचे होते. परंतु अलीकडचा एकूण काळ पाहिला तर त्यात मोजकेच परंतु दमदारपणे गझलेवर आपली हुकूमत सिद्ध करणारे कवी/गझलकार आपल्याला दिसून येतात, त्यापैकी एक नाव आहे चंद्रशेखर सानेकर!

आपली गझल आणि आपण एकच आहोत इतका एकात्म भाव सानेकर आणि त्यांच्या गझलेतून आपणास दिसून येतो. खरे तर गझलेमध्ये प्रेमाचे वैफल्य, मृत्यू, निराशा, असे दुःखात्मक आणि त्यावर मात करायची झाल्यास काही सुखात्मक शेर वाचनात येत. परंतु सानेकर यांची गझल वाचताना अशा ठरावीक चाकोरीच्या वाटेवरून आपण जात आहोत असे भास होत नाहीत. त्यांची गझल अनेक पातळ्यांवरून प्रवास करताना दिसून येते. किंबहुना असे म्हणता येईल, की गझलेसाठी त्यांना चंद्र, तारे, सूर्य, काजवे, रात्र, अंधार, उजेड, एकांत, यासारख्या अलंकारांची सजावटीसाठी आवश्यकता भासत नाही. ते थेट आपल्या मनाची भाषा व्यक्त करत आहेत, असेच जाणवत राहते. याचे कारण असे, की निरंतर गझललेखन आणि तोच सातत्याने केलेला चिंतनाचा भाग. त्यामुळे त्यांची गझल आपली गझल वाटते. हा सगळा अनुभव त्यांच्या आतापर्यंतच्या प्रकाशित झालेल्या गझलसंग्रहांवरून खरा ठरलेला आहे.

'एकटेदुकटे शेर' हा संग्रह मात्र काहीसा वेगळेपण स्पष्ट करतो. असे अनेकदा होते की एखादा भाव, एखाद्या विचार, एखादी कल्पना, संवेदना, कवीला उत्स्फूर्त सूचते, व्यक्त होते आणि ती तिथेच जखडून ठेवते. किंवा असेही घडते की पुढे आणखी त्या धाग्यात गुंफले जाणारे शेर खंडित होतात. त्यामुळे एक सलग असा गझलचा (पाच शेरांचा) आकृतिबंध साध्य होतोच असे नाही. पण जो साकार झालेला शेर आहे तो संपूर्ण गझलेचा आकृतिबंध आपल्यासमोर उभा करण्याचे सामर्थ्य दाखवतो. सानेकर यांना असेच त्या त्या वेळेस सुचलेले, लिहिलेले शेर जे स्वतंत्र स्वरूपात राहिले आणि ते एकटेदुकटे म्हणून तसेच बाजूला राहिले. (संपूर्ण गझलेतून निवडलेले शेर नव्हेत.) असा हा कालखंड जानेवारी २०११ ते डिसेंबर २०२२ असा आहे. अशा एकट्यादुकट्या शेरांचा एक स्वतंत्र संग्रह असावा असे हे कदाचित पहिलेच पुस्तक (संग्रह) असावे. हे शेर स्वायत्त, स्वतंत्र आणि सार्वभौम असून, त्यांचा सौंदर्यअनुभव, काव्यमूल्य व काव्यपिंड याच्याशी ते फटकून वागताना दिसत नाहीत, तर संपूर्ण गझलेचा आशय आपल्यासमोर उभा करतात. याविषयी चंद्रशेखर सानेकर असे म्हणतात की, 'किमान पाच चांगले शेर हाती लागून गझल बांधली जाणं हे जितकं नैसर्गिक आहे तितकंच केवळ एक किंवा दोन शेर कधीकधी तर तीन किंवा चारसुद्धा हाती लागणं हे तसंच नैसर्गिक आहे. शेर गझलेतून वाचनात येतो किंवा ऐकला जातो तसाच तो गझलेशिवायही वाचला किंवा ऐकला जाऊन आस्वाद्य होऊ शकतो. उलट अशावेळी अशा शेरांचा अधिक कस लागत असतो. गझलकार कवीनं याही कसाला सामोरं जायला हवं. शेर म्हणजे फक्त दोन ओळींच्या अवकाशातली कविताच, मग तिनं कुठे का असेना तिच्या काव्यशयात कुठेच उणं पडता कामा नये.'

चंद्रशेखर सानेकर यांचे एकटेदुकटे शेर वाचत असताना त्यात शब्दांचा सखोलपणा, विरोधाभास, चपखलपणा, भाषेचे वैभव आपले लक्ष वेधून घेतो. माणसांचे वागणे-जगणे, यातील अंतर्विरोध, मानभावीपणा आणि न दुखावता करणारे स्तुतीचे गोडवे, कवीची अस्वस्थता, समाजात असलेले विविध स्तर, आपण स्वतःभोवती स्थिर राहून पाहिले तरी अनेक कवडसे आपल्याला आपल्याच रूपाचे दिसून येतात. त्यांचे प्रतिबिंब त्यांच्या या शेरांमधून दिसून येते. आपले म्हणणे अवघ्या दोन ओळींत व्यक्त करता येऊ शकते, ही ताकद या शेरांमध्ये आहे.

सानेकर यांनी अनेक प्रयोगदेखील करून पाहिलेले आहेत. म्हणजे एकच शेर दोन वेळेस वेगवेगळ्या टप्प्यांवर व्यक्त कसा करता येऊ शकतो, त्यांचा अनुभव येथे सांगण्यासारखा आहे. काही शब्द पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या भूमिकांमधून आपल्यासमोर येतात, जसे की, दुनिया, मौन, नदी, समुद्र, तुझी नजर. प्रत्येक वेळी त्या प्रत्येकाचा भाव वेगळा आहे. गालिब, व्हिंची यांचे संदर्भ या शेरांमधून आलेले आहेत. एक जागरूक, संवेदनशील, भावनाप्रधान कवी, थोडासा बंडखोरपणे व्यक्त होऊ पाहत असेल तर त्याचा आकृतिबंध कसा असेल, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे एकटेदुकटे शेर हे होय.

सानेकरांचे आतापर्यंत सहा गझलसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. 'गझलचिंतन' हा केवळ त्यांचा स्वतःचा चिंतनाचा भाग नाही तर एकूणच कवी-गझलकार यांच्यासाठी मार्गदर्शक ठरावा.

चुलीत जे आहेत निखारे तेच आता करतात दगा
एक विझत नाही तर दुसरा आग लावतो वस्तीला

एकांताच्या मंदिरामध्ये फक्त मौन बोलत होते
दोन शरीरे अशी गुंफली जणू टाळ वाजत होते

या संग्रहाचे मुखपृष्ठ सुप्रसिद्ध अनुवादकार उमा कुलकर्णी यांचे आहे, तर त्याचे रेखाटन आणि शीर्षक इशा सानेकर यांचे आहे.

**मूल्य २५० रुपये    सवलतीत १५० रुपये**

## ग्रंथपान

**स्वातंत्र्यसंग्राम संगीतकारांचा**
**माधवी नानल**




**सांगीतिक संग्रामाचा एक अध्याय**

'वंदे मातरमचे जाहीर सभेतले अधिकृत गायन करण्याचा मान रवींद्रनाथ ठाकूर यांच्याकडेच जातो. २८ डिसेंबर १८९६ रोजी कोलकात्याच्या बिडन स्क्वेअर येथे राष्ट्रीय सभेचे बारावे अधिवेशन श्री महंमद रहमतुल्ला सयानी यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या सभेत शुभ्र वस्त्रे परिधान करून रवींद्रनाथ यांनी ज्योतिरिंद्रनाथ यांच्या ऑर्गनच्या साथीत म्हटले होते. रवींद्रनाथ यांचा सुंदर, सुरेल, पहाडी आवाज आणि शब्दांचे भान ठेवत केलेली संगीतरचना, यामुळे वातावरण एकदम बदलून गेले, चैतन्यमय झाले. त्यानंतर विशेष म्हणजे इसवी सन १९०५मध्ये याचे पहिले ध्वनिमुद्रण झाले.'

'स्वातंत्र्यसंग्राम संगीतकारांचा' हे शीर्षक वाचल्यानंतर आपोआपच कुतूहल जागृत होते. संगीतकारांचा स्वातंत्र्यसंग्रामाशी असलेला संबंध कसा आणि किती, हा प्रश्नदेखील त्यातूनच आपल्यासमोर अनाहूतपणे उभा राहतो. परंतु पुस्तक पूर्ण वाचून झाल्यानंतर आपल्या लक्षात येते की स्वातंत्र्यासाठी ज्यांनी ज्यांनी संग्राम केला, संघर्ष केला त्यात संगीतकारांनी संगीताचा आत्मा हरवू न देता बजावलेली भूमिकादेखील इतिहासाने नोंद घ्यावी अशीच होती. संगीतकारांनी देशासाठी लढवय्ये होऊन क्रांतिकारी विचारांनी काम कसे केले, त्यांचे परिणाम काय झाले, किती कष्ट पडले, इंग्रज राजकारण्यांचा विरोध कसा पचवला, त्यांच्या या योगदानाची योग्य ती दखल घेऊन केलेला अभ्यास म्हणजे हे पुस्तक होय.

देशभरात अनेक गायक संगीतकार होऊन गेले. त्यांनी देश कार्यात काही ना काही कारणाने योगदान दिलेले आहेच. त्यातील निवडक गायनाचार्य पं. विष्णू दिगंबर पलुस्कर, पं. नारायण मोरेश्वर खरे, मा. कृष्णाराव फुलंब्रीकर, मा. दिनानाथ मंगेशकर यांच्या एकूण कार्याचा या पुस्तकात मागवा घेण्यात आलेला आहे.

लोकांच्या मनात भारतमातेचे प्रेम जागृत करणे आणि इंग्रजांविरुद्ध द्वेष, चीड, संताप निर्माण करण्याचे काम 'वंदे मातरम्' या सहा अक्षरांनी केलेले आहे. 'वंदे मातरम् आणि त्याचा संपूर्ण सांगीतिक संग्राम' या प्रकरणातून त्यावेळी या संगीतकारांनी दिलेली झुंज किती लक्षणीय होती, याची माहिती आपल्याला होते. तसेच महात्मा गांधी यांच्या आश्रमात होत असलेल्या भजनावली आणि आश्रमावलीचा एकूण डौल यात संगीत, शिस्त आणि नियोजनसाठी पं. नारायण खरे यांनी सर्वस्व झोकून केलेले निर्लेप कार्य किती मोठे होते याचा इतिहास या पुस्तकामुळे आपणास ज्ञात होतो. मा. दीनानाथ यांनी निर्भीडपणे गव्हर्नरसमोर सादर केलेली स्वातंत्र्यवीर सावरकर यांची नाटके आणि पदे आपला अभिमान जागृत करून जातात.

यात १८५७ ते १९०० या कालखंडातील घटनाक्रमाची, गवई, गायिका, नाटककार आणि संगीतकार, यांची सूची देण्यात आलेली आहे. यातून नुसताच कालखंड उभा राहत नाही, केवळ चरित्रात्मक माहिती सादर होत नाही, तर लेखिकेने परिश्रमपूर्वक केलेल्या अभ्यासाचीदेखील ओळख होते.

'स्वातंत्र्यसंग्राम संगीतकारांचा' या पुस्तकाची प्रस्तावना आतील आशयाची ओळख आपल्याला करून देते. स्वातंत्र्यसेनानी आणि तुरुंगवास भोगलेले काशिनाथ पुरुषोत्तम वैशंपायन आणि उषा काशिनाथ वैशंपायन यांचा वारसा लाभलेल्या कन्या माधवी नानल या पुस्तकाच्या लेखिका आहेत. त्या शास्त्रीय संगीत गायिका, आकाशवाणी आणि दूरदर्शनवरील कलाकार; आणि आयसीसीआर आर्टिस्ट- हिंदुस्थानी क्लासिकल वोकलिस्ट, भारत सरकार आहेत. त्यांनी श्रीमती गंगाबाई पलूसकर, डॉ. कमलाकर जोशी, पं. गजानन घारापूरकर, पद्मश्री माने वर्मा, पं. यशवंतबुवा जोशी आणि पं. शंकर अभ्यंकर यांच्याकडे संगीताचे अध्ययन केलेले आहे. संगीत हाच विषय समोर ठेवून त्यांनी केलेले संशोधन कार्यदेखील खूप उच्च दर्जाचे आणि तितकेच प्रसंशनीय आहे. त्यासाठी त्यांना सूरमणी, शिरोमणी, गायनाचार्य विष्णू दिगंबर पलूसकर अवॉर्ड, दर्पण पुरस्कार, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर स्मृती पुरस्कार, यासारखे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक या पुस्तकातील सर्व लेखांची संगीत आणि स्वातंत्र्यसंग्राम असा एक विशिष्ट हेतू समोर ठेवून जुळणी केलेली आहे, आणि त्यात त्या यशस्वी झालेल्या आहेत, असा निर्वाळा हे पुस्तक देते. त्यांच्या लेखनाची स्वतंत्र नोंद घ्यायला हवी अशा वैचारिक आणि शैलीदार वाक्यांची समर्पकता लेखांतून वाचायला मिळते.

'जशी भक्ती करता येते, प्रेम निर्माण करता येते तसे खडतरप्रसंगी मनुष्यामध्ये चेव निर्माण करण्याची क्षमता आहे.'

'गुरूकडून शिष्याकडे नुसती कला संक्रमित होत नसते तर संस्कार संक्रमित होत असतात. हे संक्रमण केवळ दोन व्यक्तींमध्ये नसते तर ती एक गुरुपरंपरा असते.' गायकांच्या एकूण शैली विषयी चिकित्सक दृष्टिकोनदेखील त्या या ग्रंथात नमूद करतात. उदाहरणच द्यायचे झाले तर बालगंधर्व आणि मा. दीननानाथ यांचे देता येईल. 'बालगंधर्वांच्या गायकीने श्रोत्यांचे मनोरंजन केले व मनसोक्त आनंद दिला; पण दीनानाथांच्या आक्रमक गायकीने भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी श्रोत्यांचे मनोबल तयार केले आणि इंग्रजांविषयी चीडही निर्माण केली. इथे संगीताची दोन वेगवेगळ्या अंगांची ताकद बघायला मिळते.'


'स्वातंत्र्यसंग्राम संगीतकारांचा' या पुस्तकाचे मुखपृष्ठ 'तंबोऱ्या'ने समजलेले असून त्यावर तिरंगा पट्टा आणि आणि सुरेल पक्ष्याची योजना केलेली आहे. तसेच, आत संबंधित गायकांची रेखाचित्रे साकारलेली आहेत. ही आशयसंपन्न किमया प्रसिद्ध चित्रकार सतीश भावसार यांची आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

## ग्रंथपान

### शतकांत एकच सचिन

**द्वारकानाथ संझगिरी**




**क्रिकेटच्या देवाची आरती**

'जेवायला जाताना सचिन मला गाडीत सांगत होता, हा मुलगा तरी खूप बरा आहे. मी याच्याहून आणखी अत्यंत वाईट परिस्थितीतील मुलं पाहिली आहेत. माझ्या घरी त्यांना आणतो. त्यांच्याशी खेळतो. अशा हॉस्पिटलना भेट देतो, जिथे त्या मुलांचं आयुष्य फक्त दहा-बारा दिवसांत संपणार असतं. त्यांची शेवटची इच्छा असते मला भेटण्याची. त्यांचे, त्यांच्या आई-वडिलांचे चेहरे पाहून कुठेतरी मन गलबलतं.

'प्रॉडिजी' ते 'क्रिकेटचा देव' ही सचिनची ओळख आहे. प्रॉडिजी म्हणजे विलक्षण प्रतिभासंपन्न बालक! त्याच्या गुणवत्तेचं रूपांतर पुढे भरभक्कम अशा यशात झालं म्हणून तो एक यशस्वी प्रॉडिजी ठरला, क्रिकेटचा देव ठरला. सचिन सगळ्यांच्या नजरेत भरला तो कांबळीसह त्याने केलेली ६६४ धावांच्या जगप्रसिद्ध भागीदारीपासून. यात त्याच्या नावावर ३२६ धावा होत्या. सचिनच्या विक्रमांचा पाया रचला गेला तो इथून. शतकांचे शतक करणारा हा आज तरी एकमेव क्रिकेटपटू आहे. त्याच्या नावावरील विक्रमांची नोंद प्रत्येकाला पाठ आहे, परंतु अशा विक्रमांसाठी तो खेळला असे नाही, त्याच्या खेळातून हे विक्रम आपोआप उदयास आलेले आहेत.

सचिनने परिस्थितीला अनुसरून आपल्या फॉरमॅटमध्ये बदल केलेले आहेत. तो आक्रमक फलंदाज आहे की तळ ठोकणारा फलंदाज आहे यापेक्षा संघाला जिंकून देण्यासाठी त्या त्यावेळेस त्याने फलंदाजी केलेली आहे. त्यासाठी कधी तो आक्रमक खेळला तर कधी कधी विकेटवर पाय ठेवून उभा राहिलेला आहे. याचे एकमेव कारण असे की तो अभ्यासू खेळाडू आहे आणि त्याची स्मरणशक्ती अफाट आहे. आपल्या खेळात आपण कुठे, केव्हा, कसे खेळलो आणि कसे बाद झालो याचे विश्लेषण तो स्वतः करतो. त्याचप्रमाणे आपल्याभोवती लावलेली फील्डिंग, बॉलिंग टाकणारा बॉलर यांचा अंदाज, त्याच्या बॉलिंगचे विश्लेषण, हे सर्व अभ्यासूनच खेळत असल्यामुळे सचिन महानतेच्या शिखरावर पोहोचू शकला.

सचिनला अष्टपैलू खेळाडू म्हटले जाते याचे कारण त्याच्याकडे असलेली गुणवत्ता. तो फलंदाज म्हणून जितका यशस्वी ठरलेला आहे तितकाच तो गोलंदाज म्हणूनदेखील यशस्वी ठरलेला आहे. हा दुर्दैवाचा भाग की त्याच्या गोलंदाजीकडे फारसे लक्ष गेलेले नाही किंवा त्याचा बोलबाला झालेला नाही. परंतु अवघड क्षणी त्याच्याच हाती बॉल देऊन मॅच जिंकून देण्याचे श्रेय सचिनकडेच आहे, हे निर्विवादपणे मान्य करावे लागते. सचिन काही काळ संघाचा कॅप्टन होता. कॅप्टन असणारा खेळाडू त्याचा नैसर्गिक खेळावर या कॅप्टनशिपचे दडपण येते का असा प्रश्न सचिनच्या बाबतीत निर्माण झाला. त्याच्या काळामध्ये अनेक सामने जिंकले गेले तरी एक यशस्वी कॅप्टन म्हणून त्याचा बोलबाला झाला नाही, हेदेखील एक सत्य आहेच.

सचिन हा खेळाडू म्हणून किती महान आहे हे सर्व ज्ञात आहेच, परंतु अशा महान खेळाडूबाबत लेखन करायचे म्हणजे ते त्याच दर्जाचे आणि त्याला न्याय देणारे असायला हवे हे भान ठेवून द्वारकानाथ संझगिरी यांनी या पुस्तकाचे लेखन केलेले आहे. सचिनचा कालखंड त्यांनी दोन विभागांत विभागलेला आहे. पहिल्यात त्याने तीस कसोटी शतके आणि ३६ एकदिवसीय शतके ठोकली. तर दुसऱ्या भागात २१ कसोटी आणि १३ एकदिवसीय शतके केलेली आहे. याच दरम्यान त्याने २०० कसोटी आणि ४६३ एकदिवसीय सामने खेळलेले आहेत. या सर्व सामन्यांमध्ये सचिनची झालेली कामगिरी बरी आणि वाईट लेखकाने अतिशय चिकित्सकपणे नोंदवलेली आहे. केवळ आकडेवारी सांगून सचिनचे महानपण सिद्ध करण्याचे अट्टहासात्मक लेखन केलेले नाही, तर प्रत्येक खेळाचे विश्लेषण, त्या त्या वेळी खेळणाऱ्या खेळाडूंचे अभिप्राय, तज्ज्ञांची मते यांचे संदर्भ जोडीला दिलेले आहेत.

सचिन खेळायला लागल्यापासून त्याच्या निवृत्तीपर्यंतच्या एकूण कारकिर्दीचा साक्षेपाने घेतलेला आढावा म्हणजे हे पुस्तक. कालखंडात ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, श्रीलंका आणि इंग्लंड या संघातील असणारे खेळाडूदेखील तितकेच उच्च दर्जाचे आणि प्रतिभाशाली होते. या सगळ्यांच्या खेळांचे विश्लेषणदेखील यात आपणास वाचायला मिळते. हे पुस्तक सचिनवर आहे तसे क्रिकेटच्या एका कालखंडाचा संदर्भ असलेला ज्ञानकोश आहे. यातला विशेष असा की त्या त्या ठिकाणी याची देही याची डोळा एक तज्ज्ञ विश्लेषक उपस्थित राहून संपूर्ण वर्णन (कॉमेंटरी) आपल्यासमोर करतो आहे, असे वाटत राहते.

सचिनच्या फलंदाजी आणि गोलंदाजीला एक स्वतंत्र अशी त्याची शैली होती तशीच लेखकाचीदेखील एक स्वतंत्र अशी प्रसन्न शैली आहे. 'त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून मला लक्षात आलं की जखम फक्त त्याच्या बॅटवरच नव्हती ती त्याच्या मनावरसुद्धा झाली होती.', 'बॅट चेंडूला आज्ञा करत होती आणि चेंडू ती आज्ञा मुकाटपणे पाळत होता.', 'सचिन तेंडुलकर नावाच्या सोन्याला तांबं करून कल्हई लावण्याची सुरुवात साधारण २००२ साली प्रकर्षाने सुरू झाली.' अशी वाक्ये केवळ सचिनचे वैभव वाढवतात असे नाही तर पुस्तकाचे मोल वाढवतात.

लेखक द्वारकानाथ संझगिरी आणि क्रिकेट-चित्रपट यांचे नाते अतूट आहे. आतापर्यंत त्यांची ४० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. शिवाय विविध नियतकालिकांमधून सातत्याने लेखन सुरू आहे. त्यांच्या लेखनासाठी त्यांना अनेक सन्मान प्राप्त झालेले आहेत.

मुखपृष्ठ आणि आतील मांडणी अतुल जोशी यांची आहे. ग्रंथालीने या पुस्तकाची केलेली निर्मिती ती सचिनच्या प्रतिमेला साजेशी लार्जर दॅन इमॅजिन राहील, याची काळजी घेतलेली आहे. याचे इंग्रजी रूपांतरही प्रसिद्ध केले आहे. ते सतीश मुटाटकर यांनी केले आहे.

**मूल्य ८०० रुपये सवलतीत ५०० रुपये**

# ग्रंथपान

**विज्ञान-तंत्रज्ञानात**
**हीरकमहोत्सवी महाराष्ट्र**
संपादक
**विवेक पाटकर । हेमचंद्र प्रधान**




**प्रगतीची महाराष्ट्रगाथा**

'कापूस व कापसाचा शोध आणि कापड बनवण्यासाठी वापर करण्याच्या कल्पनेचा शोध सर्वप्रथम भारतामध्ये पाच हजार वर्षांपूर्वी लागला. सुमारे ३००० वर्षांपासून कापसापासून तयार झालेल्या विविध प्रकारच्या कापडांचे उत्पादन करणारा आणि त्यांची जगातील इतर देशांना निर्यात करणारा एक प्रमुख देश म्हणून भारत ओळखला जाऊ लागला. भारतीय वस्त्रोद्योगामध्ये महाराष्ट्र राज्याचा मोठा आणि महत्त्वाचा वाटा आहे. भारतातील पहिली कापड गिरणी ही मुंबईमध्ये १८५४ मध्ये उभी राहिली, तर देशाच्या विकेंद्रित क्षेत्रातील पहिला यंत्रमाग इचलकरंजी येथे १९०४ मध्ये सुरू झाला. अगदी पूर्वीपासूनच हातमागाची अनेक केंद्रे महाराष्ट्रामध्ये विकसित झाली होती. यामध्ये इचलकरंजी, सोलापूर, पैठण, येवला, नागपूर, नंदूरबार, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर यांचा समावेश होतो. या प्रत्येक केंद्राचे स्वतःचे असे एक वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन होते.'

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. २०२० साली या घटनेला साठ वर्षे पूर्ण झाली. या हीरक महोत्सवी कालखंडात महाराष्ट्राने अनुभवलेली प्रगती, स्थित्यंतरे आणि भविष्यातील योजनांसाठी घातलेला पाया/ केलेले नियोजन याबाबतचा आढावा संपादकद्वयांनी या ग्रंथात घेतलेला आहे. प्रस्तुत ग्रंथात विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयाला प्राधान्य देण्यात आलेले आहे. गेल्या साठ वर्षात महाराष्ट्राने विज्ञान व तंत्रज्ञानात कशी झेप घेतली याचा आलेख मांडताना विषय व क्षेत्रांनुसार वेगळी वेगळी वर्गवारी करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्राला उचित असे मापदंड लावून त्यांचा वर्गांक शोधण्याचा प्रयत्न या ग्रंथात केलेला आहे. त्यानुसार या ग्रंथाची मांडणी १) महाराष्ट्राचे मूलभूत विज्ञानातील योगदान, २) महाराष्ट्राचे पायाभूत आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदान, ३) विज्ञान, शिक्षण, ४) यशोगाथा, आणि ५) पुढील दिशा, अशा पाच प्रमुख भागांत या ग्रंथाची विभागणी केलेली आहे.

या प्रत्येक प्रमुख भागात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणितशास्त्र, वैद्यकीयशास्त्र, कृषिशास्त्र, पर्यावरणशास्त्र, अन्य व्यवस्था, जलव्यवस्था, वस्त्रोद्योग, गृहनिर्माण, रस्ते, वीज, परिवहन, शालेय-उच्च लोकशिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भरीव ठसा उमटवणाऱ्या महाराष्ट्रातील काही निवडक व्यक्ती आणि संस्था यांच्या योगदानाची संक्षिप्त माहिती आणि मूलभूत विज्ञान प्रोत्सानासाठी दिशा उपयोजित विज्ञानप्रोत्साहनासाठी धोरणे, असे अनेक उपविभाग आहेत.

असा हा प्रचंड आवाका असलेला ग्रंथ आपल्यासमोर संपादकद्वयांनी ठेवलेला आहे. यात त्या त्या क्षेत्रातील मान्यवर व कर्तृत्व सिद्ध केलेल्या सिद्धहस्त लेखकांकडून समृद्ध असे लेख लिहवून घेण्यात आलेले आहेत. असे सुमारे १०० लेख या ग्रंथात समाविष्ट आहेत.

महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी राज्य अन्नधान्यासाठी आयातीवर अवलंबून असे. १९७२ सालच्या हरितक्रांतीमुळे ही स्थिती बदलून राज्य स्वयंपूर्ण झाले. ६० वर्षांत काही पिकांची उत्पादकता तीन ते चार पट वाढली. नवीन वाण, नवीन तंत्र, नवीन उत्पादने आली. अनेक साथींनी ग्रस्त असलेला महाराष्ट्र आता आरोग्यक्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करणारे राज्य म्हणून ओळखला जातो. टेस्ट ट्यूब बेबीचे यशस्वी प्रयोग करणारे केईएम हॉस्पिटल मुंबईत आहे. वस्त्रोद्योगात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत वस्त्रोद्योग हेच महत्त्वाचा घटक आहे. याचे मुख्य कारण कच्च्या मालाचा स्थिर पुरवठा, कुशल मनुष्यबळ, राज्य शासनाने उपलब्ध केलेल्या पायाभूत सुविधा आणि उद्योगस्नेही शासकीय धोरणे ही आहेत. भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाचे अणुशास्त्रज्ञ डॉक्टर अनिल काकोडकर, वैज्ञानिक आणि औद्योगिक अनुसंधान परिषदेला प्रतिष्ठा आणि आत्मविश्वास मिळवून देणारे डॉक्टर रघुनाथ माशेलकर, अंतराळ-संशोधनाचे नेतृत्व करणारे डॉक्टर वसंत गोवारीकर, रसायन उद्योगाचे पायाभरणी आणि संवर्धन करणारे डॉ. ज्येष्ठराज जोशी, 'प्रथम' हा महासंगणक बांधण्याच्या प्रकल्पाचे आणि संगणकनिर्मितीच्या क्षेत्रात भारताला आंतरराष्ट्रीय स्थान मिळवून देणारे डॉक्टर विजय भटकर यांच्या कर्तृत्वाची यशोगाथा ही महाराष्ट्राच्या आजच्या समृद्ध आणि संपन्नतची यशोगाथा ठरलेली आहे. इतकेच नव्हे तर विदेशात असलेले महाराष्ट्राचे आणि भारताचे नाव उज्वल करणारे 'अंकीय प्रतिमा संस्करण' विषयाचे अरुण नेत्रावळी, जगविख्यात 'सिद्धांतिक खगोल शास्त्रज्ञ' अभय अष्टेकर, 'पुंज कृष्णविवरा'वरील कार्यासाठी प्रसिद्ध असलेले आतिश दाभोलकर, 'गणन प्रक्रियेतील जटिलता' या विषयात संशोधनाने मोलाची भर घालणारे नरेंद्र करमरकर, यांच्या कार्याची नोंद हा महाराष्ट्राचा मानबिंदू ठरलेला आहे.


महाराष्ट्र उद्योगक्षेत्रात देशात नेहमीच अग्रभागी राहिलेला आहे. जेआरडी टाटा यांचे नाव यासाठी नेहमीच अग्रभागी राहिलेले आहे. त्यांच्या जोडीला किर्लोस्कर उद्योगसमूह, घर्डा उद्योगसमूह, महिको, पलॅब उद्योगसमूह, अशा उद्योगसमूहांचाही सहभाग महाराष्ट्राच्या यशस्वीतेत मोलाचा ठरलेला आहे.

महाराष्ट्राची यशोगाथा सांगत असतानाच बलस्थानांबरोबरच दौर्बल्याची स्थाने कोणती आहेत यांचाही उल्लेख टाळून पुढे जाता येणार नाही याची स्पष्ट जाणीव हा ग्रंथ करून देतो. आपल्यासमोर कोणती आव्हाने आणि संधी आहे त्याचीही ओळख हे लेख करून देतात. या ग्रंथातील सर्वच लेख हे अभ्यास आणि संशोधनावर आधारित असल्याने आकडेवारीचे तक्ते, आलेख अशा संदर्भांनी सजलेले आहेत. अभ्यासक-संशोधकांसाठी सदरचा ग्रंथ हा मोलाचा संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरेल. हा ग्रंथ सिद्ध करण्यासाठी डॉक्टर विवेक पाटकर आणि डॉक्टर हेमचंद्र प्रधान यांनी खूप परिश्रम घेतलेले आहेत. यासाठी मराठी विज्ञान परिषदेने पुढाकार घेऊन एक मोठा दस्तऐवज महाराष्ट्रवासीयांच्या समोर ठेवलेला आहे. या खंडाची मांडणी आणि मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे.

**मूल्य ७५० रुपये सवलतीत ५०० रुपये**




‘स्वातंत्र्यसंग्राम संगीतकारांचा’ पुस्तकाचे प्रकाशन
सांस्कृतिक व वनखाते मंत्री सुधीर मुनगंटीवार
यांच्या हस्ते
सोबत सुरेश वांदिले, अरुण जोशी,
धनश्री धारप, सुदेश हिंगलासपूरकर,
लेखिका माधवी नानल आणि महेश खरे



‘सफरनामा’ पुस्तकाचे प्रकाशन
सुदेश हिंगलासपूरकर,
लेखिका पल्लवी पंडित,
चंद्रकांत चन्ने, प्रदीप दाते, मनीषा पाटील
आणि प्रा. विकास जोशी



‘विज्ञानगप्पा’ कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी बोलताना नंदिनी थत्ते



‘विज्ञानधारा’ कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी हितगुज करताना शरद काळे




माधव जोशी लिखित ‘कॉर्पोरेट दिंडी’ या पुस्तकाच्या
दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन नाशिक येथे



अनुराधा गोरे लिखित ‘आओ फिरसे दीप जलाएँ’ भाग १ व २ पुस्तकांचे
प्रकाशन करताना नीला रवींद्र, लेखिका अनुराधा गोरे, पराग लिमये,
सुदेश हिंगलासपूरकर आणि मेधा वैद्य




‘कॉर्पोरेट गप्पा’ – सुरेश हावरे यांची मुलाखत घेताना ज्ञानेश चांदेकर

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.